


# मूल्यवर्धन यशोगाथा

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.






# मूल्यवर्धन यशोगाथा

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# मूल्यवर्धन यशोगाथा


- **प्रवर्तक**
  शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य.
- **प्रकाशक**
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **प्रेरणा**
  **वन्दना कृष्णा,** (भा.प्र.से.)
  अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
  **विशाल सोळंकी,** (भा.प्र.से.)
  आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
- **मार्गदर्शन**
  **अश्विनी जोशी,** (भा.प्र.से.)
  राज्य प्रकल्प संचालक, समग्र शिक्षा, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
- **संपादक**
  **दिनकर पाटील**
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **कार्यकारी संपादक**
  **श्री. विकास गरड,**
  प्र. प्राचार्य (समन्वय), राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **समन्वयक**
  **श्रीमती वर्षाराणी भोपळे**
  उपविभाग प्रमुख, अभ्यासक्रम विकसन विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **श्रीमती पूनम घुले**
  अधिव्याख्याता, अभ्यासक्रम विकसन विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **श्रीमती उषा शेलार**
  विषय सहायक, अभ्यासक्रम विकसन विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **प्रथम आवृत्ती –** मार्च २०२०
- **प्रती –** ९५,०००
- **अर्थसहाय्य –** समग्र शिक्षा, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
- **मुद्रक –** रुना ग्राफिक्स, पुणे.


- © सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन.

# मनोगत

समाज समृद्ध बनवायचा असेल तर ज्ञान आणि कौशल्ये यांबरोबरच समाजातील प्रत्येक घटकामध्ये मूल्यांची रुजवणूक करणे आवश्यक असते. अशा मूल्यांची रुजवणूक मुलांमध्ये लहानपणापासूनच करण्याची समाजाची अपेक्षा असते. मूल्यांची रुजवणूक कुटुंबापासून होत असली तरी शाळांची प्राथमिक शिक्षणातील भूमिका महत्त्वाची असते.

शालेय शिक्षणातून भारतीय संविधानातील न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता इत्यादी मूल्यांची जोपासना होण्यासाठी अभ्यासक्रमात मूल्यांना पूरक अशा कृती, उपक्रम, खेळ, कार्यक्रम यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

शालेय विद्यार्थी भविष्यात लोकशाहीचे जबाबदार, संवेदनशील आणि कर्तबगार नागरिक बनावेत यासाठी ज्ञान आणि कौशल्य याबरोबरच मूल्यसंवर्धनासाठी नियोजनबद्ध कार्यक्रम शाळांना देण्याच्या उद्देशाने राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद आणि मुथ्था फाऊंडेशन पुणे यांच्या सहकार्याने मूल्यसंवर्धन कार्यक्रम सन २०१६-१७ पासून हाती घेण्यात आला आहे. इयत्ता पहिली ते पाचवीच्या शाळेतील शिक्षकांतून प्रेरकांची निवड करून त्यांना प्रशिक्षण देण्यात आले. प्रथमत: प्रायोगिक स्वरूपात सुरु करण्यात आलेला कार्यक्रम सन २०१९-२० मध्ये महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये सुरू करण्यात आला आहे. राज्यातील ४७,००० प्राथमिक शाळांतील १,९५,००० शिक्षक आणि ४४ लक्ष विद्यार्थ्यांपर्यंत हा कार्यक्रम पोहोचविण्यात आला.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून शाळा आणि विद्यार्थी यांमध्ये घडलेला बदल लक्षणीय आहे. याबाबतच्या निवडक यशोगाथा प्रातिनिधीक स्वरूपात 'मूल्यवर्धन यशोगाथा' या पुस्तिकेत देण्यात आलेल्या आहेत. या यशोगाथा भविष्यात सर्वच शाळांना प्रेरणादायी ठरतील. यातून प्रेरणा घेऊनच मूल्यवर्धन कार्यक्रम सर्व शाळांमध्ये सातत्यपूर्णरित्या कार्यरत ठेवून मूल्याधिष्ठित भविष्यातील नागरिक बनविण्यासाठी शाळा, शिक्षक व शिक्षण प्रक्रियेतील प्रत्येक घटक कार्यरत राहील हीच अपेक्षा.

**दिनकर पाटील**
संचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | लेखाचे नांव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | गावातील मुलांकडून शहरात वाहतूक सुरक्षा | १ |
| २. | मुले ठरवू लागली स्वत:चा दिनक्रम | ३ |
| ३. | मित्रांसाठी अनोखी भेट | ६ |
| ४. | भांडखोर विद्यार्थी झाला अभ्यासात अव्वल | ८ |
| ५. | बुजरी मुले सादर करू लागली नाटक | १० |
| ६. | शाळा झाली मूल्यवर्धनची 'प्रयोगशाळा' | १२ |
| ७. | वेळेत शाळेला चाललो आम्ही! | १४ |
| ८. | शंभर वर्षांच्या शाळेला जीवनदान | १६ |
| ९. | एक वस्ती नशामुक्तीकडे | १९ |
| १०. | आमच्यासारखीच 'ती' | २१ |
| ११. | वीटभट्टीकडून शाळेकडे | २३ |
| १२. | याच शाळेत शिकणार! | २६ |
| १३. | संधी मुलींसाठी | २९ |
| १४. | ऑनेस्टी बॉक्स | ३३ |
| १५. | चिमुकल्या हातांचे मोठे काम | ३६ |
| १६. | शाळा जुनीच, पण ओळख नवी | ३९ |
| १७. | डॉ. अब्दुल कलाम यांच्याकडून प्रेरणा | ४२ |
| १८. | एक दिवस शाळेसाठी | ४५ |
| १९. | सर्वांग सुंदर माझी शाळा | ४८ |
| २०. | आणि वाचले झाडांचे प्राण | ५१ |

| अ. क्र. | लेखाचे नांव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २१. | शाळेला शिस्त | ५४ |
| २२. | शाळेतच बाजार आणि बँकही | ५६ |
| २३. | मुलींनी शाळेला दिली नवी ओळख | ५९ |
| २४. | टाकाऊपासून उपयुक्त वस्तूंनी सजली शाळा | ६१ |
| २५. | मुलांमध्ये आला वैज्ञानिक दृष्टिकोन | ६३ |
| २६. | मुलांनी बनविले स्वतःचे वाचनालय | ६५ |
| २७. | मुलांनी बनविली वृत्तपत्रांच्या कात्रणांतून संदर्भ पुस्तके | ६७ |
| २८. | मूल्यवर्धनने मुले बनतात शिस्तबद्ध | ६९ |
| २९. | परिपाठ झाले सामान्यज्ञानाचे भांडार | ७१ |
| ३०. | मूल्यवर्धनने दिली व्यायामाला प्रेरणा | ७३ |
| ३१. | लाजाळू मुलगी नृत्यात मात्र पहिली | ७५ |
| ३२. | आमच्या शाळेत छोटे शिक्षक | ७७ |
| ३३. | मूल्यवर्धनमुळे मुलांचा अहंकार होत आहे कमी | ७९ |
| ३४. | मुलांनी एकमेकांना त्यांच्या टोपण नावांनी हाक मारणे थांबविले | ८१ |

# १. गावातील मुलांकडून शहरात वाहतूक सुरक्षा

**बुलढाणा शहरापासून ५५ कि.मी. अंतरावर असलेल्या, नांदुरा तालुक्यातील अंबोडा येथील जिल्हा परिषदेच्या मराठी उच्च-प्राथमिक शाळेतील एक शिक्षिका मूल्यवर्धन उपक्रमाने प्रेरित होऊन गेले वर्षभर 'रस्ते आणि वाहतूक सुरक्षा' या मुद्द्यावर जागरूकता मोहीम चालवीत आहेत. त्यांनी गावातील मुलांचे एक कलापथक उभारले आहे. हे कलापथक शहरांतील प्रमुख ठिकाणी जाऊन गीत, संगीत, घोषणा, पोस्टर्स आणि पथनाट्य यांच्याद्वारे वाहतूक नियमांचे पालन करण्याविषयी जागृती करतात. या कार्यक्रमांमधून पथकातील मुले वाहतूक नियमांचा अर्थही सांगतात.**



**जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा परिसर**

शिक्षिका सविता तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली मुलांनी चालविलेली ही मोहीम, २०१९ च्या फेब्रुवारी महिन्यात प्रथम चर्चेत आली. त्या वर्षी ४ ते १० फेब्रुवारी दरम्यान, म्हणजे राष्ट्रीय रस्ते सुरक्षा सप्ताहाच्या वेळी या मुलांनी बुलढाण्याच्या जिल्हा रस्ते वाहतूक कार्यालयात आपली कला सादर केली. अधिकारी आणि इतर लोकांच्या कौतुकाने उत्साहित झालेल्या कलापथकातील मुलांना आता राजधानी मुंबई आणि राज्याच्या इतर शहरांमध्ये आपली कला सादर करावयाची आहे.

या गावाची लोकसंख्या सुमारे २००० आहे. येथील बहुतांश रहिवासी शेतकरी, भाजीपाला उत्पादक आणि मजूर आहेत. येथे १९१४ मध्ये सुरू झालेल्या या शाळेत मुख्याध्यापक मिळून ६ शिक्षक-शिक्षिका काम करतात. एकूण १२२ विद्यार्थ्यांमध्ये ६७ मुली आणि ५५ मुले आहेत. सप्टेंबर २०१८ पासून या शाळेत मूल्यवर्धन कार्यक्रम सुरू करण्यात आला.

### मुलांचे हे कलापथक आहे अभिनव...

सविता तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन झालेल्या या कलापथकात इयत्ता चौथीची ७ मुले आणि ५ मुली आहेत. या पथकाचे महत्त्व यासाठी आहे की, ही सर्वच मुले छोट्या गावातील असल्याने, शहरातील खूप वर्दळीचे रस्ते ओलांडायचे कसे याचे त्यांना ज्ञानच नव्हते. शिवाय शहराच्या बाजारपेठेत नियम पाळून चालायचे कसे हे पण त्यांना माहीत नव्हते.

सविता तायडे यांनी सांगितले, ''सुरुवातीला तर अशी परिस्थिती होती की, येथून सुमारे १० कि.मी. दूर असलेल्या नांदुरा गावातील रस्त्यांवर चालायचे म्हटले तरी ही मुले घाबरत होती म्हणून मुलांच्या मनातील शहरी गर्दी/वाहतूक या विषयीची भीती काढून टाकायचे मी ठरविले. येथील अनेक मुलांना मी नांदुरा येथे घेऊन गेले आणि तिथे रस्ता ओलांडणे तसेच बाजारात काळजीपूर्वक चालणे या गोष्टी शिकवू लागले.''




**बुलढाणा जिल्हा रस्ता सुरक्षा कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या हस्ते शाळेतील विद्यार्थ्यांचा सत्कार**

दुसऱ्या शिक्षिका भावना गौर म्हणाल्या, ''शहरातील रस्ते वाहतुकीचे नियम छोट्या गावांमध्ये पाळले जात नाहीत. येथील मुले मात्र गावातील गल्ल्यांमधून चालताना जमतील तितके वाहतूक नियमांचे पालन करतात. उदा. मुले नेहमी डाव्या बाजूने चालतात, तसेच गावातील मोठ्या लोकांना मुले हेल्मेटचे महत्त्व सांगतात. वाहन चालविताना मोबाईलवर बोलणे धोक्याचे आहे, याची जाणीव गावातील लोकांना करून देतात.''

मुलांच्या या मोहिमेवर गावकरीही खूष आहेत. एक रहिवासी अनिल बावस्कर म्हणतात, ''गावातील मुले मोठ्या शहराच्या ठिकाणी जाऊन वाहतुकीसंबंधी महत्त्वाच्या गोष्टी सांगतात. रस्ते सुरक्षा आजच्या काळात मोठी गरज आहे.''

**सुरुवात अशी झाली :**

सविता तायडे म्हणाल्या, ''एकदा मूल्यवर्धनच्या सत्रात मुले वाहतुकीच्या नियमांविषयी चर्चा करीत होती तेव्हा काही मुले म्हणाली की, अंबोडा फाटा येथील रस्ता ओलांडून शाळेत यायला भीती वाटते. त्यामुळे मूल्यवर्धनमधील रस्ते आणि वाहतूक सुरक्षा यांच्याशी संबंधित उपक्रम मुलांसाठी महत्त्वपूर्ण ठरतील, हे लक्षात आले.''

त्या पुढे म्हणाल्या, ''या गोष्टी मी मुलांना नुसत्या बोलण्यातून सांगितल्या असत्या, तर त्या लगेच विसरल्या गेल्या असत्या. म्हणून मी मुलांना शाळेपासून १ कि.मी. अंतरावर असलेल्या अंबोडा फाटा येथे घेऊन गेले. नियम पाळून रस्ता कसा ओलांडायचा हे त्यांना तेथे नेऊन प्रत्यक्ष दाखविले.''


**मूल्यवर्धन तासिकेत शिक्षिका सविता तायडे आणि विद्यार्थी रस्ता सुरक्षेविषयी कार्यक्रम सादर करताना**

सविता तायडे या एक गायिका आणि कुशल नृत्य कलाकार आहेत म्हणून त्यांनी 'रस्ते सुरक्षा' या विषयावर कलेच्या माध्यमातून जनजागृती करण्याचे ठरविले. सुरुवातीला त्यांनी शाळेतच काही सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले. मग अभ्यासपूर्वक मुलांचे एक कलापथक तयार केले.

इयत्ता चौथीच्या आंचल बगाडे हिने सांगितले, ''बाईंनी मूल्यवर्धनच्या कार्यक्रमात वाहतुकीचे बरेच नियम माहीत करून दिले. पोस्टर्स बनवून या नियमांचे अर्थ स्पष्ट केले. कॉम्प्युटरवर व्हिडिओ दाखविले. शाळेच्या मैदानावर नाच-गाणी शिकविली. त्यामुळे आता मी अनोळखी लोकांसमोर बुजत नाही.''

इयत्ता चौथीचीच दिव्या बावस्कर म्हणते, ''बाईंनी मला मूकाभिनय शिकविला. त्यातून न बोलता समोरच्या व्यक्तीला आपले म्हणणे समजावून सांगावे लागते. त्यामुळे मी रस्त्यावरील गोंगाटात सुद्धा लोकांना आपले म्हणणे नीट समजावून सांगू शकते.''

**अजूनही काम सोपे नाही :**

सुरुवातीपासून ही मोहीम आव्हानात्मक ठरली, कारण छोट्या गावातील लहान मुलांना ५० ते १०० कि.मी. दूर अंतरावरील शहरात घेऊन जाणे आणि परत आणणे हे जबाबदारीचे काम आहे. अशा परिस्थितीत मुलांच्या कुटुंबियांना समजावून त्यांना राजी करणे हे सोपे काम नाही, असे सविता तायडे यांनी सांगितले. याशिवाय, अशा प्रकारचा एक कार्यक्रम सादर करायचा म्हणजे त्याचा सुमारे ७००० रु. खर्च होतो. त्या स्वतःचेच पैसे खर्च करतात.

अखेरीस, मुख्याध्यापक भागवत लांडे हे मुलांच्या या मोहिमेला मिळणारा पाठिंबा म्हणजे मूल्यवर्धनचे यश आहे असे कौतुकाने सांगतात. ते म्हणतात, ''मूल्यवर्धनमधील मूल्यांबद्दल मुले संवेदनशील होत आहेत. यात मुलांना हे पण सांगितले जाते की, रस्त्यावर एखादा अपघात झाला तर एक नागरिक म्हणून आपले काय कर्तव्य आहे आणि अशा वेळी आपण मदत करायला हवी.''

## २. मुले ठरवू लागली स्वतःचा दिनक्रम

**एका शिक्षकाने, शिकविण्याची नवीन पद्धती अनुसरून, वेळापत्रकाशी जोडलेले काही मूल्यवर्धन उपक्रम मुलांसाठी अंमलात आणून केवळ सहा महिन्यांत शाळेचे चित्रच पालटून टाकले आहे. या दरम्यान याच कारणामुळे शाळेत मुलांची उपस्थिती ३३ टक्क्यांनी वाढली. महाराष्ट्रातील दूरवरच्या एका गावात असणारी ही शाळा 'वेळेचा सदुपयोग' या मुद्द्यामुळे सर्वदूर चर्चेचा विषय ठरली आहे; एवढेच नाही तर दुसऱ्या शाळांमधील शिक्षकांसाठी ती प्रशिक्षण शाळा म्हणूनही पुढे आली आहे.**

एका शिक्षकाने आठवड्यातून दोन-तीन वेळा जास्तीच्या मूल्यवर्धन तासिकांचे आयोजन करून असे काही उपक्रम राबविले की, त्यामुळे जास्तीत जास्त मुलांना शिकण्यात गोडी निर्माण केली. याशिवाय मुलांना आपल्या सहाध्यायी विद्यार्थ्यांबद्दल आपलेपणा वाटू लागला. त्यामुळे आज शाळेत सर्वत्र मैत्रीपूर्ण वातावरण दिसते. शिक्षकांचे कौशल्य आणि सततचे प्रयत्न यांमुळे मुलांमध्ये आत्मविश्वास वाढत असून आपल्या रोजच्या दिनक्रमातील बरीचशी कामे मुले वेळेवर करू लागली आहेत.



**गटात मूल्यवर्धन उपक्रम करताना**
**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बनशेंद्रा येथील विद्यार्थी**

औरंगाबाद जिल्हा मुख्यालयापासून साधारणतः ५० किलोमीटर दूर असलेल्या कन्नड तालुक्यातील बनशेंद्रा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा. जवळपास २५०० लोकसंख्या असणाऱ्या या गावात बहुतेक सर्व कुटुंबे शेतकरी किंवा शेतमजूर आहेत. सन १९१४ मध्ये सुरू झालेल्या या मराठी माध्यमाच्या शाळेत एक मुख्याध्यापक आणि सहा शिक्षक आहेत. शाळेत पहिली ते पाचवी मिळून एकूण १४३ विद्यार्थी आहेत. त्यात ८२ मुले आणि ६१ मुली आहेत. येथे फेब्रुवारी २०१९ पासून मूल्यवर्धन कार्यक्रम सुरू झालेला आहे.

### मुलांनी स्वतः बनविले आपले वेळापत्रक :

शिक्षक योगेश रिंदे म्हणतात, ''या परिवर्तनाचे प्रमुख कारण ठरले ते म्हणजे वेळापत्रक. शाळेने मूल्यवर्धनच्या उपक्रमांना अनुसरून मुलांना आपापले वेळापत्रक तयार करायला मदत केली. मुलांनी आपल्या सोयीप्रमाणे वेळापत्रक बनविले. त्यामुळे अधिकाधिक मुले आपल्या वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन करू शकत आहेत. चौथी आणि पाचवीची मुलेही जास्त शिस्तबद्ध झाली आहेत.''



**अभ्यासाबरोबरच शाळेतील वेगवेगळे उपक्रम**
**करण्यात मग्न झालेले विद्यार्थी**

योगेश रिंदे यांच्या मते, याचा परिणाम असा झाला आहे की, आज ८०% विद्यार्थी आपला गृहपाठ पूर्ण करूनच वर्गात येतात. मागच्या सत्रामध्ये अवघे ४०% विद्यार्थी गृहपाठ करून येत होते. गेल्या सत्रात १९ मुलांनी शाळा सोडून दिली होती. या सत्रात मात्र एकाही मुलाने अद्याप शाळा सोडलेली नाही.

मुलांच्या अभ्यासाची गुणवत्ता पहिल्यापेक्षा खूपच वाढली आहे आणि ती एकमेकांपासून खूप शिकायला लागली आहेत. आता ते घर आणि शेतीच्या कामासाठी सुद्धा वेळ देत असल्यामुळे त्यांची ही नवीन सवय टिकवून ठेवण्यासाठी त्यांना शिक्षकांबरोबरच त्यांच्या कुटुंबियांचेही सहकार्य मिळत आहे.

## आधी मुले होती एक 'डोकेदुखी' :

येथील बहुतेक मुले मजूर कुटुंबातील आहेत. त्यांचे कुटुंबीय, नातेवाईक शेतात मजुरी करायला जातात. त्यामुळे शाळेमध्ये मूल्यवर्धन कार्यक्रम सुरू होण्याआधी, आपल्या कामात हातभार लावण्यासाठी अनेकदा मुलांची जरूरीपेक्षा जास्त मदत घेत होते. त्यासाठी ते मुलांना बऱ्याचदा शेतामध्ये घेऊन जात किंवा त्यांना घर सांभाळण्यासाठी घरी ठेवत असत. काही मुले गायी, म्हशी आणि बकऱ्या चारण्यासाठी गावाबाहेर जायची, तर काही मुली घरातच राहून, एक तर आईला स्वयंपाकात मदत करायच्या किंवा आपल्या लहान भावंडांना सांभाळण्यात पूर्ण वेळ घालवायच्या. अशा स्थितीत बहुतेक मुलांना शाळेबद्दल फारशी ओढ नसायची. ही मुले कधीतरी शाळेत यायची, आलीच तर उशिरा यायची आणि ती बहुधा गृहपाठ कधी करायची नाहीत. त्यामुळे शिक्षकांना वर्गात पुन्हा सगळे शिकवावे लागत असे.

योगेश रिंदे यांच्या म्हणण्यानुसार मूल्यवर्धन कार्यक्रम सुरू झाल्यानंतर साधारणतः तीन महिने फक्त २५ टक्के मुले वेळेवर शाळेत यायची आणि आपला गृहपाठ पूर्ण करायची. बाकीची मुले अभ्यासात मागे पडल्यामुळे त्यांच्यामध्ये न्यूनगंडाची भावना निर्माण झाली होती. योगेश रिंदे म्हणतात, ''शाळेतील मुलांची राहणी अव्यवस्थित होती. त्यांनी खेळ किंवा घर, शाळा आणि शेती येथील कामे करण्यासाठी कोणत्याच प्रकारे वेळेचे नियोजन केले नव्हते. त्यामुळे ती एकही काम चांगल्या रीतीने करू शकत नव्हती. कितीतरी वेळा त्यांना स्वतःची कामेही करता येत नव्हती. त्यामुळे आम्हांला प्रत्येकाला वेगवेगळे सांगावे, शिकवावे लागत होते. परिणामी, आमचे काम अजूनच कठीण झाले होते. शिवाय, माझ्या वर्गातील मुले भावनिक दृष्ट्या सुद्धा एकाच पातळीवर नव्हती.''

## राजूच्या दिनचर्येपासून घेतला धडा :

योगेश रिंदे यांच्याकरिता ही परिस्थिती आव्हानात्मक झाली होती. मुलांना नीट शिकविता यावे म्हणून हे चित्र त्यांना कोणत्याही परिस्थितीत बदलावयाचे होते. त्यांनी जेव्हा चौथीच्या मूल्यवर्धन शिक्षक उपक्रम पुस्तिकेतील 'राजूची दिनचर्या' आणि 'माझे दैनंदिन वेळापत्रक' हे उपक्रम वाचले, तेव्हा त्यांना वाटले की, राजूप्रमाणे वर्गातील मुले वेळेचा योग्य उपयोग करायला शिकली तर शाळेची स्थिती बदलता येऊ शकते.



स्वत: तयार केलेल्या दिनक्रमाचे सादरीकरण करताना विद्यार्थी

मग त्यांनी मुलांकडून हा उपक्रम करून घेतला. त्यांना राजू नावाच्या मुलाचे वेळापत्रक दाखविले. त्यांनी मुलांना राजूच्या दिनचर्येविषयी काही प्रश्न विचारले. मुलांच्या जोड्या तयार करून, 'राजू आपल्या वेळेचा सदुपयोग करतो का आणि त्याच्या वेळापत्रकात काही सुधारणा करण्याची गरज आहे का', या प्रश्नांवर चर्चा करण्यास सांगितले.

चर्चेनंतर प्रत्येक जोडीला राजूचे नवे वेळापत्रक बनविण्यास सांगण्यात आले. यावेळी मुलांनी स्वतःच सांगितले की, राजूने जर कमी वेळ टी.व्ही. बघितला तर त्याला खेळण्यासाठी पुरेसा वेळ मिळू शकेल. राजूने अभ्यासासाठी आणि खेळायला केव्हा आणि किती वेळ द्यायला हवा हे काही मुलांनी सांगितले. जर राजूला चित्रकला शिकायची असेल तर त्याने चित्र काढण्यासाठी किती वेळ द्यायला हवा, हेही त्यांनी सांगितले.

मग मुलांनी स्वतःच आपापली वेळापत्रके तयार केली आणि एकमेकांच्या वेळापत्रकांचे मूल्यांकन करून त्यामध्ये जरूर त्या सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या. योगेश रिंदे यांच्या म्हणण्यानुसार, सुमारे एक महिन्यानंतर काही मुलांमध्ये सुरुवातीचे बदल दिसू लागले. मुलांनी आपले वेळापत्रक स्वतःच तयार केले असल्यामुळे त्याचे पालन करणे त्यांना जास्त सोपे होते.

'राजूची दिनचर्या' आणि 'माझे दैनंदिन वेळापत्रक' हे उपक्रम वर्गात घेण्याआधी त्यांनी स्वतःसाठी एक वेळापत्रक बनविले होते असे योगेश रिंदे यांनी सांगितले. एक आठवडाभर आपला दिनक्रम त्यांनी वेळापत्रकानुसार आखला होता. ते म्हणाले, ''जेव्हा माझी दिवसभराची कामे वेळेवर आणि चांगल्या रीतीने होऊ लागली, तेव्हा मला आत्मविश्वास आला की, अशा प्रकारचे उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये सुद्धा लागू करता येतील.''

**वेळापत्रकांचे पालन होण्यासाठी पाठपुरावा :**

आता प्रश्न असा होता की, विद्यार्थ्यांकरिता केवळ वेळापत्रक बनविल्यामुळे स्थिती बदलणार होती का? तर याचे उत्तर नाही असे आहे. याच कारणास्तव योगेश रिंदे यांनी एक विशेष योजना आखण्याचे काम सुरू केले. ते काही दिवस शाळा सुरू होण्यापूर्वी आणि शाळा संपल्यानंतर विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना, नातलगांना भेटत राहिले. त्यांना शिक्षणाचे महत्त्व सांगून त्यांच्या मुलांनी नवीन वेळापत्रक पाळावे असेही त्यांना समजावत राहिले.

त्यानंतर योगेश रिंदे यांनी मुले आणि त्यांच्या कुटुंबियांशी चर्चा करून मुख्य समस्यांची एक यादी तयार केली. यात त्यांनी 'मुलांच्या समस्या' आणि 'पालकांच्या समस्या'असे दोन रकाने करून त्यांचे वर्गीकरण केले. या दरम्यान खूप नवीन गोष्टी निदर्शनास आल्या. जसे की, मुले पुष्कळदा सकाळी वेळेवर उठत नाहीत. त्यामुळे ते घरची कामेही नीट करू शकत नाहीत आणि शाळेतही वेळेवर पोहोचू शकत नाहीत, म्हणून त्यांना घरी आणि शाळेत, दोन्ही ठिकाणी बोलणी खावी लागतात. योगेश रिंदे सांगतात की, काही दिवसांनंतर त्यांनी मुले आणि त्यांच्या घरच्यांची एक बैठक घेतली. त्यामध्ये घरच्यांच्या आपल्या मुलांकडून काय काय अपेक्षा आहेत आणि मुले त्यासाठी किती मदत करायला तयार आहेत हे ठरविण्यात आले. तरी सुद्धा सुरुवातीला बहुतांश मुलांना वेळापत्रक पाळणे कठीण जात होते, पण साधारणतः तीन महिन्यांनंतर बहुतेक विद्यार्थ्यांनी वेळापत्रकानुसार वागणे चालू केले. याचा परिणाम असा झाला की, त्यांची जास्तीत जास्त कामे वेळेवर पूर्ण होऊ लागली. इयत्ता चौथीतील समृद्धी मोलिंगे म्हणते, ''माझ्या वर्गात २० मुले आहेत त्यांपैकी १८ मुले वेळापत्रकाचे पालन व्यवस्थितपणे करतात.''

तेव्हापासून सर्व मुलांना एकाच वेळी शिकविणे शिक्षकांना सोपे झाले. कोणताही मुलगा, मुलगी अभ्यासात मागे पडले तर इतर मुले त्यांना मदत करतात. त्यामुळे अभ्यासात मागे पडणाऱ्या मुलांचा आत्मविश्वास वाढू लागला.

शाळेतील प्रिया सोनवणे नावाच्या मुलीचे वडील राजेंद्र चर्चेमध्ये म्हणाले, ''माझ्या मुलीने दोन प्रकारची वेळापत्रके बनविली आहेत. पहिल्या वेळापत्रकात तिच्या दिवसभराच्या योजना असतात. दुसऱ्या वेळापत्रकात तिच्या महिनाभराच्या योजना असतात. या वेळापत्रकांत तिने शाळा आणि शाळेनंतरच्या वेळेतील कामांविषयी लिहिले आहे.''

आकाश घाडगेचे वडील भारत घाडगे म्हणतात, ''आकाश आता वेळेवर अंघोळ करण्यासाठी टाळाटाळ करीत नाही. वेळेवर अंघोळ करतो. तो स्वच्छ कपडे घालतो आणि स्वच्छतेकडे खूप लक्ष देतो.''

योगेश रिंदे यांनी सांगितले की, आमची ही सात-आठ महिन्यांची मेहनत आणि त्यांच्याशी सतत बोलत राहिल्याचा परिणाम असा झाला आहे की, आता बहुतेक मुलांचे कुटुंबीय त्यांच्याकडून फार कामे करून घेत नाहीत. मुलांच्या कुटुंबीयांना, नातेवाईकांना शाळा विविध कार्यक्रमांसाठी आमंत्रित करते. त्यावेळी त्यांच्याशी मुलांच्या प्रगतीविषयी चर्चा होते. काही अडचणी असतील तर त्या दूर करण्यासाठी प्रयत्न केले जातात.

बऱ्याच मुलांशी बोलल्यानंतर असे लक्षात येते की, शिक्षणाच्या बाबतीत त्यांच्या मनात आता कुठल्याही प्रकारचा न्यूनगंड नाही. शेवटी आदित्य खैरनार नावाचा मुलगा म्हणतो, ''आता आम्ही परीक्षेमध्ये पास तर होतोच, पण त्यापेक्षा आणखीही पुष्कळ काही करू शकतो.''

# ३. मित्रांसाठी अनोखी भेट

**औरंगाबाद जिल्ह्यातील सोयगाव तालुक्यातील बरखेडी येथील ही जिल्हा परिषदेची शाळा आहे. येथील मुले आपल्या जुन्या चपला वर्गात घेऊन येतात आणि त्या दुरुस्त करून पुन्हा वापरण्यायोग्य बनवितात. या चपला ती मुले आपल्या अशा मित्राला देतात, जो आपल्या कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीमुळे चप्पल खरेदी करू शकत नाही.**


मूल्यवर्धन उपक्रमातून विद्यार्थी झाले संवेदनशील

येथील मुख्याध्यापक, शिक्षिका आणि मुलांबरोबरच्या चर्चेतून हे स्पष्ट होते की, या मुलांमध्ये बंधुता आणि आपापसातील सहकार्याची भावना मूल्यवर्धनमुळे वाढीस लागली आहे.

अडीच हजार लोकसंख्येच्या बरखेडी खुर्द गावातील बहुसंख्य लोक, मजूर किंवा अल्पभूधारक शेतकरी आहेत. वर्ष १९५९ मध्ये स्थापन झालेली ही शाळा आपल्या आणखीही दोन वैशिष्ट्यांमुळे आपल्याला आकर्षित करते; एक म्हणजे मुलांच्या संख्येच्या तुलनेत शाळेचा मोठा परिसर आपले लक्ष वेधून घेतो आणि दुसरे म्हणजे येथे मुलांच्या तुलनेत मुलींची संख्या अधिक आहे.

या शाळेत मुख्याध्यापक आणि दोन शिक्षिका आहेत. येथे पहिली ते पाचवीपर्यंत शिकणाऱ्या मुलांची संख्या ५३ असून यामध्ये १९ मुले आणि ३४ मुली आहेत. २५,००० स्क्वेअर फूट इतका मोठा परिसर असलेल्या या शाळेत एक कार्यालय आणि प्रत्येक वर्गासाठी वेगवेगळ्या खोल्या आहेत. येथे जुलै २०१८ पासून मूल्यवर्धन कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

## पूर्वी चित्र असे नव्हते :

मुख्याध्यापक जी. आर. तेली म्हणाले, ''आज आमच्या शाळेतील सर्व मुलांच्या पायात बूट किंवा चप्पल असल्याने त्यांच्यामध्ये एक प्रकारचा आत्मविश्वास दिसून येतो. यामुळे जवळपास सर्व मुले नियमितपणे शाळेत येतात. आधी आमच्या शाळेत शिकणाऱ्या अनेक गरीब मुलांकडे पायात घालण्यासाठी चप्पल नव्हती. यामुळे शाळेत जात-येत असताना त्यांच्या पायाला काटे, खडे किंवा काचा लागत असत, त्यांना जखमा होत. अनेकदा या त्रासामुळे मुले शाळेत येणेच बंद करायचे.'' त्यांच्यात नेहमी न्यूनगंडाची भावना असायची. याचा परिणाम शाळेत मुलांच्या उपस्थितीवर होत असे. शाळेला १००% टक्के उपस्थिती कधीही राखता आली नाही परंतु मूल्यवर्धनमधील बऱ्याच उपक्रमांमुळे मुले अधिक संवेदनशील झाली आहेत. आता त्यांना या समस्येवर तोडगा देखील सापडला आहे.


मूल्यवर्धन उपक्रमात रंगून गेलेले विद्यार्थी व शिक्षक

## अशी सुरुवात झाली :

शिक्षिका पी. बी. कोळी यांनी त्यांचा अनुभव सांगितला. त्या म्हणाल्या, ''अनेक मूल्यवर्धन उपक्रमांत बंधुत्वाची शिकवण मिळते. संवेदनशीलता वाढते. मूल्यवर्धन उपक्रम आयोजित केल्याने शाळेत येणाऱ्या मुलांना आपण मदत करावी या गोष्टीची जाणीव सगळ्यांना झाली.''

शाळेतील शिक्षकांशी चर्चा करताना संपूर्ण घटना स्पष्ट झाली. त्यांनी सांगितले की, ऑक्टोबर किंवा नोव्हेंबर २०१८ मध्ये घडलेल्या घटनेने मुलांनी त्यांच्या वागण्यातून बंधुत्वाची भावना प्रत्यक्षात उतरविली. चौथीमध्ये शिकणारी चित्रा (नाव बदलले आहे) अनवाणी पायांनी शाळेत येत-जात होती. एके दिवशी शाळेत येताना तिच्या पायात मोठा काटा रुतला. वेदनेने ती घायाळ झाली. ती तशीच रडत, लंगडत शाळेत पोहोचली. ते पाहून तिच्याच वर्गातील विद्यार्थ्यांनी तिच्या पायातील काटा बाहेर काढला. दुसऱ्या दिवशी जुनी चप्पल दुरुस्त करून चित्राला भेट म्हणून दिली. हा अतिशय भावनिक प्रसंग होता. त्यानंतर, दररोज ती चप्पल घालून शाळेत येऊ लागली.

त्या दिवसापासून मुलांच्या मनात विचार आला की, अशाप्रकारे इतर मुलांसाठी काहीतरी केले पाहिजे. आपला कोणताही मित्र अनवाणी शाळेत येणार नाही असा निर्णय शाळेतील मुलांनी घेतला. याबद्दल शिक्षक बी. एन. टोके यांनी सांगितले की, मजुरी करणाऱ्या कुटुंबांतील जवळपास डझनभर मुले या शाळेत अशी आहेत, ज्यांना पालक पैशाअभावी चप्पलदेखील घेऊ शकत नाहीत. अशा परिस्थितीत शाळेतील इतर मुलांनी त्यांच्या जुन्या चपला वर्गात जमा केल्या. फाटलेल्या जीन्स पँटचे पातळ तुकडे कापून चपला दुरुस्त केल्या. जेव्हा मुलांनी निरुपयोगी चपलांपासून पुन्हा वापरण्यायोग्य चपला बनविल्या, तेव्हा शिक्षकांनीही मुलांना त्या कामात मदत केली.



**जुन्या चपला दुरुस्त करताना विद्यार्थी**

इयत्ता पाचवीतील दर्शन सोनवणे याने सांगितले की, मित्रांसाठी चप्पल तयार केल्यामुळे त्यांची वागणूक बदलली आहे. तो म्हणाला की, मुलांमध्ये शिष्टाचार वाढला आहे. आता सर्व मुले शूज आणि मोजे किंवा चप्पल घालून शाळेत येत आहेत. ते शाळेचा गणवेशही घालत आहेत.

चौथीच्या प्रथमेश भोर याने सांगितले की, सर्व मुले शूज आणि चपलांचा चांगल्याप्रकारे वापर करतात आणि सांभाळून ठेवतात. तिसरीच्या वर्गातील आदित्य डोभाल म्हणतो की, शाळेतील प्रत्येक मुलाकडे चप्पल किंवा शूज असणे आवश्यक आहे. त्याला 'असे का?' विचारल्यावर तो म्हणाला, ''यामुळे मनाला शांती मिळते. यामुळे शिकणे देखील चांगले होते. फक्त चप्पलच नाही तर प्रत्येकाकडे दप्तर, सर्व पुस्तके आणि शिक्षणासाठी आवश्यक सर्व साहित्य असले पाहिजे.''

### इतर मुलेही कामात करतात मदत :

जी. आर. तेली यांच्या म्हणण्यानुसार, मूल्यवर्धनमुळे मुलांमध्ये बंधुत्वाची भावना निर्माण झाली आहे. त्यामुळे ती शाळेच्या सर्व कामात मदत करतात. उदाहरणार्थ, काही महिन्यांपूर्वी शाळेच्या मुख्य गेटसमोर मोठे खड्डे होते. यावर्षी (२०१९) पावसाळ्याच्या दिवसांत जेव्हा त्यात पाणी साचले होते, तेव्हा काही मुले त्यात पडली. घाणेरडे पाणी आणि चिखलामुळे त्यांचे कपडे खराब झाले होते म्हणून सर्व मुलांनी मुरूम, मातीने खड्डे भरण्याचा निर्णय घेतला. त्यांनी शाळेच्या आवाराच्या बाहेरून मुरूम, माती आणून खड्डे भरले.

मूल्यवर्धनच्या माध्यमातून शाळा पुढे कोणते बदल करू इच्छिते? या प्रश्नाच्या उत्तरात जी. आर. तेली म्हणाले, ''ज्याप्रमाणे मुलांचे वागणे बदलले आहे, त्याचप्रमाणे ग्रामस्थांमध्येही शाळेप्रति बंधुत्वाची भावना विकसित व्हावी, जेणेकरून मुलांच्या शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या गोष्टी मुलांना उपलब्ध करून देण्यात ते आम्हांला मदत करू शकतील.''

# ४. भांडखोर विद्यार्थी झाला अभ्यासात अव्वल

**एका मुलाच्या रागाला आणि रोजच्या भांडणाला कंटाळून त्याच्या घरातील आणि परिसरातील लोकांनी त्याच्यात परिवर्तन घडण्याची आशा सोडून दिली होती, पण आज तोच मुलगा शाळेचा आदर्श विद्यार्थी बनला आहे. त्याच्या शिक्षिका शमा शेख यांच्या म्हणण्याप्रमाणे हे परिवर्तन मूल्यवर्धनच्या उपक्रमांमुळे झाले आहे.**

शमा शेख या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कुंभारवाडी येथील शिक्षिका आहेत. ही शाळा रत्नागिरी पासून ४० किलोमीटर दूर लांजा ब्लॉकमध्ये येते.



**विद्यार्थ्यांबरोबर उपक्रमात सहभागी मुख्याध्यापक नेहा कामत आणि शमा शेख**

मराठी माध्यमाची ही शाळा सन १९८५ मध्ये स्थापन झाली होती. येथील बहुतांश पुरुष येथून २ किलोमीटर दूर असणाऱ्या लांजा येथे कामगार म्हणून जातात, तर स्त्रिया दुसऱ्यांच्या घरी कामे करतात. या शाळेत फक्त १७ विद्यार्थी शिकतात. त्यांना शिकविण्यासाठी येथे दोन शिक्षिका आहेत.

दोन वर्षांपूर्वी शमा शेख ज्या विद्यार्थ्याच्या वागणुकीबद्दल चिंतेत होत्या, त्या विद्यार्थ्याची गोष्ट त्या सांगतात, ''गोंधळ आणि खोड्या तर सर्वच विद्यार्थी करतात, पण हा विद्यार्थी फक्त गोंधळ आणि खोड्या काढणे एवढेच करायचा. अभ्यास मात्र काहीच करीत नव्हता. तरीही ही फार मोठी समस्या नव्हती. समस्या होती त्याची वर्तणूक. तो शाळेतील वस्तूंची तोडफोड करायचा. कोणाचेही ऐकायचा नाही. दोन वर्षांपूर्वी तो पहिलीत होता. आता तुम्हांला असे वाटेल की, पहिलीच्या मुलाचा एवढा काय विचार करायचा? पण, त्या लहान वयातच त्याच्यात राग ठासून भरलेला होता; इतका की मी सांगू देखील शकणार नाही.''

शमा शेख ज्या विद्यार्थ्याबद्दल बोलत आहेत तो आता इयत्ता तिसरीत शिकणारा अथर्व (नाव बदलले) आहे. त्या सांगतात की, त्यावेळी अथर्व घरी, शाळेत आणि परिसरात आपल्यापेक्षा लहान आणि मोठ्या मुलांसोबत भांडत असे. कधी तो इतर मुलांना मारायचा तर कधी स्वतः मार खायचा. शमा शेख त्याच्या या वागणुकीमुळे चिंतीत असायच्या.

दोन वर्षांपूर्वी २०१६ मध्ये लांजा येथे मूल्यवर्धन प्रशिक्षण घेतल्यानंतर त्यांना एक मार्ग सापडला. चार दिवसांच्या प्रशिक्षणात त्यांना मूल्यवर्धन मध्ये वापरल्या जाणाऱ्या शिकविण्याच्या पद्धतींनी प्रभावित केले. त्यांना वाटले की, विद्यार्थ्यांमध्ये बदल घडविण्यासाठी हा एक प्रभावशाली मार्ग असू शकेल आणि त्यांचा हा अंदाज आज बरोबर ठरला आहे.



**उपक्रमात मुलांशी हितगुज करताना शिक्षिका शमा शेख**

मूल्यवर्धनमुळे विद्यार्थ्यांमध्ये होत असलेले बदल सांगण्यासाठी शमा शेख यांनी वर्गात विद्यार्थ्यांसोबत एक उपक्रम केला. यावेळी विद्यार्थी वर्तुळ करून बसविले होते. विद्यार्थ्यांनी इयत्ता तिसरीची विद्यार्थी उपक्रम पुस्तिका उघडलेली होती. नंतर एकेक विद्यार्थी उभा राहून एका गोष्टीतील काही ओळी वाचत होती. गोष्टीचे नाव 'गैरसमज' असे होते. ही गोष्ट चंदू आणि सागर नावाच्या मित्रांमध्ये गैरसमजामुळे झालेल्या भांडणाविषयी होती.

गोष्ट पूर्ण वाचून झाल्यानंतर दोन मित्रांनी आपापसात होणारे भांडण कसे टाळायला हवे यावर विद्यार्थ्यांनी चर्चा केली.

इतर विद्यार्थ्यांबरोबर वर्तुळात बसून अथर्व देखील या चर्चेत सहभागी झालेला होता. 'चंदूच्या जागी तू असतास तर काय केले असतेस?' असे विचारल्यावर तो म्हणाला, ''मी चंदूच्या जागी असतो तर सागरची माफी मागितली असती. कारण वडिलांनी चंदूसाठी जो पेन आणला होता, तसाच पेन सागरकडे देखील होता. चंदूचा गैरसमज झाला होता की सागरने पेन चोरला आहे.'' अथर्व पुढे म्हणाला, ''चूक असल्यावर ती मान्य करण्यात किंवा सॉरी म्हणण्यात काहीच कमीपणा नाही.''



मूल्यवर्धन उपक्रमात तल्लीन झालेले विद्यार्थी

उपक्रम संपल्यानंतर अथर्वने आम्हांला सांगितले की, त्याला मूल्यवर्धनचे उपक्रम खूप आवडतात विशेष करून त्यातील गोष्टी त्याला आवडतात कारण त्याला आधी जे माहीत नव्हते असे या गोष्टींमध्ये खूप काही आहे.

अथर्वबरोबर शिकत असलेले यश, रोशन, संजना आणि पूनम यांनी देखील अथर्वच्या वागणुकीतील झालेला बदल बघितला आहे. या विद्यार्थ्यांनी सांगितले की, दोन वर्षांपूर्वी अथर्वला राग आल्यावर तो अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना मारायचा. त्यामुळे कोणीच त्याच्याशी बोलत नसे, पण आता असे नाही. आता सगळ्यांना तो आवडतो आणि तो सर्वांचा मित्र देखील बनला आहे.

शमा शेख यांनी सांगितले की, इतर विद्यार्थी अथर्वला बदलायला मदत करीत आहेत. याचा अर्थ असा आहे की, त्यांच्या वागणुकीत बदल झाला आहे. खरे तर मूल्यवर्धनच्या उपक्रमांत सर्वच विद्यार्थ्यांचे मन रमते. अथर्व फक्त एकच उदाहरण नाही तर त्याच्यासारख्या इतर अनेक विद्यार्थ्यांना आपल्या चुकांची जाणीव झाली आहे. त्यांनी आपल्या चुकांपासून धडा घेतला आहे आणि त्या दूर केल्या आहेत.

शमा शेख पुढे म्हणाल्या, ''अथर्वमध्ये झालेले परिवर्तन म्हणजे माझ्यात झालेले परिवर्तन आहे. मूल्यवर्धनमुळे माझे विचार बदलले. मला नवी दिशा मिळाली. मी बघितले की दोन वर्षांत मी अशा एका मुलाची वागणूक बदलविली की, जो खूप उग्र आणि हिंसक होता.''

शाळेच्या मुख्याध्यापिका नेहा कामत यांच्या मते मूल्यवर्धनचा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांचे वय लक्षात घेऊन बनविला आहे. यामुळे इतरांसोबत कशाप्रकारे बोलायला हवे हे विद्यार्थी समजू शकतात. त्यांनी पुढे सांगितले की, अथर्वच्या आई बऱ्याचदा शाळेत यायच्या. तेव्हा तक्रार करायच्या की अथर्व फार शिव्या देतो. आता मात्र त्यांची अशी काही तक्रार नाही, उलट अथर्वमधील चांगल्या बदलांचा परिणाम इतर मुलांवरही झाला.

अथर्वची आई विजिता (बदललेले नाव) यांनी सांगितले की, वयानुसार तर मुले समजूतदार होतातच, पण मला वाटते शमा शेख मॅडमनी त्याला बदलविले. शेवटी, शमा शेख यांनी आम्हांला सांगितले, ''तिसरीतून चौथीत गेल्यावर मूल्यवर्धनच्या उपक्रमांतून अथर्वमध्ये अजून बदल नक्की घडतील. हे बदल बघायला पुढच्या वर्षी तुम्ही परत या.''

## ५. बुजरी मुले सादर करू लागली नाटक

**शाळेत शांत असणाऱ्या मुलांचा बुजरेपणा आणि भीती दूर करण्यासाठी शिक्षक अनेक प्रयत्न करीत असतात. तरी देखील ते यशस्वी होत नसतील तर रत्नागिरीपासून ५० किलोमीटर दूर असणाऱ्या जिल्हा परिषद आदर्श शाळा वाकेड-२ येथील शिक्षिका निर्मला राणे यांना भेटू या.**



**जिल्हा परिषद शाळा वाकेड शाळेतील एक दृश्य**

निर्मला राणे यांनी दोन वर्षांच्या मेहनतीने असे परिवर्तन घडविले आहे की, जे विद्यार्थी कधी काळी बोलायला घाबरायचे, तेच आता विविध प्रकारचे प्रश्न विचारू लागले आहेत. एवढेच नाही, तर हेच विद्यार्थी आता बऱ्याच गोष्टींवर नाटक देखील सादर करतात. याचे श्रेय निर्मला राणे मूल्यवर्धनला देतात.

आम्ही जेव्हा शाळेला भेट दिली, तेव्हा इयत्ता चौथीचे विद्यार्थी गोलात बसलेले होते. विद्यार्थ्यांनी मूल्यवर्धनच्या उपक्रम पुस्तिकेतील 'इमानदारीचे फळ' ही गोष्ट वाचली. त्यानंतर या गोष्टीवर नाटक करण्यासाठी आपापसात मिळून पात्रांची निवड केली. नाटकात ओंकारने अब्दुल शेठची, प्रदीप आणि सुनीलने अब्दुल शेठच्या मुलांची आणि भक्तीने अब्दुल शेठच्या मुलीची भूमिका केली.

वृद्ध झालेले अब्दुल शेठ आंब्याच्या बागेची जबाबदारी मुलांवर सोपविण्यासाठी त्यांची परीक्षा घेतात. यासाठी ते तीन मुलांना एकसारखे काम देतात. शेवटी अब्दुल शेठ आपली मुलगी रुखसानाच्या कामगिरीवर खुश होऊन तिच्यावर जबाबदारी सोपवितात.



**नाटकाचे सादरीकरण करताना विद्यार्थी**

नाटक संपल्यानंतर सर्व विद्यार्थी टाळ्या वाजवितात. यानंतर ते प्रामाणिकपणाबद्दल चर्चा करतात.

निर्मला राणे सांगतात की, काही वर्षांपूर्वी हेच विद्यार्थी प्रश्न विचारल्यावर घाबरून जात असत. नाटक करण्याबद्दल तर कुणी विचार देखील करू शकत नव्हते. यांच्यातील एखाद्या विद्यार्थ्याला काही बोलायला उभे केले तरी तो भीती आणि लाजेने मान खाली घालायचा परंतु आता हेच विद्यार्थी गोष्टींवर नाटक सादर करतात आणि त्यावर चर्चा सुद्धा करतात.

निर्मला राणे म्हणतात, ''असे काही नाही की, दोन वर्षांपूर्वी मी या विद्यार्थ्यांना चागंल्याप्रकारे शिकविण्यासाठी आणि त्यांची आवड वाढविण्यासाठी प्रयत्न केले नव्हते. मी खूप प्रयत्न केले होते, पण काहीच परिणाम झाला नव्हता. मी जेव्हा जास्त प्रश्न विचारायला सुरुवात केली, तेव्हा दिसले की विद्यार्थ्यांची वर्गातील उपस्थिती कमी झाली. माझ्यासाठी विद्यार्थ्यांना चांगल्याप्रकारे शिकविणे एक आव्हान होऊन बसले होते. यावर मी काय करायला हवे याविषयी मला कोणत्याच प्रकारचे मार्गदर्शन मिळत नव्हते. मला वाटायला लागले होते की, माझ्या शिकविण्यातच काही तरी कमतरता आहे.''

निर्मला राणे यांच्या मते, चार दिवसांच्या मूल्यवर्धनच्या कार्यशाळेत भाग घेतल्यानंतर त्यांच्या शिकविण्याच्या पद्धतीत बदल झाला. त्या सांगतात, ''मी विद्यार्थ्यांना परंपरागत पद्धतीने शिकवायची, पण असे शिकविल्याने विद्यार्थी शिक्षणात सहभागी होत नव्हते. जेव्हा मी मूल्यवर्धनचे प्रशिक्षण घेतले तेव्हा लक्षात आले की, एकच पाठ वेगवेगळ्या पद्धतींनी समजाविता येऊ शकतो.''

निर्मला राणे यांचे म्हणणे आहे की, त्या पूर्वी शिकविण्यासाठी फक्त फळा, खडू आणि पाठ्यपुस्तक यांचाच वापर करीत होत्या, परंतु मूल्यवर्धनचे उपक्रम घेतल्यानंतर त्यांना समजले की, शिकविताना इतर अनेक गोष्टींचा वापर करून घेता येईल. या व्यतिरिक्त, विविध प्रकारचे खेळ देखील घेता येऊ शकतील.

वाकेड येथील या मराठी माध्यमाच्या शाळेत पहिली ते चौथीपर्यंत एकूण ४४ विद्यार्थी शिकतात. यामध्ये २७ मुले व १७ मुली आहेत. मंगला परुळेकर या आणखी एक शिक्षिका शाळेत आहेत आणि प्रकाश भोवडे हे येथील मुख्याध्यापक आहेत.

प्रकाश भोवडे यांनी सांगितले की, बऱ्याच वेळा ते स्वतः देखील मूल्यवर्धनच्या उपक्रमांत सहभागी झाले आहेत. अशा वेळी त्यांच्या लक्षात आले की, विद्यार्थी आपले काम स्वतः करायला शिकत आहेत. ते रोज करण्याच्या महत्त्वाच्या कामांबद्दल माहिती मिळवीत आहेत. विद्यार्थी शाळेचा परिसर स्वच्छ ठेवण्याचा प्रयत्न करीत आहेत.

मंगला परुळेकर यांनी सांगितले की, मूल्यमापन करण्यासाठी परीक्षेशिवाय इतर कोणताही मार्ग नव्हता. मात्र मूल्यवर्धनमध्ये विद्यार्थ्यांचे बऱ्याच प्रकारे मूल्यमापन होत राहते. या मूल्यमापनाचे वैशिष्ट्य असे आहे की, यामध्ये कुठलाच विद्यार्थी निराश होत नाही. यामुळेच शाळेत अधिकाधिक विद्यार्थी उपस्थित रहायला लागले आहेत.

मंगला परुळेकर यांनी निर्मला राणे यांच्या शिकविण्यात झालेल्या बदलाविषयी सांगितले. त्या म्हणाल्या, ''या आधी निर्मला राणे या पूर्णपणे अभ्यासक्रमाची हाताळणी पारंपरिक रीतीने करीत होत्या. आमच्याकडे इतर शैक्षणिक साहित्य नसल्यामुळे त्यांची इच्छा असून देखील त्यांना इतर काही सुचत नसे परंतु मूल्यवर्धनच्या प्रशिक्षणानंतर त्यांनी जे उपक्रम घेतले, त्यामुळे त्यांना स्वतःला मजा वाटू लागली.'' त्या नेहमी सांगतात की, विद्यार्थी आता त्यांना बरेच प्रश्न विचारायला लागले आहेत, त्यामुळे त्यांना खूप छान वाटते. वर्गात जाण्याआधी मला बरीच तयारी देखील करावी लागते. आता त्या आधीच्या तुलनेत अधिक जबाबदार झाल्या आहेत.

निर्मला राणे यांनी वर्गातील मुलांची उपस्थिती वाढण्याबद्दल सांगितले, ''मूल्यवर्धनमध्ये जोडी, गट आणि गोलात चर्चा करण्यावर भर दिलेला आहे. त्याशिवाय, मूल्यवर्धनच्या सत्रांमध्ये सर्व विद्यार्थी आपापली मते मांडतात. यामुळे सर्वांना प्रतिनिधित्वाची संधी मिळते. ते सर्वजण मिळून निर्णय घेतात. जेव्हा मी बघितले की, मूल्यवर्धनमुळे विद्यार्थ्यांना मजा येत आहे, तेव्हा मी मूल्यवर्धनच्या पद्धती वापरण्यास सुरुवात केली.''

चौथीमध्ये शिकणारी पायल भितडे म्हणाली, ''मूल्यवर्धनच्या वर्गात अपूर्ण गोष्टी पूर्ण करायला शिकले.'' चौथीमध्येच असणारी पद्मिनी म्हणाली, ''आधी शाळेत न येण्यासाठी खूप कारणे सांगायची आणि खोटे बोलायची, पण जेव्हापासून मूल्यवर्धनचे वर्ग सुरू झाले, तेव्हापासून खोटे बोलणे बंद केले आहे. आता मी वेळेवर शाळेत येते.''

निर्मला राणे यांनी विद्यार्थ्यांनी केलेल्या नाटकाबद्दल सांगितले. त्या म्हणाल्या, ''जेव्हा आपल्या आजूबाजूला प्रामाणिकपणा कमी होताना दिसतो, तेव्हा विद्यार्थ्यांनी या विषयावर नाटक करणे खूप महत्त्वपूर्ण ठरते.'' या नाटकात अभिनय करणारा ओंकार भितडे म्हणाला, ''हे नाटक करून मला समजले की, प्रामाणिकपणा म्हणजे काय आणि आपण देखील प्रामाणिक कसे बनू शकतो.'' निर्मला राणे शेवटी म्हणाल्या, ''जर आपण लहान वयातच या विद्यार्थ्यांमध्ये मूल्यांची पेरणी केली, तर त्या मूल्यांचा परिणाम त्यांच्यावर आयुष्यभर राहील.''

# ६. शाळा झाली मूल्यवर्धनची 'प्रयोगशाळा'

**सहा महिन्यांपूर्वी शाळेबाहेर जी जमीन रिकामी पडलेली होती, तिथे आता एक सुंदर बगीचा दिसतो. बगीच्यामध्ये गुलाब, जास्वंद, चंपा आणि चमेली अशा सुगंधी फुलझाडांसोबत नारळासारखी फळांची झाडे देखील दृष्टीस पडतात. हे दृश्य म्हणजे शिक्षक, विद्यार्थी आणि ग्रामस्थांच्या मेहनतीचे फळ आहे.**

कोल्हापूर येथून ४० किलोमीटर दूर असणाऱ्या कागल ब्लॉकमधील वाळवे खुर्द, येथील प्राथमिक शाळेची ही गोष्ट आहे. येथील मुख्याध्यापक रमेश कोळी म्हणतात, ''शाळेतील अभ्यासक्रमात पर्यावरणाचे विषय तर शिकविले जातातच परंतु मूल्यवर्धनमधून प्रेरणा घेऊन पहिल्यांदाच पर्यावरणाच्या मुद्द्यांना पुस्तकातून बाहेर काढले आणि त्यांना प्रत्यक्ष व्यवहारात आणले.''




**शाळेतील बागेचे दृश्य**

शाळेतील शिक्षक चंद्रकांत लोकरे यांनी सांगितले, 'मूल्यवर्धनच्या काही उपक्रमात झाडे लावणे, झाडे वाचविणे आणि झाडांच्या इतर उपयोगांविषयी सांगितलेले आहे. शाळेच्या बाहेरील मैदानावरील काही झाडांकडे बघून येथील शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या मनात विचार आला की, आपण असा एक बगीचा तयार करू शकतो ज्यामुळे शाळेची शोभा वाढेल.'

चंद्रकांत लोकरे पुढे म्हणाले, ''बगीचा लावण्यामागे एक वेगळे कारण देखील होते. मूल्यवर्धनच्या उपक्रमांत श्रमाचे महत्त्व सांगितलेले आहे, त्यामुळे आमची अशी इच्छा होती की, विद्यार्थ्यांना श्रमाचे महत्त्व कळावे. यासाठी आम्ही त्यांच्याकडून श्रम करून घेतले नाहीत, मात्र प्रत्यक्ष काम करीत असताना त्यांना सोबत ठेवले. त्यामुळे गावातील लोकांनी जमीन खोदून कशाप्रकारे दगड बाहेर काढले, खड्ड्यांमध्ये कशाप्रकारे खत आणि माती टाकली, कशाप्रकारे रोपे लावली आणि त्यांना पाणी कसे घातले या सर्व गोष्टी प्रत्यक्ष करताना त्यांनी अनुभवले.''

१९२६ मध्ये स्थापन झालेल्या या मराठी माध्यमाच्या शाळेत पहिली ते चौथीपर्यंत एकूण १५० विद्यार्थी शिकतात. यामध्ये ८७ मुले आणि ६३ मुली आहेत. या शाळेतील तीनही शिक्षकांनी मूल्यवर्धनचे प्रशिक्षण घेतले आहे. हे प्रशिक्षण त्यांनी शाळेपासून ४५ कि.मी. दूर असणाऱ्या कागल येथे घेतले.

या शाळेतील एक शिक्षक उत्तम कांबळे यांनी मूल्यवर्धन प्रशिक्षणाच्या चार दिवसांच्या अनुभवाबद्दल सांगितले. ते म्हणाले, ''विद्यार्थ्यांना शिकण्याच्या प्रक्रियेत कशाप्रकारे भागीदार बनवून घेतले जाऊ शकेल हे अनुभवायला मिळाले. जेव्हा आम्ही मूल्यवर्धनचे वर्ग घ्यायला सुरुवात केली, तेव्हा आम्हांला वाटले की, वृक्षारोपण देखील एक महत्त्वपूर्ण उपक्रम होऊ शकेल, जो पर्यावरणासाठी अनुकूल तर होईलच आणि त्याचबरोबर विद्यार्थ्यांचा त्यामध्ये सहभाग देखील वाढेल.'

रमेश कोळी यांच्या मते, अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे विद्यार्थी आणि शिक्षकांची श्रमाप्रती आस्था वाढली आहे. ते म्हणाले, ''आम्हांला विद्यार्थ्यांना हे सांगण्याची गरज पडत नाही की बगीचा स्वच्छ ठेवा, झाडांना पाणी घाला, त्यात प्लॅस्टिकचा कचरा टाकू नका कारण विद्यार्थी बऱ्याच गोष्टी आपोआपच शिकत आहेत.''

शिक्षिका श्रावणी देवकर यांच्या मते अशा प्रकारच्या उपक्रमात सहभागी झाल्यानंतर त्या पर्यावरणाबद्दल आधीच्या तुलनेत अधिक जागरूक झाल्या. त्या म्हणाल्या, ''सुरुवातीला मी मूल्यवर्धनमुळे फार प्रभावित झाले नाही, पण आता ही बाग फुलताना पाहून मूल्यवर्धनबद्दलचा माझा विश्वास वाढत गेला.''

उत्तम कांबळे यांनी बागेबद्दलची एक घटना सांगितली. ते म्हणाले, ''एके दिवशी मूल्यवर्धनचा वर्ग होता. मी विद्यार्थ्यांना विचारले की, आपण शाळेच्या बाहेर झाडे लावायला पाहिजेत का? विद्यार्थ्यांनी मला विचारले की कोणती झाडे लावायची? मी त्यांना काही झाडांची नावे सांगितली. त्यांनी विचारले की, 'कोणत्या झाडाचे काय फायदे आहेत?' मी त्यांना काही झाडांचे फायदे सांगितले. अशाप्रकारे आम्ही बरीच माहिती मिळविली आणि समजूनही घेतली.''



**मुले रोज घेतात बागेची काळजी**

तिसरीमध्ये शिकणारी समृद्धी पाटील म्हणाली, ''शाळेतील बागेत लावण्यासाठी माझ्या वडिलांनी मला मोगऱ्याचे रोप दिले.'' अशाप्रकारे सर्व विद्यार्थ्यांनी आपापल्या घरून रोपे आणली. चौथीमध्ये शिकणारी गायत्री गोसावी म्हणाली, ''जेव्हा आम्हांला सांगितले की आजूबाजूच्या कोणत्याच शाळेत आमच्यासारखी बाग नाही, तेव्हा आम्हांला खूप आनंद झाला. आमची बाग बघून इथे येणाऱ्या लोकांना आनंद वाटतो.''

तिसरीची श्रावणी घोडके म्हणाली, ''पहिले चप्पल-बुटांचे स्टँड बागेत ठेवलेले असायचे. मग एक दिवस विद्यार्थ्यांनी मिळून ठरविले की ते बागेपासून दूर ठेवायचे. आता चप्पल-बूट बागेत पसरलेले दिसत नाहीत.''

चंद्रकांत लोकरे या बागेला मूल्यवर्धनचा परिणाम मानतात. हे समजावून सांगताना त्यांनी सांगितले, ''या बगीच्यामुळे विद्यार्थी पाण्याचा योग्य वापर करायला शिकत आहेत. सार्वजनिक ठिकाणी वर्तणूक कशी असायला हवी हे शिकत आहेत. याच गोष्टी त्यांना मूल्यवर्धनच्या इतर उपक्रमांमध्ये देखील सांगितलेल्या आहेत. अशाप्रकारे, या बागेने त्यांना आपापल्या जबाबदारीची जाणीव करून दिली आहे.''




**चप्पल-बूट बागेपासून दूर ठेवण्यासाठी केलेली व्यवस्था**

रमेश कोळी म्हणाले, ''पर्यावरण विषय शिकणे आणि त्याची आवड निर्माण करणे, या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. आम्ही या बागेच्या निमित्ताने या दोन्ही गोष्टी जोडून टाकल्या.'' उत्तम कांबळे यांनी सांगितले, ''आता आम्ही ही बाग अजून मोठी करणार आहोत. यासाठी एक परिसर तयार करून त्याला कुंपण घालण्याचा विचार आहे. मग आम्ही तेथे बरीच झाडे लावू.''

श्रावणी घोडके शेवटी म्हणाली, ''बागेला आणखी सुंदर बनविण्यासाठी आम्हांला गावकऱ्यांची सोबत मिळाली आहे. या कामासाठी ते श्रमदान करणार आहेत. शिवाय ते पैसे देखील जमा करणार आहेत.''

# ७. वेळेत शाळेला चाललो आम्ही!

**शाळेतील विद्यार्थ्यांना गोष्ट आवडणे ही एक सामान्य बाब आहे. परंतु काही गोष्टी विद्यार्थ्यांना इतक्या प्रभावित करू शकतात की, त्यातून प्रेरणा घेऊन त्यांना आपल्या रोजच्या वेळापत्रकाचा भाग बनविण्यासाठी ते सर्व एकत्र मिळून नियम बनवितात.**

कोल्हापूर शहरात कर्मवीर भाऊराव पाटील विद्यामंदिर या शाळेत अशीच एक घटना घडलेली आहे. येथील विद्यार्थ्यांवर मूल्यवर्धनच्या गोष्टींचा एवढा परिणाम झाला की, त्यांनी स्वतःसाठी एक नियम बनविला. हा नियम आहे वेळेत शाळेत पोहोचण्याचा. यासाठी विद्यार्थ्यांनी **'वेळेत शाळेला चाललो आम्ही!'** हा एक नारा देखील बनविला आहे. विद्यार्थी आपल्या नियम आणि नाऱ्याचे चांगल्याप्रकारे पालन करून शाळेची एक नवीन ओळख निर्माण करीत आहेत.



**वाहतुकीचे नियम नाटिकेद्वारे सादर करताना विद्यार्थी**

या शाळेतील शिक्षक विठ्ठल देवणे म्हणतात, ''सहा महिन्यांपूर्वी परिस्थिती अगदी वेगळी होती. आमच्या समोरील सर्वांत मोठी समस्या ही होती की, बरेच विद्यार्थी वेळेवर शाळेत येत नव्हते.''

या मागील काही कारणे त्यांनी सांगितली. ते म्हणतात, ''कदमवाडी वस्तीतील जास्त कुटुंबे कामगारांची आहेत. याच कामगारांची मुले आमच्या शाळेत शिकण्यासाठी येतात. आम्ही माहिती काढली तेव्हा कळाले की, त्यांच्या अनेक घरगुती समस्या आहेत, त्यामुळे मुले वेळेवर शाळेत पोहोचू शकत नाहीत.''

१९७२ मध्ये स्थापन झालेल्या या मराठी माध्यमाच्या शाळेत पहिली ते चौथीपर्यंत एकूण ९२ विद्यार्थी शिकतात. यात मुले आणि मुलींची संख्या सारखीच आहे. एकूण ४ शिक्षक आहेत. चारही शिक्षकांनी ऑगस्ट २०१८ मध्ये कोल्हापूर येथे मूल्यवर्धनचे प्रशिक्षण घेतले.

त्यातलेच एक शिक्षक विनोद कोठावळे म्हणाले, ''मूल्यवर्धनमधील अनेक गोष्टींमध्ये वेळ आणि शिस्तीचे महत्त्व सांगितलेले आहे, पण आमच्या लक्षात आले की, विद्यार्थ्यांमध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी फक्त गोष्ट वाचून दाखविणे पुरेसे नाही. मूल्यवर्धन यापुढे जाऊन विद्यार्थ्यांना गोष्टींच्या माध्यमातून विविध उपक्रमांत सहभागी करून घेते.''

विनोद कोठावळे यांच्या मताशी सहमती दर्शवीत शिक्षिका प्रतिभा चौगुले पुढे म्हणाल्या, ''मूल्यवर्धनच्या वर्गांमध्ये, विशेषतः चौथीच्या विद्यार्थ्यांनी वेळेच्या महत्त्वाशी जोडलेल्या अनेक गोष्टींवर चर्चा केली. त्याशिवाय त्यांनी वर्ग आणि शाळेच्या नियमांशी संबंधित उपक्रमांमध्ये भाग घेतला. यामध्ये त्यांनी प्रथम स्वतः विचार करणे मग जोडीदाराच्या सोबत आणि शेवटी सर्व वर्गाबरोबर मिळून विचार करणे सुरू केले. या पूर्ण अभ्यासात आम्ही बघितले की त्यांचे स्वतःचे मत देखील बदलत जाते. यात चांगली गोष्ट अशी आहे की, त्यांना सर्वांना मिळून एका निर्णयापर्यंत पोहोचायचे असते. यामुळे विद्यार्थ्यांना वाटते की, हा त्यांचा निर्णय आहे आणि त्यामुळे ते सर्वजण मिळून आपल्या निर्णयाचे पालन करतात.''



**गीताद्वारे वाहतुकीचे नियम सादर करताना विद्यार्थी**

विद्यार्थ्यांच्या वेळेवर शाळेत पोहोचण्याच्या समस्येबद्दल बोलताना विठ्ठल देवणे यांनी पुढे सांगितले की, विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांच्या सहभागाशिवाय हे काम कठीण होते. यामुळे शिक्षक विद्यार्थ्यांसोबत त्यांच्या कुटुंबीयांना देखील भेटले आणि त्यांना सांगितले की त्यांच्या मुलांनीच हे नियम आणि या घोषणा बनविल्या आहेत. शिक्षकांच्या या प्रयत्नांचा विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांवर सकारात्मक प्रभाव पडला.



**विद्यार्थ्यांनी बनविलेले वर्गनियम आणि शाळेचे नियम**

इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या वेळेचा सदुपयोग करण्यासाठी पूर्ण दिवसाचे वेळापत्रक बनविले आहे. यासाठी त्यांनी मूल्यवर्धनच्या 'राजूचे दैनंदिन वेळापत्रक' या तक्त्याची मदत घेतली. तसेच, काही विद्यार्थ्यांनी आपले जुने वेळापत्रक बदलून नवीन वेळापत्रक बनविले.

चौथीमधील उत्कृषा शेडगे म्हणाली, ''काही मोठी मुले आपल्यापेक्षा लहान मुलांना शाळेत आणायला मदत करतात. याच वर्गातील निकिता गायकवाडवर 'यशाचे रहस्य' या गोष्टीचा खूपच प्रभाव पडला आहे. ही गोष्ट वाचून तिला वाटले की एखादी गोष्ट मिळवायची असेल तर त्यासाठी तिला कष्ट करावे लागतील आणि त्यासाठी वेळेचे पालन करावे लागेल.''


**मूल्यवर्धन उपक्रमात तन्मय झालेली मुले**

मूल्यवर्धनच्या गोष्टींबद्दल बोलताना चौथीची अश्विनी हदीमनी सांगते की, 'आळशाचे स्वप्न' या गोष्टींतून तिला लक्ष्य प्राप्त करण्याबद्दल समजले. याच वर्गातील आयुष्य समुद्रे याने सांगितले की, मूल्यवर्धनच्या वर्गात विद्यार्थ्यांनी फक्त वर्ग आणि शाळेचेच नियम बनविले नाहीत तर त्यासोबतच वाहतूक नियम देखील समजून घेतले. येथील विद्यार्थ्यांनी वाहतूक नियमांचे पालन होण्यासाठी 'पिताजी हमे जरूरत है' असे नारे देखील बनविले आहेत.

प्रतिभा चौगुले यांनी सागितले, ''आठवड्यात दोन दिवस मूल्यवर्धनचे सत्र मी आयोजित करते. विद्यार्थ्यांच्या आग्रहास्तव कधी कधी आठवड्यांतून तीन किंवा चार तासिका देखील घेतल्या जातात.''

पुढील नियोजनाविषयी प्रश्न विचारल्यावर विनोद कोठावळे म्हणाले, ''विद्यार्थ्यांमधील परिवर्तनामुळे लागलेली ही सवय टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करणार आहोत.''

●●●

## ८. शंभर वर्षांच्या शाळेला जीवनदान

**जिल्हा परिषदेच्या अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या सातत्याने कमी होत आहे. अशा परिस्थितीत सांगलीपासून ४० किलोमीटर दूर एक अशी शाळा आहे, जिथे विद्यार्थ्यांची संख्या तीन पटींनी वाढून शंभरच्या पुढे गेली आहे.**

यावर्षी एक एप्रिलच्या वीस दिवस आधीच शाळेत पहिलीमध्ये ४० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांचे प्रवेश झाले आहेत. याच शाळेची तीन वर्षांपूर्वी स्थिती अशी होती की, विद्यार्थ्यांची एकूण संख्या कमी होऊन ४० पेक्षाही कमी विद्यार्थी राहिले होते. परंतु आता बदललेल्या परिस्थितीत गावातील प्रत्येक कुटुंब आपल्या मुलांना शिकण्यासाठी याच शाळेत पाठविण्यास उत्सुक आहेत. हे शक्य झाले आहे मूल्यवर्धनमुळे!

पुढील शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया एक एप्रिलपासून सुरू होणार आहे. प्रवेश सुरू होण्यास अजून २० दिवस बाकी आहेत परंतु त्या आधीपासून सकाळी सात–आठ वाजल्यापासूनच एक डझनहून अधिक पालक आपल्या मुलांच्या प्रवेशासाठी मुख्याध्यापकांना शाळेच्या कार्यालयात घेरून बसलेले असतात. हे कार्यालय आहे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आणि येथील मुख्याध्यापक आहेत, गिरीश मोकाशी.

गिरीश मोकाशी सांगतात, ''तीन वर्षांपूर्वी शाळा बंद पडण्याची चर्चा होत असे. शाळा बंद पडल्याची बातमी एका वृत्तपत्रात छापून देखील आली होती. या शाळेत अनेक पिढ्यांनी शिक्षण घेतले आहे. त्यामुळे अनेक लोकांच्या भावना या शाळेशी जोडल्या गेलेल्या आहेत. आमच्यासाठी हा कठीण काळ होता, पण आता परिस्थिती पूर्णपणे वेगळी आहे.''



**शाळेतील एक दृश्य**

कार्यालयातील सूचना फलकावर विद्यार्थ्यांची संख्या लिहिलेली आहे. त्यात एकूण ११८ विद्यार्थ्यांमध्ये ६५ मुले आणि ५३ मुली आहेत. मुख्याध्यापकांसह येथे अजून एक शिक्षक आणि एक शिक्षिका कार्यरत आहेत. मराठी माध्यमाची ही शाळा १८८० मध्ये स्थापन झालेली आहे.

शाळेतील शिक्षक कृष्णा पाटील म्हणतात, ''पुढील शैक्षणिक वर्षात येथील विद्यार्थ्यांची संख्या दीडशेच्या पार होईल. येथील विद्यार्थ्यांची संख्या वाढली आहे, कारण आम्ही त्यांना अध्ययनाची गोडी लावण्यात वाढविण्यात यशस्वी झालो आहोत. विद्यार्थी आता प्रत्येक विषय एकमेकांच्या सहभागाने शिकतात आणि परीक्षेत पहिल्यापेक्षा चांगले गुण मिळवितात. तीन वर्षांत विद्यार्थ्यांचा बुजरेपणा कमी झाला आहे. हे सर्व मूल्यवर्धनच्या उपक्रमांमुळे शक्य झाले आहे.''

मूल्यवर्धनच्या बाबतीत आपले अनुभव सांगताना मोकाशी यांनी सांगितले की, डिसेंबर २०१५ मध्ये त्यांना पहिल्यांदा मूल्यवर्धनबद्दल समजले. तेव्हा त्यांनी पुण्यातील वाघोली येथे राज्यातील इतर शिक्षकांसमवेत तीन दिवसांचे प्रशिक्षण घेतले होते.

मोकाशी पुढे म्हणाले, ''सांगली जिल्ह्यात याच शाळेपासून मूल्यवर्धन सुरू झाले. मूल्यवर्धन ही शिक्षणाची खूप चांगली पद्धत आहे. याच्या मदतीने आम्ही विद्यार्थ्यांना शिकविण्याची पद्धत बदलली. त्यामुळे शाळेबद्दलचे विद्यार्थ्यांचे विचारही बदलले.''



सहयोगी खेळात रममाण झालेले विद्यार्थी

विद्यार्थी सांगतात की, मूल्यवर्धनच्या एका उपक्रमात त्यांनी बूट-चप्पल घालून वर्गात न येण्याचा नियम बनविला आहे. पाचवीत शिकणारी अनुष्का शिंदे म्हणाली, ''हा नियम सर्वांना लागू होतो. शिक्षक देखील बूट किंवा चप्पल घालून वर्गात येत नाहीत.''

तिसरीमध्ये शिकणारा तनवीर मोहम्मद म्हणाला, ''मूल्यवर्धन-मधील गोष्टी आम्हांला खूप आवडतात. यात सर्वांना विचार करावा लागतो आणि सर्वांची उत्तरे वेगवेगळी असतात.'' इयत्ता तिसरीतील विद्यार्थी आपल्या मूल्यवर्धनच्या उपक्रम पुस्तिकेतील 'गैरसमज' नावाच्या गोष्टीवर नाटक देखील सादर करतात. कृष्णा पाटील म्हणाले, ''अशा प्रकारचे उपक्रम केल्याने हे विद्यार्थी रचनात्मक आणि स्वतंत्रपणे विचार करू शकतात.''

शाळेतील शिक्षिका दीपाली सदलगे म्हणाल्या, ''या विद्यार्थ्यांमध्ये हळूहळू बदल झाला आहे. आता ते आपल्याबद्दल मोकळेपणाने विचार करतात, एकमेकांसोबत चर्चा करतात, एखाद्या कामात येणाऱ्या अडचणी ओळखतात, आपली जबाबदारी त्यांना कळते आणि ते सर्वजण मिळून निर्णय घेतात. मूल्यवर्धनमध्ये हे चांगले आहे की त्यांना परीक्षा द्यावी लागत नाही.''

विद्यार्थ्यांच्या पालकांपैकी एक पालक प्रमोद संपतराव म्हणाले, ''शाळेची इमारत आणि विद्यार्थ्यांना बघून तुम्हांला परिवर्तनाचा अंदाज येणार नाही. हे फक्त त्यांना कळेल जे तीन-चार वर्षांपासून शाळेसोबत जोडलेले आहेत. पूर्वी माझी मुलगी श्रेया एका प्रायव्हेट शाळेत शिकत होती, पण एक वर्षापूर्वी श्रेयाचे नाव प्रायव्हेट शाळेतून काढून या शाळेत घातले आहे. प्रायव्हेट शाळेत असताना श्रेया जास्त बोलत नव्हती, पण या शाळेत मात्र दुसरीतून तिसरीत येईपर्यंत ती पूर्ण आत्मविश्वासाने बोलायला लागली आहे, खूप प्रश्न विचारायला लागली आहे. ती लोकांना नमस्कार करत नव्हती, मात्र आता ती सर्वांशी चांगल्याप्रकारे बोलायला लागली आहे.''



मूल्यवर्धन उपक्रमात स्वत:चे मत मांडताना विद्यार्थिनी

गावातील विश्वास मोरे यांनी सांगितले की, येथील बरेच लोक असे आहेत जे आपल्या मुलांना प्रायव्हेट शाळेतून काढून या शाळेत घालू इच्छितात

कारण त्यांनाही आता दिसू लागले आहे की, त्यांच्या शेजारील शाळेमध्ये मुलांच्या अभ्यासाबरोबरच चांगली मूल्ये देखील रुजत आहेत.

अक्काताई शिंदे यांची नात अनुष्का इयत्ता चौथीमध्ये शिकते. अक्काताई म्हणाल्या, ''आमची मुलगी येथील (शाळेतील) बऱ्याच गोष्टी घरी आणि घरातील गोष्टी येथे सांगते. येथील शिक्षक घरी येऊन मुलांबद्दल चौकशी करतात आणि आम्हांला देखील येथे बोलावतात. मी माझ्या नातवालाही याच शाळेत शिकवू इच्छिते.''

कृष्णा पाटील यांनी सांगितले की, मूल्यवर्धनच्या उपक्रमांत विद्यार्थ्यांसमवेत त्यांच्या पालकांना सहभागी करून घेण्यासाठी विविध प्रकारचे गृहकार्य दिले जाते. यामध्ये विद्यार्थी आणि पालक एकमेकांशी विविध विषयांवर चर्चा करून माहिती मिळवितात. अशा प्रकारे ते शाळेतील उपक्रमांत सहभागी होतात.

वरिष्ठ नागरिक समन्वय समितीचे सदस्य जगन्नाथ मोरे यांनी सांगितले की, त्यांना मूल्यवर्धन कार्यक्रमाबद्दल बरीच माहिती मिळालेली आहे. ते म्हणाले, ''आता शाळेत खूप बदल झाला आहे कारण इथल्या शिक्षकांनी मूल्यवर्धनच्या उपक्रमांतून आम्हां वरिष्ठ नागरिकांना मुलांसोबत थेट शाळेशी जोडले आहे. हे शिक्षक आम्हांला सांस्कृतिक कार्यक्रमांना बोलावून मुलांबरोबर चर्चा करायला सांगतात. चर्चेत व्यसनमुक्ती आणि स्वच्छता असे मुद्दे असतात.''

शिक्षिका दिपाली सदलगे म्हणाल्या, ''शाळा आणि समाजातील संबंध मजबूत झाल्याने विद्यार्थ्यांचा खूप फायदा झाला आहे. गावातील लोकांनी शाळेला टी.व्ही., साऊंड सिस्टीम, संगणक, प्रिंटर आणि कपाटे या गोष्टी भेट दिल्या आहेत. या सामग्रीमुळे आम्हांला मूल्यवर्धनच्या उपक्रमांत आणि शिक्षणाच्या इतर कामांत मदत होत आहे.''

तीन वर्षांपूर्वीच्या परिस्थितीशी तुलना करताना मोकाशी म्हणाले, ''या गावातील बहुतेक लोक मजूर आहेत. आई–वडील सकाळी उठून ऊसाच्या शेतात कामाला निघून जातात. तीन वर्षांपूर्वी यांची मुले अंघोळ न करताच शाळेत येत असत तेव्हा प्रश्न पडायचा की, यांना स्वच्छतेविषयी कोण सांगणार? मूल्यवर्धनमध्ये स्वच्छतेविषयी उपक्रम आहेत. आम्ही त्याच्या मदतीने विद्यार्थ्यांमध्ये ही समज निर्माण केली की जीवनात स्वच्छतेचे महत्त्व काय आहे.''

त्या पुढे म्हणाल्या, ''मूल्यवर्धनच्या सत्रात विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे दात घासायला लावतात. त्यांना शाळेच्या परिसरातच अंघोळ करायला देखील शिकविले जाते.'' कृष्णा पाटील यांनी सांगितले की, दहा हजारांच्या लोकसंख्येत इथे सहा सरकारी शाळा आणि एक प्रायव्हेट शाळा आहे. पण बहुतांश लोकांना याच शाळेत आपल्या मुलांना प्रवेश द्यायचा आहे. परिस्थिती अशी आहे की, दोन किलोमीटर अंतरावरून देखील विद्यार्थी इथे शिकण्यासाठी येत आहेत. कृष्णा यांनी पुढे सांगितले की, ते आठवड्यातून मूल्यवर्धनच्या तीन तासिका घेतात.

मोकाशी यांनी मागच्या काळात मुख्यमंत्र्यांसोबत व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे मूल्यवर्धनबद्दल झालेल्या चर्चेबाबत सांगितले. ते म्हणाले, ''मुख्यमंत्र्यांसोबत चर्चेत आणखीही इतर लोक सहभागी होते. तेव्हा हा प्रश्न देखील समोर आला की, आपल्या शाळेतील अभ्यासक्रमात मूल्यशिक्षण अंतर्भूत नाही का? तेव्हा मी त्यांना माझे अनुभव सांगितले. मी त्यांना म्हटले की, आपला अभ्यासक्रम मूल्यांवर आधारित तर आहेच, पण मूल्यवर्धन देखील आपल्या अभ्यासक्रमापेक्षा वेगळे नाही. ते तर शालेय अभ्यासक्रम लागू करण्यात मदत करीत असल्याचे सिद्ध होत आहे.''

# ९. एक वस्ती नशामुक्तीकडे

**नशेच्या आहारी गेलेल्या कोणत्याही व्यक्तीची ती सवय बदलवणे खूप अवघड असते. पण सांगली जिल्ह्यातील एका शाळेच्या लहान मुलांनी फक्त दोन वर्षांत पूर्ण वस्तीची नशा करण्याची सवय घालवून टाकली. हा मूल्यवर्धनचा परिणाम आहे असे शिक्षक म्हणत आहेत.**

जिल्हा मुख्यालय सांगलीपासून साधारण १५० किलोमीटर दूर, जत ब्लॉकमधील पांडेझरी हे एक छोटेसे दुष्काळग्रस्त गाव आहे. येथील शेतकरी ज्वारी आणि बाजरी पिकवितात. याशिवाय पाणी उपलब्ध असताना द्राक्ष शेतीला प्राथमिकता दिली जाते. गावातील वस्ती विरळ आहे आणि लोकसंख्याही कमी आहे. चंद्रकांत कांबळे या गावचे सरपंच आहेत.

चंद्रकांत कांबळे म्हणाले, ''दीड–दोन वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. अशी घटना घडली जिचा मी विचार देखील केला नव्हता. दुसरीत शिकणारा माझा मुलगा अरविंद मला म्हणू लागला की, बाबा मी जेवण करणार नाही. मी त्याला जेवण्यासाठी खूप समजावले. त्याच्या या हट्टामागचे कारण विचारले तेव्हा त्याने सांगितले की, तुम्ही व्यसन करणे बंद करा.''



जिल्हा परिषद शाळा बाबरवस्ती शाळेचा परिसर

चंद्रकांत कांबळे यांनी सांगितले की, हे ऐकून त्यांना आश्चर्य वाटले. गावात त्यांना असे कोणीच म्हटले नव्हते. त्यामुळे ही गोष्ट समजून घ्यायला ते दुसऱ्या दिवशी बाबर वस्तीच्या प्राथमिक शाळेत गेले. बाबर वस्ती पांडेझरी गावचीच एक वस्ती आहे. अरविंद याच शाळेत शिकतो. दिलीप वाघमारे त्याला शिकवितात.

चंद्रकांत कांबळे यांनी दिलीप वाघमारे यांना संपूर्ण घटना सांगितली. दिलीप सरांना भेटल्यावर त्यांना मूल्यवर्धनविषयी कळाले. चंद्रकांत कांबळे पुढे म्हणाले, ''सरांनी मला सांगितले की मूल्यवर्धनच्या वर्गात मुले आपल्या चांगल्या आणि वाईट सवयींबद्दल बोलतात.''

दिलीप वाघमारे म्हणाले, ''मूल्यवर्धनच्या उपक्रमात आमच्या मुलांनी आपल्या आणि आपल्या आजूबाजूच्या लोकांच्या चांगल्या आणि वाईट सवयी ओळखल्या होत्या. हे करीत असताना विद्यार्थ्यांनी दारू आणि तंबाखूचे सेवन आरोग्यासाठी कशाप्रकारे हानिकारक असते यावर देखील चर्चा केली. त्यामुळे, अरविंदला वाटत होते की त्याच्या वडिलांनी या पदार्थांचे सेवन करू नये. त्याने वडिलांना सांगितले की, जर त्यांनी या पदार्थांचे सेवन बंद केले तर गावातील इतर लोकांचीही सवय घालवायला मदत होईल.''

दिलीप वाघमारे यांचे हे बोलणे ऐकून चंद्रकांत कांबळे भावूक झाले. मग त्यांनी सरपंच या नात्याने लहान मुलांच्या नेतृत्वाखाली गावातील लोकांसाठी व्यसनमुक्ती अभियान चालविण्याचे ठरविले.

दिलीप वाघमारे बाबर वस्तीच्या शाळेत पहिली ते चौथीच्या एकूण ४८ विद्यार्थ्यांना शिकवितात. यामध्ये २६ मुले आणि २२ मुली आहेत. गावातील बहुतांश लोक ऊसतोडणीसाठी स्थलांतर करतात.

दिलीप वाघमारे यांच्या मते नशामुक्ती अभियान बरेच अडचणीचे होते. ते सांगतात, ''३०० लोकसंख्या असणाऱ्या आमच्या वस्तीच्या या शाळेत शिकण्यासाठी एकूण ५० विद्यार्थी देखील नव्हते. त्यामुळे आमच्यासमोर पहिला प्रश्न होता, पटसंख्येचा.''



**'खेळातून शिक्षण' उपक्रमात सहभागी विद्यार्थी व शिक्षक दिलीप वाघमारे**

दिलीप वाघमारे म्हणाले की, सर्वांत आधी त्यांनी विद्यार्थ्यांसाठी मूल्यवर्धनची काही विशेष सत्रे आयोजित केली. त्यात विद्यार्थ्यांबरोबर व्यसनांमुळे होणाऱ्या दुष्परिणामांची चर्चा केली. मग विद्यार्थी त्यांच्या घरी, शेजारी, गल्ली आणि परिसरातील लोकांना व्यसनाच्या दुष्परिणामांबद्दल सांगू लागले. 'तंबाखू खाल्ल्याने देशातील आणि जगभरातील कितीतरी लोकांना तोंडाचा कर्करोग झाला आहे' हे विद्यार्थी गावातील लोकांना हे सांगत असत.

शाळेतील विद्यार्थी गावातील लोकांना तोंडाच्या कर्करोगाचे फोटो दाखवीत फिरायचे आणि नंतर अशी वेळ आली की, या विद्यार्थ्यांच्या परिवारातील लोकांनी विद्यार्थ्यांसोबत मिळून पूर्ण गावात व्यसनमुक्ती फेरी काढली.

तिसरीमध्ये शिकणारी आरती कोरे म्हणाली, ''जेव्हा मी माझ्या आजोबांना गुटखा सोडायला सांगितले तेव्हा त्यांनी ऐकले नाही. मी पुन्हा पुन्हा सांगितले तरी ते लपून-लपून गुटखा खायचे. एकदा त्यांना गुटखा खाताना बघून मी रडायला लागले. तेव्हा त्यांना म्हणावे लागले की, रडू नको, आता नाही खाणार गुटखा!''

तिसरीचीच गोडप्पा धनसरी म्हणते, ''माझे बाबा मला पैसे देऊन गुटखा आणायला सांगायचे. एक दिवस मी त्यांना म्हटले, हे (गुटखा) खाणे जर इतके चांगले आहे तर ते मी पण खाणार!'' ते म्हणाले, ''हे खूप खराब असते.'' मी म्हटले, ''असे असते तर तुम्ही खाल्लाच नसता, असे म्हणून मी त्यांचे गुटखा खाणे बंद केले.''

ग्रामस्थ गोडप्पा कुलाडे यांनी सांगितले, व्यसन एवढ्या सहजासहजी नाही सुटत, पण, मुलांच्या प्रेमापोटी मात्र आम्ही विरघळलो. गावात दोन वर्षांपूर्वी गुटखा खाण्याचे प्रमाण अधिक होते. आज अशी परिस्थिती आहे की, पन्नासातून एखादीच व्यक्ती गुटखा खाताना दिसते. परंतु गावातील लोक त्याला गुटखा खायला मनाई करतात.

दिलीप वाघमारे सांगतात की, त्यांनी शालेय स्तरावर बरेच सांकृतिक कार्यक्रम घेतले. 'नशा सोडणे का गरजेचे आहे?' अशा विषयावर व्याख्यान आयोजित केले. यामध्ये व्यसनांशी संबंधित विषयतज्ज्ञांना बोलाविले. यामध्ये विचारवंत आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा देखील समावेश होता. याशिवाय व्यसनमुक्ती शिबीर देखील आयोजित केले.

ग्रामस्थ बालाजी पडलवार यांनी सांगितले, ''असे नाही की मला दारूच्या दुष्परिणामांबद्दल माहिती नव्हती, पण जेव्हा मुले आणि सगळा गाव दारू प्यायला मनाई करायला लागला तेव्हा मी विचार केला की, कशाला दारू पिऊन वातावरण खराब करायचे.''



**मूल्यवर्धन उपक्रमात सहभागी विद्यार्थी**

शेवटी कल्पना कौरे नावाच्या वृद्ध महिलेने सांगितले की, ''मोठे असल्याच्या नात्याने लहानांना चांगल्या सवयी लावणे हे आपले काम असते, पण जेव्हा लहान मुले आपल्याला काय चांगले आणि काय वाईट आहे हे सांगतात, तेव्हा सुरुवातीला वाईट वाटले, तरी शेवटी ते चांगल्यासाठीच असते म्हणून ते चांगलेच वाटते.''

## १०. आमच्यासारखीच ‘ती’

**बुलढाणा जिल्ह्याच्या ठिकाणापासून सुमारे २५ किलोमीटर अंतरावर चौथी नावाचे गाव आहे. या गावातील जिल्हा परिषदेच्या उच्च प्राथमिक शाळेतील मुले एका कर्णबधिर मुलीच्या बाबतीत संवेदनशील होताना दिसत आहेत. एका शिक्षिकेच्या प्रयत्नांमुळे हे शक्य झाले आहे.**



**शाळेतील शिक्षिका मानसी नाईक मूल्यवर्धन उपक्रमाचे आयोजन करताना**

शाळेतील शिक्षिका मानसी नाईक या मूल्यशिक्षण आणि दैनंदिन व्यवहारातील उदाहरणे यांच्या मदतीने मुलांच्या वागणुकीत बदल घडवून आणण्यात यशस्वी होताना दिसत आहेत. याचा परिणाम म्हणून मुलांनी आता वर्गातील अध्ययन गतिमंद मुलीला चिडविणे बंद केले आहे. आता ते तिला तिच्या नावाने संबोधतात. केवळ मुलांच्याच नाही तर रुक्मिणी नप्ते (नाव बदललेले) या अध्ययन गतिमंद मुलीच्या वागणुकीतही बदल जाणवू लागला आहे. रुक्मिणी आता इतर मुलांशी भांडत नाही. अभ्यासापासून खेळापर्यंत प्रत्येक गोष्टीत ती आपल्या वर्गातील मुला-मुलींबरोबर सहभागी होण्याचा प्रयत्न करते. परंतु साधारणत: वर्षभरापूर्वी परिस्थिती वेगळी होती. येथे हे नमूद करावेसे वाटते की, ३००० लोकसंख्या असलेल्या या गावामध्ये छोटे शेतकरी आणि शेतमजूर अधिक आहेत. १९३५ साली वसलेल्या या गावातील शाळेत ९१ मुले असून त्यांत ५३ मुली व ३८ मुले आहेत. सप्टेंबर २०१८ नंतर येथे मूल्यवर्धन कार्यक्रम सुरू करण्यात आला.

### शाळेची ओढ आणि शाळेबद्दल आपुलकीही नव्हती :



**मूल्यवर्धन उपक्रमातून मुलांचे विचार आणि वर्तन बदलासाठी प्रयत्न करताना शिक्षिका मानसी नाईक व इतर शिक्षिका**

वर्षभरापूर्वीच्या परिस्थितीबद्दल बोलताना मानसी नाईक सांगतात की, रुक्मिणीला ऐकू येत नसल्याने त्यांना स्वत:लाही तिला कसे शिकवावे हे कळत नव्हते. मुलांच्या रुक्ष वागणुकीमुळे ती मुलांपासून दूर राही किंवा मारामारी करीत असे.

मानसी नाईक बोलताना पुढे सांगतात की, तिचं तिच्या विचारांचं एक स्वतंत्र जग होतं. दुसरी गोष्ट म्हणजे खूप हट्टी होती. तिला चॉकलेट पाहिजे म्हणजे पाहिजे. अनेकवेळा भरपूर चॉकलेट्स साठविल्यानंतर रुक्मिणी ती मुलांमध्ये वाटत असे. पण शाळेबद्दल तिच्या मनात आकर्षण नव्हते. अनेकवेळा तर तिला निरोप पाठवूनही ती पाच-सात दिवस शाळेत येत नसे.

मूल्यवर्धनच्या उपक्रमांमुळे मैत्री, विनम्रता, इतरांबद्दल आदरभाव, भांडणे टाळणे याचे शिक्षण छोट्याछोट्या कृतींतून आणि दैनंदिन व्यवहारातील सहभागाने तिला मिळाले. मुलांनी आपली जबाबदारी ओळखली. याचा परिणाम असा झाला की त्यांनी रुक्मिणीशी मैत्री केली. त्यामुळे रुक्मिणीही शाळेत नियमित येऊ लागली.

नियमित खुणांच्या साहाय्याने शिक्षकांना प्रश्न विचारते आणि अनेक गोष्टी शिकण्याचा प्रयत्न करते. ती आता शांत झाली असून तिच्यामध्ये आत्मविश्वास जाणवतो. रुक्मिणीची मैत्रीण जयश्री सांगते की, खाणाखुणांच्या साहाय्याने जेव्हा रुक्मिणी काही सांगू इच्छिते तेव्हा वर्गातील मुले तिच्या सांगण्याचा, ती करीत असलेल्या खाणाखुणांचा अर्थ लावायचा प्रयत्न करतात.

## प्रयत्नांती मिळाले यश :



मूल्यवर्धन उपक्रमाच्या आयोजनात दंग झालेल्या शिक्षिका स्वाती तांबेकर

शाळेतील शिक्षिका स्वाती तांबेकर यांच्या मते मूल्यवर्धन रुजविण्याच्या पद्धतीमुळे मुलांमध्ये आपुलकीची किंवा जवळीकीची भावना वाढीस लागली आहे. चित्र आणि चित्रफिती यांच्या माध्यमातून शिकविण्याचा प्रयत्न केला जातो. या गोष्टी शिकणे रुक्मिणीला सोपे जाते. असे असले तरी रुक्मिणीमध्ये ज्या गतीने सुधारणा होणे अपेक्षित आहे, त्याप्रमाणे होताना दिसत नाही.

दुसऱ्या बाजूला मानसी नाईक मात्र रुक्मिणीसंबंधी घडलेली कोणतीही घटना किंवा करण्यात आलेला प्रयत्न सकारात्मकतेने स्वीकारत आहेत. त्या सांगतात की, रुक्मिणीला ऐकू येत नाही आणि बोलताही येत नाही. यात तिचा कोणताही दोष नाही. ही गोष्ट लहान मुलांना समजाविण्यात त्या यशस्वी झाल्या आहेत. आपण रुक्मिणीच्या जागी असतो आणि आपल्याला कुणी चिडवले असते तर आपल्यालाही वाईट वाटलेच असते, असा अनुभवही अनेक मुलांनी सांगितला. खरे तर मानसी नाईक यांनी मुलांचे एक सत्र घेतले होते. त्यात मुलांनी मौन पाळून (शब्दांचा वापर न करता) आपले विचार इतरांना सांगायचे होते आणि कान बंद करून दुसऱ्याचे म्हणणे ऐकण्याचा प्रयत्न करायचा होता.

यानंतर मानसी नाईक यांनी रुक्मिणीला सामूहिक चर्चेमध्ये, जोड्यांमध्ये, सामूहिक खेळांमध्ये सहभागी करून घ्यायला सुरुवात केली. या दरम्यान रुक्मिणीला गोष्टी समजायला वेळ लागत असे, परंतु इतर मुले समजून घेण्यासाठी तिला मदत करत. यामुळे अनेक गोष्टींमध्ये ती सक्रिय सहभाग घेऊ लागली. रुक्मिणी ही मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबातील मुलगी आहे. तिचे वडील गणेश नप्ते (नाव बदललेले) हे सुरुवातीला काही दिवस आपल्या मुलीला शाळेत कुणी त्रास देत नाही ना या चिंतेत असत, परंतु आता ते निश्चिंत झाले आहेत.

## आव्हान अजून संपलेले नाही :



चौथी गावातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळेचा परिसर

शैलेंद्र गोरे हे शिक्षक रुक्मिणीचा एक विशेष गुण सांगतात. त्यांच्या मते, इतर मुलांच्या तुलनेत रुक्मिणीची निरीक्षणशक्ती अधिक आहे. ती छोट्या पण महत्त्वाच्या भावना शिक्षकांजवळ व्यक्त करते.

याच वेळी मानसी नाईक मात्र हे जाणून आहेत की, आव्हान अजून संपलेले नाही कारण अभ्यासादरम्यान रुक्मिणीशी संवाद साधणे आणि तिला समजून घेणे अजूनही अवघड जात आहे. त्यांच्या मते, रुक्मिणी ही विशेष श्रेणी विद्यार्थिनी असून तिच्या शिक्षणाचा, अभ्यासाचा दर्जा सुधारण्यासाठी शिक्षिकेमध्ये आवश्यक असलेल्या कौशल्यांची त्यांच्यामध्ये कमतरता आहे. त्या असेही म्हणतात की, त्यांनी प्रयत्नांमध्ये कोणतीही कसर ठेवलेली नाही परंतु आणखी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

●●●

# ११. वीटभट्टीकडून शाळेकडे

**बुलढाणा जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणाहून १५ किलोमीटर अंतरावर असलेल्या दाहिद गावात जिल्हा परिषदेची उच्च प्राथमिक शाळा आहे. या शाळेत मूल्यवर्धनच्या माध्यमातून वीटभट्टी मजुरांना शिक्षणाचे महत्त्व समजावून देण्यात या शाळेतील शिक्षकांना यश येत आहे.**

यापूर्वी ही मुलं दिवाळीनंतर शाळा सोडून आपल्या पालकांसह दुसऱ्या गावी जात; परंतु या शाळेच्या प्रयत्नांमुळे गेल्या दोन वर्षात २० मुलांनी वीटभट्टीवर जाण्यासाठी गाव सोडण्यास नकार दिला. अशा प्रकारे शाळा सोडून जाण्याच्या प्रकाराला आळा बसला. ही मुले नियमितपणे शाळेत हजर राहतील, यासाठी शिक्षकांनी केलेल्या प्रयत्नांना यश आले. शिक्षकांच्या या प्रयत्नांमुळे या मुलांना अभ्यासातही गोडी निर्माण झाली आहे. याबरोबरच त्यांच्यामध्ये आत्मविश्वासही वाढू लागला आहे. ही मुले आता समाजातील इतर मुलांशीही मिसळून वागत आहेत. या मुलांच्या वागणुकीत झालेला बदल पाहून त्यांच्या समाजातील लोकंही आनंद व्यक्त करीत आहेत.



**शाळेच्या परिसरातील एक दृश्य**

येथे हे आवर्जून सांगितले पाहिजे की, या गावाची लोकसंख्या ३००० आहे. डाळी आणि तेलबिया ही पिके घेणारे शेतकरी आणि मजूर येथे राहतात. १९३२ मध्ये स्थापन झालेल्या या शाळेत मुख्याध्यापक वगळता ६ शिक्षक-शिक्षिका आहेत. या शाळेत एकूण १५३ विद्यार्थी असून यांत ९० मुले आणि ६३ मुली आहेत. सप्टेंबर २०१७ पासून या शाळेत मूल्यवर्धन कार्यक्रम सुरू झाला.



**शाळेच्या परिसरात मुलांना स्वच्छतेचे व्यावहारिक धडे देताना मुख्याध्यापक विष्णू धंदर**

### आपुलकीचे नाते तयार झाले :

मूल्यशिक्षणाशी संबंधित दैनंदिन व्यवहाराच्या माध्यमातून या शाळेचे मुख्याध्यापक श्री. विष्णू धंदर यांनी मुलांमध्ये आपलेपणाची भावना रुजविली असून यामुळे मुलांमध्ये आपुलकीचे नाते तयार झाले आहे. याबाबत ते म्हणतात, ''या मुलांना ही शाळा म्हणजे त्यांचे घर आणि कुटुंब असल्याचे वाटू लागले आहे. येथील शिक्षक आणि इतर मुले आता त्यांच्या सुख-दु:खात त्यांचे साथीदार झाले आहेत. आता अनेक मुले महिनोन्महिने गैरहजर राहत नाहीत. याबरोबरच शाळेतील इतर मुलांशी होणारी त्यांची भांडणेही जवळपास बंद झाली आहेत.''

शाळेकडे मुलांना आकर्षित करण्यासाठी त्यांच्या मनातील गोष्टी समजून घेणे आवश्यक होते. शिक्षिका आशा खेत्रे याबाबत सांगतात, ''या मुलांच्या मनात एक न्यूनगंडाची,

दुजेपणाची भावना होती. या कारणामुळे त्यांना शाळेत यावेसे वाटत नसे. अनेक मुले तर शाळाही सोडून जात. आपण इतर मुलांपेक्षा अभ्यासात मागे आहोत, असेही या मुलांना वाटत असे. ही मुले साफसफाईबद्दल फारशी जागरूक नव्हती. तसंच त्यामुळे वर्गातल्या इतर मुलांशी त्यांची भांडणे होत.''

अशा परिस्थितीमध्ये शाळेतील शिक्षक आणि शिक्षिकांनी मूल्यवर्धनच्या तासाला 'मैत्री' आणि 'स्वच्छता' हे विषय दैनंदिन उदाहरणातून समजावून सांगण्यावर भर दिला. तसेच या मुलांची आपापसात मैत्री होईल, यादृष्टीनेही शाळेतील शिक्षकांनी प्रयत्न केले.'

### दुरावा कमी झाला :

या शाळेतील शिक्षिका कावेरी जाधव सांगतात, ''विशेषतः सांघिक खेळ खेळताना ही मुले एकमेकांच्या मदतीने खेळू लागली आणि त्यांच्यातील दुरावा कमी होऊ लागला. तसेच मूल्यवर्धनच्या तासाला सगळ्या मुलांना बोलण्यासाठी, व्यक्त होण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. यामुळे सगळी मुले सगळ्यांच्या साथीने गाऊ, नाचू लागली.''



**मूल्यवर्धनच्या तासाला एकमेकांशी चर्चा करणारी मुले**

मूल्यवर्धनच्या तासाचा दुसरा फायदा असा की, मुलांच्या मनात शिक्षक–शिक्षिकांविषयीची वाढती आपुलकी आणि ओढ निर्माण झाली आहे. शोभा भानुसे या शिक्षिका सांगतात, ''अनेक वेळा जेव्हा एखाद्या मुलाच्या शर्टचे बटण तुटलेले आम्हांला दिसते, तेव्हा आम्ही सुई–दोऱ्याने नवीन बटण लावून देतो. आता ही मुले आमच्यासोबतच जेवतात तसेच आमच्याशी मनमोकळेपणाने बोलतात. सगळ्यात चांगली गोष्ट म्हणजे यातील बरीचशी मुले आता चांगला अभ्यास करू लागली आहेत, ज्यामुळे अभ्यासाचे महत्त्वही आता त्यांच्या लक्षात येऊ लागले आहे.''

पाचवीच्या वर्गातील मनीषा गायकवाड सांगते, ''मुख्याध्यापक सर दिवाळीचा सण त्यांच्यासोबत त्यांच्या घरी साजरा करतात. तसेच शाळेतील एखादा विद्यार्थी आजारी असतो, तेव्हा काही मुलांसमवेत मुख्याध्यापक सर त्या आजारी विद्यार्थ्याच्या घरी जातात. त्या मुलाला ते फूल देतात आणि बरे वाटले की शाळेत नक्की ये, असे सांगतात.''


**मुलांच्या घरोघरी जाऊन शाळेत येण्याचे आवाहन करणारे शिक्षक**

### शाळेबद्दलचे समज–गैरसमज दूर झाले :

विष्णू जाधव सांगतात, ''सुरुवातीला त्यांनी काही कुटुंबांशी चर्चा केली आणि त्यांना आपल्या मुलांना शाळेत पाठविण्याची विनंती केली; परंतु त्याचा काही फायदा झाला नाही.''

विष्णू जाधव यांच्या मते, शिकून नोकरी मिळत नाही तर मग शाळेत जाण्यात काही अर्थ नाही, असा कुटुंबातील व्यक्तींचा समज होता. त्यात अशा कुटुंबांची आर्थिक परिस्थितीही वाईट असते, त्यामुळे आपल्या मुलांनी मजुरी करून आपली मदत करावी, असेच त्यांना वाटते.

विष्णू जाधव यांना अशा कुटुंबातील लोकांच्या मनातील शाळेबद्दलचे हेच समज-गैरसमज दूर करायचे होते. शिक्षणाचे महत्त्व समजाविण्यासाठी विष्णू जाधव सतत या लोकांच्या घरी जात. त्यांनी गावातील प्रतिष्ठित व्यक्ती आणि समुदायातील लोक यांची एक सभाही शाळेच्या आवारात घेतली. यादरम्यान एक गोष्ट स्पष्ट झाली की, यातील अनेक परिवार शिक्षणासाठी लागणाऱ्या साध्या साध्या गोष्टीही आपल्या मुलांना खरेदी करून देऊ शकत नाहीत. त्यामुळे शाळेचा शिक्षक आणि कर्मचारी वर्ग वर्गणी गोळा करून अशा गरजू मुलांना आवश्यक सामग्री देतील, असे या सभेत ठरले.


शाळेतील मुलांच्या कुटुंबातील सदस्य आणि शिक्षक

याच शाळेतील धनंजय याचे वडील रवींद्र गायकवाड सांगतात, ''अनेकवेळा तर शाळेतील शिक्षक पालकांच्या मजुरीच्या ठिकाणी जाऊन, त्यांना भेटून सांगत की, मुलांनी कोणतेही काम चांगल्याप्रकारे करावे आणि फसविणाऱ्या व्यक्तीपासून सावध राहावे, असे वाटत असेल, तर शिक्षण गरजेचे आहे. मुले नियमित शाळेत आली तर दारूच्या वाईट व्यसनापासून दूर राहण्याचे शिक्षण त्यांना मिळेल, त्यांना पैशाचा हिशोब आणि पैशाची बचत करायला शिकवू असे सारे, हे शिक्षक मुलांच्या पालकांना समजावून सांगतात.''

मूल्यवर्धनच्या माध्यमातून मुख्याध्यापक या नात्याने विष्णु जाधव या आदिवासी मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणू इच्छितात. शिक्षणाच्या जोरावर नोकरी मिळवून स्वत:च्या पायावर उभ्या राहिलेल्या समुदायातील काही विशेष व्यक्तींची यादीही विष्णू जाधव यांनी केली आहे. या विशेष व्यक्तींचा आदर्श मुलांनी घ्यावा, असा त्यांचा मानस आहे. या साऱ्या प्रयत्नांमुळे शिक्षणाने त्यांचे आयुष्य बदलू शकते, अशी आशा नव्या पिढीत निर्माण झाली आहे.

# १२. याच शाळेत शिकणार!

**औरंगाबादपासून जवळपास २०० किलोमीटर दूर दुर्गम भागातील एक शाळा मूल्यवर्धनकडून मिळालेल्या शिकण्याच्या सहयोगी अध्ययन पद्धतीमुळे चर्चेत आहे. ही पद्धत मुलांना इतकी आवडत आहे की ती दररोज २४ किलोमीटर प्रवास करून या शाळेत शिकायला येत आहेत.**



**शाळा परिसराचे दृश्य**

ही शाळा आहे औरंगाबाद जिल्ह्यातील, सोयगाव तालुक्यामधील डाभा या गावची जिल्हा परिषद प्राथमिक शाळा. काही वर्षांपूर्वी शाळेची स्थिती अशी होती की डाभा गावातील मुले देखील शिकण्यासाठी इतर गावांतील खाजगी शाळांमध्ये जात असत. तेव्हा येथे शिकणाऱ्या मुलांची संख्या शंभराहूनही कमी होती; पण आज येथे १७० मुले शिकतात. त्यात ९६ मुले तर ७५ मुली आहेत.

मराठी माध्यमाची ही शाळा जी कधीकाळी उदास व शांत असायची, ती आज तेथे शिकणाऱ्या मुलांच्या चिवचिवाटाने गजबजून गेली आहे. या शाळेची लोकप्रियता इतकी आहे की, आजूबाजूच्या गावांतून जवळपास १०० मुले येथे शिकायला येतात. त्याचवेळी मूलभूत शिक्षणाबद्दल मुलांबरोबरच परिसरातील सर्वच नागरिकांमध्ये सजगता निर्माण झाली आहे. महत्वाची गोष्ट अशी की या शाळेने हा दर्जा फक्त दीड वर्षांच्या काळात मिळविला आहे. प्रामुख्याने शेती हा व्यवसाय असणाऱ्या जवळपास एक हजार लोकसंख्येच्या या गावात १९६० मध्ये शाळा सुरू करण्यात आली आहे.

दुसरीकडे ग्रामस्थ सांगतात की, गावातील मुले या शाळेत शिकण्यासाठी जात नसत कारण शाळेकडे फक्त पडकी इमारत होती. शाळेत ना वीज होती, ना शौचालय, ना बाग. शिकविण्यासाठी शिक्षकांची नेहमी कमतरता असायची. शाळेची ही परिस्थिती सुधारण्यासाठी शाळेतील काही शिक्षकांनी सरपंचांबरोबर मिळून काही प्रयत्न देखील केले होते, पण त्याचा अपेक्षित परिणाम झाला नाही.

### मूल्यवर्धनमुळे पडला फरक :

मूल्यवर्धनमुळे परिस्थिती खूप वेगाने बदलण्यास सुरुवात झाली. याबाबतीत शिक्षक ज्ञानेश्वर मख यांनी सांगितले, ''जुलै २०१८ मधील गोष्ट आहे, आम्ही सोयगाव येथे मूल्यवर्धनचे प्रशिक्षण घेतले, पहिल्यांदा त्याची संकल्पना समजून घेतली. या प्रशिक्षणानंतर आम्ही मूल्यवर्धनमधील सहयोगी अध्ययन पद्धती मुलांनीच एकमेकांकडून शिकण्याची ही पद्धत वापरायला सुरुवात केली आहे. या पद्धतीला



**मूल्यवर्धन उपक्रमात विद्यार्थी जोडी चर्चेतून शिकत आहेत**

आम्ही 'आपापसात शिकू' असे नाव दिले. यामध्ये जोडी आणि गट चर्चेच्या माध्यमातून इयत्ता दुसरी, तिसरीतील मुले देखील मराठीतील अनेक गोष्टी सहजपणे वाचू लागली आणि हजारापर्यंत आकडे मोजू लागली. त्यांच्यात कमालीचा विश्वास आला.''

इयत्ता चौथीची श्रद्धा दांडगे हिने सांगितले, ''आधी जेव्हा शिक्षक आम्हांला काही प्रश्न विचारत असत तेव्हा भीती वाटत असे.'' पुढे ती म्हणाली, ''नंतर जेव्हा आम्ही पुस्तकांतील प्रश्न मित्रांना विचारू लागलो तेव्हा घाबरण्याचे काही कारणच उरले नाही. जेव्हा आपण कोणाला काही बरोबर सांगतो आणि तो शिकतो किंवा आपण त्यातून काही शिकतो तेव्हा आपल्याला खूप चांगले वाटते.''



मूल्यवर्धनमधील उपक्रम विद्यार्थ्यांबरोबर करताना शिक्षक

शिक्षक ज्ञानेश्वर मख याच गोष्टी सविस्तरपणे समजावून सांगतात. मूल्यवर्धनमध्ये मुले एकमेकांकडून शिकत असल्याने आपल्यातील कमतरता देखील एकमेकांना सांगू लागले. अशी मुले जेव्हा चांगले काम करण्यासाठी प्रयत्न करू लागली, तेव्हा नातेवाईकांनी त्यांना शाबासकी दिली. हुशार मुले देखील त्यांना मान देऊ लागली. अशाप्रकारे शिकण्यासाठी एका नवीन वातावरणाची निर्मिती झाली. यामुळे मुलांच्या उपस्थितीत आणि परीक्षेतील गुणांमध्ये सुधारणा झाली.

**संपूर्ण गाव झाले भागीदार :**

मूल्यवर्धनच्या माध्यमातून जेव्हा विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षक आणि पालकांमध्ये मैत्रीपूर्ण संबंध निर्माण झाले तेव्हा शाळेने 'आपापसात शिकू या' याला मोहिमेचे स्वरूप देऊन संपूर्ण गावाला याबरोबर जोडण्याचे ठरविले.



बैलगाडीतून विद्यार्थ्यांना शाळेत नेताना शिक्षक व ग्रामस्थ

याबद्दल मुख्याध्यापक जनार्दन साबळे यांनी आपला अनुभव सांगितला. ते म्हणाले, ''मूल्यवर्धन चालू झाल्यावर लगेचच आम्ही गावातील लोकांना शिक्षणाच्या या नवीन पद्धतीबद्दल सांगू लागलो. हळूहळू शाळेच्या सार्वजनिक कार्यक्रमांत स्थानिक लोकांना या पद्धतीबद्दल विस्ताराने सांगणे चालू केले. त्यांच्या बरोबर सतत चर्चा करून याला एका मोहिमेचे स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. तुमच्या सहकार्याने या शाळेला उत्कृष्ट शाळा बनविण्याचा आमचा प्रयत्न आहे असे आम्ही लोकांना सांगत असू. आम्ही सुट्टीच्या दिवशी देखील अतिरिक्त तासिका घेतल्या तेव्हा लोकांना वाटले की, मुलांच्या भल्यासाठी आम्ही चांगला प्रयत्न करीत आहोत.''

यानंतर गावकऱ्यांनी वर्गणी जमा करून शाळेसाठी काही पैसे आणि जरुरीचे सामान एकत्र केले. काही गावकरी श्रमदानासाठी पुढे आले. अशाप्रकारे या शाळेला सुंदर, सुविधायुक्त आणि डिजिटल बनविण्यासाठी गावकऱ्यांनी शिक्षकांची मदत केली.



**मूल्यवर्धन सहयोगी अध्ययन पद्धतीने बदलले विद्यार्थ्यांचे वर्तन**

याविषयी शिक्षक संजयकुमार चव्हाण यांनी सांगितले, ''ग्रामपंचायतीच्या पुढाकारातून जिल्हा परिषदेद्वारे २५ लाख रुपयांच्या आर्थिक निधीतून शाळेच्या नव्या इमारतीची उभारणी पूर्वीच झाली होती. या नव्या इमारतीमध्ये मूल्यवर्धनचे उपक्रम चांगल्या प्रकारे घेतले जाऊ लागले. मुले चांगल्या प्रकारे शिकू लागली. आम्ही गावकऱ्यांना याबद्दल सांगितले तेव्हा त्यांनी या इमारतीच्या रंगरंगोटीसाठी वर्गणीतून २ लाख रुपये जमा करून दिले.''

यानंतर जेव्हा गावकऱ्यांनी आणखी मदत केली तेव्हा पाण्यासाठी मोठी टाकी आणि विजेची देखील व्यवस्था करण्यात आली. पूर्वी शाळेच्या परिसरात एकही झाड नव्हते; पण आता गावकऱ्यांच्या मदतीने येथे गुलाब, नारळ आणि अशोकासारखी अनके झाडे पहावयास मिळतात.

शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी या शाळेला सर्वाधिक गरज होती ती पुरेशा शिक्षक संख्येची, जेणेकरून शिक्षक प्रत्येक विद्यार्थ्यावर लक्ष देऊ शकतील. याविषयी शिक्षकांनी सांगितले की, यासाठी सरपंचांनी गावकऱ्यांबरोबर एका बैठकीचे आयोजन केले होते. चांगल्या शिक्षणासाठी चांगले शिक्षक शोधावे लागतील असे यावेळी चर्चेतून समोर आले. यानंतर आजूबाजूच्या गावांतून तीन शिक्षक मिळाले जे पैसे न घेता मुलांना शिकविण्यास तयार होते.

मुलांबरोबर चर्चा केल्यावर त्यांनी सांगितले की, त्यातील अनेक मुले १२ किलोमीटर दूरच्या गावातून शिकण्यासाठी येथे येतात. यामध्ये सावलदबारा, नांदगाव, घाणेगाव तांडा, मालखेडा, पलासखेडा आणि हिवरी इत्यादी अनेक गावे आहेत. आपल्या मुलांना शाळेत सोडण्यासाठी आणि घरी घेऊन जाण्यासाठी मुलाच्या नातेवाईकांनी दोन जीप गाड्यांची व्यवस्था केलेली आहे.



**संपूर्ण शाळा पर्यावरणाविषयी जागरूक होत आहे.**

पालकांच्यावतीने विलास यांनी सांगितले की, दुसऱ्या गावातील खाजगी शाळांमध्ये वार्षिक १५ ते २० हजार रुपये फी देऊनही जेवढे चांगले शिक्षण मिळत नव्हते, तेवढे चांगले शिक्षण येथे मिळत आहे. ते म्हणाले, ''ग्रामीण भागात इतकी चांगली शाळा असणे आणि ती देखील मोफत उपलब्ध असणे ही आमच्यासाठी फायदेशीर गोष्ट आहे.''

गावाच्या सरपंच भारती लोखंडे म्हणाल्या, ''आम्ही जवळपासच्या गावांनी ठरविले आहे की, या शाळेची प्रत्येक मागणी पूर्ण करण्याचा आम्ही प्रयत्न करू. दुसऱ्या गावातील मुले आमच्या शाळेत शिकायला येतात ही आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे.''

# १३. संधी मुलींसाठी

**बुलढाणा जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणापासून जवळपास ७० किलोमीटर अंतरावर खामगाव तालुक्यात एक उच्च प्राथमिक शाळा आहे. या शाळेतील एक शिक्षक मुलींच्या बाबतीत केला जाणारा भेदभाव दूर करीत आहेत, त्याचबरोबर मुले आणि मुली यांच्यामध्ये असलेले अंतर आणि बुजरेपणा दूर करीत आहे.**

याचा परिणाम म्हणजे बहुतांश मुली आपले विचार मुलांसमोर व्यक्त करू शकतात; एवढेच नाही तर या मुली मुलांच्या बरोबरीने अनेक खेळ, कृती आणि चर्चा यांच्यामध्ये भाग घेऊन आपली नेतृत्व क्षमताही सिद्ध करीत आहेत. दोन वर्षांपूर्वी अशी स्थिती नव्हती. या शाळेमध्ये चालणाऱ्या मूल्यवर्धनच्या तासाला असे काही विशेष प्रयत्न करण्यात आले, ज्यामुळे आज केवळ शाळेतील मुलांचाच नाही तर संपूर्ण गावाचा मुलींकडे पाहण्याचा दृष्टिकोन हळूहळू बदलतो आहे.



**शाळेचा परिसर**

ही गोष्ट आहे, हिंगण कडेगाव येथील मराठी माध्यमाच्या जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेची! येथे हे सांगितले पाहिजे की, जवळपास २,५०० इतकी लोकसंख्या असलेल्या या गावामध्ये राहणाऱ्या लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आणि मजुरी आहे. सन १८७३ मध्ये म्हणजे साधारण सव्वाशे वर्षांपूर्वी या गावामध्ये सुरू झालेल्या शाळेत आज मुख्याध्यापकांसह सहा शिक्षक आहेत. शाळेत एकूण १५४ विद्यार्थी असून त्यात ७९ मुली आणि ७५ मुले आहेत. या शाळेमध्ये जुलै २०१७ पासून मूल्यवर्धन या विषयाचे वर्ग सुरू आहेत.

## मुली आता गटांमध्ये बसतात :



**मैदानावरील खेळातून मुलींमध्ये नेतृत्व क्षमता वाढते**

शिक्षक राजेश कोगदे म्हणाले, ''शाळेमध्ये या आधी सफाई करणे आणि रांगोळी काढणे अशी कामे बहुतेक मुलीच करायच्या परंतु मुलेही आता या कामामध्ये आवड असल्याचे सांगतात. यापूर्वी वर्गामध्ये जी बैठक व्यवस्था होती त्यानुसार मुली बहुतेक वेळा मागे आणि मुलांपासून वेगळ्या बसत असत परंतु आता मुली मुलांबरोबरच गटाने बसतात. मुला-मुलींचे हे गट दररोज बदलले जातात. त्याचप्रमाणे त्यांची बसण्याची जागाही बदलली जाते. यामुळे सगळी मुले आणि मुली एकमेकांना चांगल्या पद्धतीने ओळखू लागले आहेत. यामुळे त्यांना आपापसांत मिळून मिसळून राहण्याची संधी मिळते आहे.''

**वर्गामध्ये मुलांची बैठक व्यवस्था प्रत्येक दिवशी बदलते :**

मुले आणि मुली यांच्यामधील अंतर दूर होऊ लागल्याचे एक दृश्य दुपारच्या मधल्या सुट्टीत पहायला मिळते. जेवणाच्या सुट्टीत ही मुले एकत्र बसून आपापले डबे खातात आणि डब्यातील पदार्थ वाटून घेतात. शाळेतील शेवटच्या तासाला अनेक मुले, मुलींचे म्हणून समजल्या जाणाऱ्या खेळांमध्ये भाग घेतात आणि मुलीही मुलांच्या खेळांमध्ये सहभागी होतात.

**...यामुळे येतेय समानता!**

मुलांमध्ये होणाऱ्या या बदलांबद्दल बोलताना मुख्याध्यापक श्रीकांत वानखडे म्हणाले, ''मूल्यवर्धनमुळे केवळ एका गटातील किंवा स्तरातील मुलां-मुलींमधील अंतर कमी झाले असे नाही, तर हळूहळू सगळ्याच मुला-मुलींच्या नात्यामध्ये एक सहजता येते आहे.''

शाळेतल्या इतर शिक्षकांनी सांगितले, ''दोन वर्षांपूर्वी मुली शाळेचा अभ्यास वगळता शाळेत आयोजित केलेल्या कोणत्याही कार्यक्रमांमध्ये सहभागी होत नसत. गावकऱ्यांचा समावेश असलेल्या कार्यक्रमात मुख्य पाहुण्यांचे स्वागत करण्याची वेळ यायची तेव्हा मुलेच पुढे येऊन ते करत. कोणत्याही कृती किंवा चर्चेमध्ये मुलींचा सहभाग जवळपास नसायचाच. स्वत:ची मते, स्वत:चे विचार व्यक्त करायला त्या घाबरत होत्या. त्याच वेळी मुलेही त्यांच्यापासून अंतर राखून असायची आणि मुलींना मदत करायचे नाहीत. त्यामुळे तसे पाहता शाळेमध्ये एक असमानतेचे वातावरण स्पष्टच दिसत होते.''



**प्रत्येक दिवशी बदलणारी मुलांची बैठक व्यवस्था**

राजेश कोगदे म्हणाले, ''मूल्यवर्धनमध्ये समाविष्ट अनेक शिक्षणपद्धती, कृती आणि चर्चा या लिंगभेद दूर करण्याच्या दृष्टीनेच आखण्यात आल्या आहेत. मुले गेली दोन वर्षे मूल्यवर्धनच्या तासाला या विषयाशी संबंधित अनेक कृती आणि चर्चा यांचा अभ्यास करीत आहेत. यामुळे अनेक मुलांच्या वागणुकीत बदल होताना दिसत आहे. यातील एक बदल म्हणजे, मुले आणि मुली यांचे विचार, त्यांची समज, त्यांची कामे, त्यांचे खेळ आणि त्यांचा अभ्यास यात कोणताही फरक नाही; उलट असे दुसऱ्याशी वेगळे वागण्याचे काहीही कारण नाही, याचा अनुभव मुले समूहाने किंवा गटाने चर्चा करताना येत आहे.''

**अनेक सांघिक कृतींचा उद्देश लिंगभेद दूर करणे :**

चौथीच्या वर्गातील पायल जाधव म्हणाली, ''आता पुष्कळ मुले आणि मुली दिलेले काम एकत्रितपणे पूर्ण करतात. यामुळे कोणतेही काम चांगले आणि लवकर होते; जसे सकाळी वर्गाची साफसफाई करायची असेल किंवा दरवाज्याजवळ रांगोळी काढायची असेल अथवा वर्गातील पसारा आवरून, वस्तू जागच्या जागी ठेवायच्या असतील, तर आता मुले मुलींना मदत करतात.''

खरे तर मुलांमध्ये ही परस्पर सहकार्याची सवय आणि त्यांचा आपापसातील ताळमेळ या दोनही बाबी मूल्यवर्धनच्या तासाला जोड्या किंवा गट पाडून केलेल्या चर्चांमधून विकसित होऊन वाढीस लागल्या आहेत. अनंत होगे हे शिक्षक

म्हणतात, ''कोणतीही कृती आणि चर्चा ही गट किंवा जोड्या करून केल्याने आपले मत व्यक्त करण्याची संधी मुलांसोबत मुलींनाही मिळाली. त्यामुळे अनेक विषयांवर आणि मुद्द्यांवर मुली आपली मते मांडू लागल्या आहेत. त्यामुळे त्यांच्यातील आत्मविश्वास वाढतो आहे. त्याचबरोबर मुलांमध्येही समानतेची भावनाही वाढीस लागली आहे.''

राजेश कोगदे यांनी मूल्यवर्धनच्या तासाला घडलेली एक घटना सांगितली. एक सांघिक खेळ खेळण्यापूर्वी काही मुली मुलांचा हात पकडायला लाजत होत्या. त्यानंतर त्यांनी पुढच्या मूल्यवर्धनच्या तासाला मुलांसोबत या विषयावर चर्चा केली. या चर्चेदरम्यान काही मुलींना हे पटले की, त्यांच्यामध्ये असलेला बुजरेपणा दूर होईल तेव्हाच त्याही खेळ, अभ्यास किंवा कोणत्याही कामात मुलांच्या बरोबरीने कामगिरी करू शकतील. चौथीच्या वर्गातील कल्याणी जाधव म्हणाली, ''हे अवघडलेपण किंवा हा बुजरेपणा दूर करण्यासाठी मी माझ्या मैत्रिणींना मुलांबरोबर खेळायला सांगितले होते.''

कुटुंबाचीही दृष्टी बदलते आहे. मुले आणि मुली यांच्यातील हे अंतर कमी करणे, हे वाटते तितके सोपे नव्हते. विशेषतः ज्या कुटुंबातील मुली शाळेत शिकत होत्या, अशा कुटुंबातील लोकांना ही गोष्ट कळल्यावर त्यांनी शाळेत येऊन त्याबद्दल नाराजी आणि आक्षेप नोंदविला. राजेश कोगदे म्हणाले, ''काही गावकऱ्यांनी मुले आणि मुलींना शाळेच्या मैदानावर एकत्र खेळताना पाहिले, तेव्हा ते अस्वस्थ आणि बैचैन झाले, त्यांना धक्का बसला. एका ज्येष्ठ गावकऱ्याने तुम्ही त्यांना वेगळे वेगळे खेळू का देत नाही अशीही विचारणा केली आणि तसे करावे, असे सांगितले.''

तेव्हा त्या ज्येष्ठ माणसाला राजेश कोगदे यांनी सांगितले की, मुले मुलींना त्रास देत नाहीत. कोणत्याही मुलीची काही अडचण असती तर तिने याला नकार दिला असता परंतु अनेक मुली आपल्या इच्छेने या कृती आणि खेळांमध्ये सहभागी होत आहेत. यामुळे त्या पूर्वीपेक्षा चांगल्या पद्धतीने शिकू व समजू शकत आहेत. यामुळे यात घाबरण्यासारखे काही नाही.

पद्माकर जाधव नावाचे एक गावकरी सांगतात की, अनेक मुली आता अधिक अभ्यास करू लागल्या आहेत. या मुली पूर्वीपेक्षा अधिक व्यवस्थित आणि चांगल्या वागत आहेत. त्यांच्या वागणुकीत झालेल्या बदलाचा परिणाम म्हणून त्यांच्या कुटुंबातील लोकांच्या विचारांमध्येही बदल होतो आहे. त्यामुळे शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रमात मुली हिरिरीने भाग घेतात. काही मुली स्वागत समारंभामध्ये सूत्रसंचालनाची जबाबदारी मुलांपेक्षा चांगल्या पद्धतीने सांभाळत आहेत. अनेक वेळा अशा कार्यक्रमांमध्ये त्या मुलांपेक्षा चांगले सादरीकरण करतात.



**लिंगभेद दूर करण्यासाठी मैदानावर घेतले जाणारे उपक्रम**

मूल्यवर्धनच्या तासाला घेण्यात येणाऱ्या काही चर्चा आणि कृती यासंबंधी गृहपाठ देऊन अनेक वेळा शिक्षक मुलांबरोबरच त्यांच्या पालकांनाही शाळेशी जोडून घेत आहेत. परमेश्वर पटोले नावाचे एक गावकरी सांगतात की, साधारणपणे अनेक मुली शाळेतून घरी आल्यावर शाळेत काय झाले आणि त्यांनी काय काय केले, हे घरी सांगतात. शाळेशी संबंधित अनेक सूचना त्यांना मिळाल्या की त्यांचा आपल्या मुलांवरील विश्वास वाढीस लागतो.

राजेश कोगदे यांच्या म्हणण्यानुसार, मुले आणि मुली यांच्यातील हे अंतर कमी करताना त्यांना फारशी अडचण आली नाही. मूल्यवर्धनच्या तासाला मुला–मुलींचे गट आणि जोड्या पाडून अधिकाधिक कृती आणि चर्चा केल्याने त्यांना हे शक्य झाले. या चर्चा आणि कृती यांच्यामुळे मुला–मुलींना एकत्र राहण्याची आणि चर्चा करण्याची संधी मिळाली. त्यामुळे बहुतांश मुले आणि मुली एकमेकांबरोबर अधिक वेळ घालवू लागली.

दुसऱ्या बाजूला शाळेच्या व्यवस्थापन समितीने मुलांच्या कुटुंबांतील सदस्यांशी वेळोवेळी चर्चा केली, बैठका घेतल्या. यामध्ये अनेक वेळा मूल्यवर्धनच्या तासाला काय शिकविले जाते याची चर्चा करून पालकांच्या मनातील शंका आणि संशय दूर करण्यात आले.

**शिक्षकांच्या विचारातही झाला बदल :**

मूल्यवर्धनमुळे लिंगभेद आणि त्यासंबंधी होणाऱ्या बदलांच्या निमित्ताने शिक्षकांच्या विचारातही फरक पडला असल्याचे राजेश कोगदे सांगतात. ते पुढे म्हणतात, ''पूर्वी आम्हांला वाटत असे की, मुले आणि मुली यांच्यातील हे अंतर किंवा हा भेद कमी होऊ शकत नाही, पण मूल्यवर्धन या विषयांतर्गत केलेल्या आणि करून घेतलेल्या विविध चर्चा आणि कृती यांमुळे जर कोणत्याही कार्यात यशस्वी व्हायचे असेल, तर संपूर्ण वर्गाने किंबहुना सर्व शाळेनेच योगदान देणे महत्त्वाचे आहे, हा विचार मूल्यवर्धनने त्यांच्यामध्ये रुजविला. मुलींनी जर सक्रिय सहभाग नोंदविला नाही तर शाळेच्या गुणवत्तेचा स्तर एका ठरावीक मर्यादेपर्यंतच सुधारता येतो, हे त्यांच्या लक्षात आले.''

यावरून हे नक्कीच स्पष्ट होते की, जास्तीत जास्त मुली जोवर शाळेतील प्रत्येक कृतीत आणि खेळात भाग घेत नाहीत, तोपर्यंत शाळेमध्ये मोठे बदल होऊ शकत नाहीत. ही गोष्ट लक्षात आल्यावर येथील शिक्षकांना असे जाणवले की, मूल्यवर्धनमुळे मुलींनी जर समानतेचे मूल्य आत्मसात केले असेल तर त्यांना आपल्या समाजातील आणि कुटुंबातील अन्य महिला आणि मुलींचेही महत्त्व समजेल.

असे असले तरीही अनेक मुले आणि मुली त्यांच्यात केल्या जाणाऱ्या भेदभावाबद्दल फार काही सांगू शकत नाही; मात्र त्यांच्या विचारात झालेला बदल त्यांच्या वागणुकीतून स्पष्ट जाणवतो.

चौथीच्या वर्गातील शुभम जाधव म्हणाला, ''आम्ही सारे समान आहोत. मुली आमच्या मैत्रिणी होऊ शकत नाहीत, असा विचारच आम्ही करीत नाही.''

# १४. ऑनेस्टी बॉक्स

**बुलढाणा जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणापासून ७० किलोमीटर अंतरावरील खामगाव तालुक्यात हिवरखेड नावाचे गाव आहे. या गावामध्ये असलेल्या जिल्हा परिषदेच्या मराठी उच्च प्राथमिक शाळेमधील शिक्षक शाळेतील मुलांना प्रामाणिकपणाचे महत्त्व समजावून सांगण्यात यशस्वी होत आहेत. मूल्यवर्धन कार्यक्रमांतर्गत शिक्षकांनी केलेल्या विशेष प्रयत्नांचा हा परिणाम आहे.**

शाळेतील मुलांनी शाळेच्या आवारात प्रार्थनेच्या ठिकाणी असलेल्या कायमस्वरूपी स्टेजवर एक 'ऑनेस्टी बॉक्स' ठेवला आहे. कोणत्याही मुलाला कोणतीही वस्तू शाळेच्या आवारात पडलेली दिसली, तर तो विद्यार्थी ती वस्तू या 'ऑनेस्टी बॉक्स' मध्ये टाकतो.



**हिवरखेड गावातील प्राथमिक शाळेचा परिसर**

प्रत्येक दिवशी प्रार्थना म्हणणारी काही मुले हा 'ऑनेस्टी बॉक्स' उघडून एकेक करून यातील वस्तू बाहेर काढतात आणि कोणती वस्तू शाळेतील कोणत्या मुलाची आहे, याची विचारणा करतात. त्यानंतर ती वस्तू ज्या मुलाची असते, तो मुलगा/मुलगी स्टेजवर येतो आणि शांतपणे उभा राहतो. त्यानंतर त्याची वस्तू त्याला परत केली जाते. यावेळी या 'ऑनेस्टी बॉक्स' मध्ये ती वस्तू टाकणाऱ्या विद्यार्थ्याचेही नाव पुकारले जाते आणि त्यालाही स्टेजवर बोलावले जाते. इतर मुले टाळ्या वाजवून त्याला धन्यवाद देतात आणि त्याचे अभिनंदन करतात.




**मुलांच्या कल्पनेतून निर्माण झालेला 'ऑनेस्टी बॉक्स'**

येथे हे सांगितले पाहिजे की, हिवरखेडची लोकसंख्या ३,५०० असून गावातील बहुतांश रहिवासी आदिवासी समाजातील आहेत. या समाजातील अनेक लोक वर्षातील सहा ते आठ महिने आपल्या बकऱ्या चारण्यासाठी सीमावर्ती भागात घेऊन जातात. सन १९०६ मध्ये स्थापन झालेल्या या शाळेत आज मुख्याध्यापकांसह ९ शिक्षक-शिक्षिका आहेत. या शाळेत एकूण २६५ विद्यार्थी असून त्यात १४७ मुली आणि ११८ मुले आहेत. सप्टेंबर २०१८ पासून या शाळेत 'मूल्यवर्धन' हा विषय शिकविण्यास सुरुवात झाली आहे.

### संपूर्ण व्यवस्था पारदर्शक :

मुले आज जो प्रामाणिकपणा दाखवीत आहेत, त्यामध्ये मूल्यवर्धनचे शिक्षक किशोर भागवत यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. ते सांगतात




**शाळेतील मुलांना मूल्यवर्धन उपक्रमातून समजले प्रामाणिकपणाचे महत्त्व**

की, सुरुवातीला एखाद्या मुलाला एखादी वस्तू पडलेली दिसली की, ती वस्तू कोणाला द्यावी की देऊ नये आणि द्यावी तर ती वस्तू नक्की कोणाला द्यावी, हे त्या मुलाला समजायचे नाही. लहान मुले आपल्या आवडत्या वस्तू सहजासहजी परत करीत नाहीत. काही मुले तर शाळेत पडलेल्या मिळालेल्या काही वस्तू घरी देखील घेऊन जात असत. अशा वेळी मुलांची वागणूक बदलण्यासाठी मूल्यवर्धनच्या तासाची खूप मदत झाली. या दरम्यान या मुलांना प्रामाणिकपणा आणि त्याचे महत्त्व या दोन्ही गोष्टी अगदी खोलवर समजल्या. याचा परिणाम म्हणजे यानंतरच्या काही महिन्यातच मुलांनी शाळेच्या परिसरात हरविलेल्या काही गोष्टी अथवा वस्तू जसे की, सामान, अभ्यासाची सामग्री आणि एकूण २००० रुपये इतकी रोख रक्कम हे सारे 'ऑनेस्टी बॉक्स' मध्ये जमा केले आहे.

दुसऱ्या बाजूला मुलांमध्ये होणाऱ्या या बदलाबद्दल मुख्याध्यापक रामदास नामदेव समाधानी आहेत. ते म्हणाले, ''शाळेत अडीचशे पेक्षा जास्त मुले असल्याने शाळेच्या परिसरात मिळालेल्या विविध गोष्टींपैकी कोणती वस्तू कोणाची आहे, याचा शोध घेणे अवघड जात असे; परंतु आता 'ऑनेस्टी बॉक्स' नावाच्या व्यवस्थेमुळे दररोज एक छोटासा कार्यक्रम होतो. हा कार्यक्रम सार्वजनिक असतो. याचा फायदा असा की, एखादा विद्यार्थी संपूर्ण शाळेसमोर उभे राहून खोटे बोलू शकत नाही. 'ऑनेस्टी बॉक्स' मध्ये असलेली वस्तू त्याची नसली तरीही ती त्याचीच आहे, असे तो सांगू शकत नाही. खरं तर 'ऑनेस्टी बॉक्स' मधून बाहेर आलेली एकच वस्तू दोघांच्या मालकीची आहे, असा एकही प्रसंग आजवर घडला नाही.''

### का तयार करण्यात आला, ऑनेस्टी बॉक्स? :

प्रश्न असा आहे की, शाळेच्या आवारात 'ऑनेस्टी बॉक्स' चा वेधक विचार नेमका कसा आला असावा? याबाबतीत किशोर भागवत यांनी पूर्वी घडलेला एक प्रसंग सांगितला. ते म्हणाले, ''एकदा तिसरीच्या वर्गात शिकणाऱ्या प्रशांत मानकर याला चांदीचे नाणे मिळाले. त्याने ते मला दिले. पुढच्याच दिवशी मी प्रार्थनेला जमलेल्या सर्व मुलांना कोणाचे चांदीचे नाणे हरवले आहे का, असे विचारले. त्यावेळी मंगेश सातव नावाचा मुलगा म्हणाला की, त्याचे चांदीचे नाणे हरवले आहे. जेव्हा त्याने त्या नाण्याचे हुबेहूब वर्णन सांगितले आणि इतर कोणत्याही मुलाने




**'ऑनेस्टी बॉक्स'मध्ये जमा झालेली वस्तू ज्या मुलाची आहे त्याला परत देण्यात येते.**

त्या नाण्यावर दावा केला नाही तेव्हा मी ते चांदीचे नाणे त्याला दिले. त्याच दिवशी आम्ही सर्व मुलांसोबत एक 'ऑनेस्टी बॉक्स' तयार करण्याचा निर्णय घेतला.''

'ऑनेस्टी बॉक्स' तयार करण्याचा हा निर्णय म्हणजे प्रामाणिकपणाशी संबंधित मूल्यवर्धनच्या तासाला घेण्यात आलेल्या चर्चा आणि कृती यांचा परिणाम होता. किशोर भागवत म्हणाले, ''चौथीच्या वर्गात चर्चा केलेल्या 'प्रामाणिकपणाचे बीज' आणि 'न्यायाने वागा' या गोष्टी महत्त्वाच्या ठरल्या.' या दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या चर्चेमध्ये मुलांनी सांगितले की, जर एखाद्या व्यक्तीची वस्तू हरवली आहे आणि ती दुसऱ्या व्यक्तीने चोरल्याचा त्याला संशय असेल, तर त्याने त्या दुसऱ्या व्यक्तीला आपली बाजू मांडण्याची संधी दिली पाहिजे. मुलांनी असेही सांगितले की, यापुढे त्यांना कोणतीही वस्तू पडलेली दिसली, तर ते ती वस्तू परत करतील.''

मुलांच्या या युक्तीकडे शाळेचे व्यवस्थापन कशाप्रकारे पाहते, याबाबत मूल्यवर्धन विषयाच्या शिक्षिका सोनाली डांगे म्हणाल्या, ''जेव्हा एखाद्या मुलाची एखादी वस्तू हरवते तेव्हा सगळ्या वर्गाच्या अभ्यासावर त्याचा परिणाम होतो. अनेक वेळा अशी मुले आपापसात भांडू लागतात; पण आता अशी वेळ फारशी येत नाही.''



**मुलांना शिस्त लागते आहे.**

छाया दळवी या शिक्षिका म्हणाल्या, ''मुलांमध्ये प्रामाणिकपणाची भावना वाढीस लागण्यासाठी इतर विषयांशी संबधित कृती आणि चर्चा यांचीही मदत झाली. यामध्ये 'योग्य आणि अयोग्य', 'चांगली किंवा वाईट वागणूक', 'चांगला मित्र कोण?', 'तुम्हांला काय वाटते?' आणि 'माझे चांगले गुण' इत्यादी विषयांवरील कृती आणि चर्चांचा समावेश होता.''

महत्त्वाची गोष्ट ही आहे की, यातील काही मुले प्रामाणिकपणाचे महत्त्व इतरांनाही चांगल्या पद्धतीने पटवून देत आहेत. चौथीच्या वर्गातील राशी हटकर सांगते की, ती तिच्यापेक्षा लहान असलेल्या मुलांना दुसऱ्यांच्या वस्तू सापडल्यास त्या वस्तू त्या व्यक्तीस परत करायला सांगते. तिच्याच वर्गातील अक्षरा वाडकर सांगते की, तिला प्रामाणिकपणाशी संबंधित इतर गोष्टी वाचायच्या आहेत, तसेच या गोष्टींबद्दल चर्चा करायची आहे. तिने याबाबत आपल्या वर्गशिक्षकांनाही सांगितले आहे.

शेवटी किशोर भागवत म्हणाले, ''या मूल्यांवर आधारित साहित्य त्यांना मुलांसाठी उपलब्ध करून द्यायचे आहे. असे केल्याने विविध मुद्द्यांवर मुले चर्चा करतील आणि त्यांच्या विचारात एक स्पष्टता येईल.''

# १५. चिमुकल्या हातांचे मोठे काम

**साधारणपणे पर्यावरण शिक्षणासारखे विषय फक्त पुस्तके आणि शाळेच्या चार भिंतींमध्ये अडकून पडलेले दिसतात; परंतु मूल्यवर्धनची बालकेंद्री शिक्षणपद्धती लहान वयापासूनच मुलांना पर्यावरणाला वाचविण्यासाठी आणि पृथ्वीला सजविण्यासाठी प्रेरित करीत आहे. पर्यावरणाशी निगडीत अनेक गृहकार्य आणि उपक्रम मुलांबरोबर शिक्षक आणि पालकांचे संबंध ही मजबूत करीत आहेत, पण त्याबरोबरच यामुळे संपूर्ण गावदेखील पर्यावरणाबद्दल जागरूक होत आहे. उत्तर कोकण भागातील पालघर जिल्ह्यामध्ये अशीच एक शाळा आहे, जेथे पावसाळ्यात मुले मोठ्यांच्या मदतीने शेतात, मळ्यात, घरी, अंगणात झाडे लावत आहेत.**



**कर्दळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची इमारत**

ही शाळा जिल्ह्याच्या मुख्यालयापासून ४० किमी दूरवरील कर्दळ गावातील आहे. सुमारे अडीच हजार लोकसंख्या असणाऱ्या या गावात आदिवासी बहुसंख्य आहेत.

मराठी माध्यमाची ही शाळा १९७९ मध्ये स्थापन झाली आहे. जिल्हा परिषदेच्या या प्राथमिक शाळेत इयत्ता पहिली ते चौथीची एकूण ९० मुले शिकतात. छाया ठाकूर शाळेच्या मुख्याध्यापिका असून त्यांच्याबरोबर इतर चार शिक्षक शाळेत शिकवितात. या शाळेत मागच्या दोन वर्षांपासून मूल्यवर्धन कार्यक्रम राबविला जातो.

चौथीची शलौनी नगोबा आणि तिच्या वर्गातील इतर मुलांनी मूल्यवर्धनच्या गोष्टींतून झाडांचे महत्त्व ओळखले आहे. एवढेच नाही तर मूल्यवर्धन मधून प्रेरणा घेऊन त्यांनी मागील पावसाळ्यात अनेक ठिकाणी झाडे लावली आणि त्यांच्या संवर्धनाचे काम करून सर्वांची मने जिंकली आहेत.

'आपले छंद' आणि 'छंद का असायला हवे' अशा प्रकारचे मूल्यवर्धनचे उपक्रम आवडतात असे शलौनीने सांगितले. त्याशिवाय तिला तिसरीच्या मूल्यवर्धन विद्यार्थी उपक्रम पुस्तिकेतील 'कुटुंबाचे झाड' 'जगातली मुले' आणि 'आपण झाडे कशी वाचवू शकतो?' हे उपक्रम देखील आवडतात. एका वर्षापूर्वी जेव्हा ती तिसरीमध्ये होती, तेव्हा शाळेत हे उपक्रम करून तिच्या मनात विचार आला की, आपण आपल्या घरामागील मोकळ्या जागेत काही झाडे का नाही लावत?

शलौनी म्हणाली, ''मागील वेळी पावसाळ्यात आम्ही अकरा झाडे लावली. मी म्हणाले म्हणून पप्पांनी नर्सरीतून



**मूल्यवर्धन उपक्रम करताना विद्यार्थी आणि शिक्षक**



इयत्ता चौथीच्या विद्यार्थिनीने लावली ११ झाडे

मोगरा, तुळस, गुलाब ही रोपे आणली. आम्ही आंबा, चिकू, पेरू आणि मोसंबीची झाडे देखील लावली आहेत. आजीने खड्डे तयार करून दिले. मी आई बरोबर खड्ड्यांमध्ये माती टाकली आणि झाडांना पाणी दिले.''

याबद्दल शलौनीचे वडील धनराज नगोबा यांनी सांगितले की, त्यांच्या मुलीने झाडे लावण्यासाठी हट्ट करण्याचा तो पहिलाच प्रसंग होता. ते म्हणाले, ''तिने संपूर्ण वर्षभर झाडांना खतपाणी दिले. एकदा तिने तिच्या काकांना आजूबाजूची झाडे कापू नका असेही सांगितले.''

### ही तर आहे सुरुवात :

शलौनी येथेच थांबू इच्छित नाही. यावर्षी ती आपल्या घरामागे अकरापेक्षाही जास्त झाडे लावणार आहे असे तिचे म्हणणे आहे. यात पिंपळ, आवळा, कडूनिंब आणि नारळ ही झाडे असणार आहेत.

मुख्याध्यापिका छाया ठाकूर यांनी यापुढील नियोजन देखील केले आहे. त्या म्हणाल्या, ''मूल्यवर्धनच्या उपक्रमांत मुलांशी चर्चा करून त्यांनी लावलेल्या झाडांना नाव द्यायचे असे ठरविले आहे. मुले झाडांवर लहान मुलांवर प्रेम करतात. त्यांची चांगल्याप्रकारे काळजी घेतात. तसे शलौनीसारखी अशी अनेक मुले आहेत ज्यांना फळाफुलांची झाडे लावून आनंद होतो.''

शलौनी शिवाय इयत्ता चौथीचे कनक बाडाघावा, काव्य आगीवले, विकास गुप्ता आणि सुनील यादव या काही मुलांनी देखील मागील पावसाळ्यात झाडे लावली होती.

कनकने सांगितले की तिने 'झाडे लावा, झाडे वाचवा' या एका उपक्रमात भाग घेतला होता. त्यानंतर तिने झाडे लावण्याचा विचार केला. काव्यने सांगितले की त्याला हे माहीत होते की झाडांपासून शुद्ध हवा मिळते, पण शलौनीने झाड लावले म्हणून त्यानेही लावले. विकास म्हणाला की, त्याला झाडांच्या सावलीत खेळायला आवडते म्हणून त्याने झाडे लावली. सुनीलने सांगितले की झाडे लावणे खूप कष्टाचे काम आहे आणि ही गोष्ट त्याला त्याच्या आईने सांगितली आहे. त्याबरोबरच आईने झाडे लावण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली आणि वर्षभर झाडाची काळजी घेण्याविषयी चर्चा देखील केली.

### हा गृहपाठाचा परिणाम :

हे सर्व कशामुळे झाले? याविषयी शिक्षिका आरती संख्ये यांनी सांगितले की, मुलांनी झाडे लावावी यासाठी त्यांनी एक मार्ग शोधला होता. त्या म्हणाल्या, ''आम्ही मूल्यवर्धनच्या उपक्रमांदरम्यान मुलांना विचारत असतो की, कोणी किती झाडे लावली, किंवा कोणाचे झाड किती मोठे झाले? गृहपाठाच्या बाबतीत मुलांच्या आईबरोबर चर्चा होत असते तेव्हा आम्ही मोबाईलवर त्यांच्याशी बोलून त्यांना देखील झाडे लावण्यासाठी प्रेरित करीत असतो.''

बहुतेक मुले फळांची किंवा फुलांची झाडे का लावतात हा देखील उत्सुकतेचा विषय आहे. याविषयी शिक्षक कल्पेश पाटील म्हणाले, ''मुलं शाळेत अनेक प्रकारच्या फुलांचा आणि फुलांच्या हारांचा वापर करतात. त्यामुळे मुलांनी जास्त फुलझाडे लावली. यामुळे फुले विकत घेणे बंद झाले आणि आमची पैशांची बचत झाली. मुलांनी फुलांशी संबंधित कलांचे




**विद्यार्थी आणि समाजाला पर्यावरण जागृतीसाठी मूल्यवर्धनच्या माध्यमातून दिलेला संदेश**

प्रदर्शन भरविले. याशिवाय झाडे, रोपे, फुले यांमुळे परिसर हिरवा आणि सुंदर दिसायला लागला आहे.''

### नापीक जमिनीवर वाढविली आहेत १०० पेक्षा अधिक झाडे :

तेथेच मुलांच्या विनंतीवरून ग्रामपंचायत आणि गावकऱ्यांच्या मदतीने दोन वर्षांपूर्वी शाळेच्या जवळ नापीक जमिनीवर शंभर झाडे लावण्यात आली होती. तेव्हा विद्यार्थ्यांनी वृक्षलागवड संदर्भात एक फेरी काढली होती. याविषयी केंद्रप्रमुख कुंदा संख्ये यांनी सांगितले की, मूल्यवर्धन उपक्रमांमुळे झाडे लावण्याविषयी समाज आता पहिल्यापेक्षा अधिक सजग झाला आहे. त्या म्हणाल्या, ''मुले शिक्षकांबरोबर जाऊन नियमितपणे झाडांची काळजी घेतात.''

### सुजाण नागरिकत्वाचा घडला पाया :

मुलांची पर्यावरणाबद्दलची सजगता पाहून शाळा व्यवस्थापन समिती सदस्या सृष्टी देशमुख यांना त्यांचे बालपण आठवले. त्यांनी सांगितले की, त्या लहान होत्या तेव्हा फुलांवर उडणारी फुलपाखरे पकडण्याचा प्रयत्न करीत. तेव्हा त्यांच्या एका शिक्षिकेने त्यांना सांगितले की, फुलपाखरू मुठीत दाबले तर मरून जाईल. तेव्हापासून त्यांनी फुलपाखरे पकडणे बंद केले आणि आता त्या आपल्या आजूबाजूला दिसणाऱ्या फुलपाखरांची खूप काळजी घेतात.

ही गोष्ट सांगताना पुढे त्या म्हणाल्या, ''याचा अर्थ असा आहे की शिक्षक आणि विद्यार्थी यांचे एक विशिष्ट नाते असते आणि शिक्षकांनी सांगितलेली गोष्ट ते चांगल्याप्रकारे लक्षात ठेवतात. जर शिक्षक विद्यार्थ्यांवर पर्यावरण वाचविण्याचे संस्कार करीत असतील तर मुलांमध्ये ही भावना कायमस्वरूपी राहील.''

# १६. शाळा जुनीच, पण ओळख नवी

**औरंगाबाद जिल्ह्यातील दुर्गम भागात असलेल्या एका गावामध्ये आदिवासी समाज मोठ्या संख्येने आहे. या समाजातील मुलांनी नव्वद वर्षे जुन्या शाळेला नवी ओळख दिली आहे. अडीच वर्षांपूर्वीपर्यंत या शाळेची गणती इतर सामान्य शाळांबरोबर होत असे; पण आज गुणवत्तापूर्ण शिक्षण, मुलांचे उत्तम सादरीकरण आणि राज्यस्तरीय परीक्षांमधील उत्कृष्ट निकाल यांमुळे या शाळेने स्वत:ची एक स्वतंत्र ओळख बनविली आहे. हे शक्य झाले एका सरकारी शाळेतील शिक्षकांच्या अथक प्रयत्नांनी! मूल्यवर्धनच्या अभिनव शिक्षण पद्धतीने त्या शिक्षकांनी शाळेचा चेहरामोहराच बदलून टाकला आहे.**

विनोदसिंग परदेशी या शिक्षकांची स्तुती करताना शाळेचे मुख्याध्यापक आनंद पाटील थांबतच नाहीत. अनेक मुलांमध्ये वाढीस लागलेली अभ्यासाची आवड आणि शाळेतील मुलांची वाढलेली एक तृतीयांश संख्या या दोन्ही गोष्टी त्यांच्या मते मूल्यवर्धन कार्यक्रमामुळेच झाल्या आहेत. याचाच अजून एक परिणाम म्हणजे महाराष्ट्र सरकारतर्फे अभ्यासातील गुणवंत विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या वार्षिक शिष्यवृत्तीसाठी गेल्या दोन वर्षांत या शाळेतील १५ मुलांची निवड झाली आहे.

एवढेच नाही तर शैक्षणिक विकास संस्थेने गणित आणि भाषा या विषयातील मुलांच्या शैक्षणिक स्थितीचे मूल्यमापन करण्यासाठी या शाळेत वेळोवेळी परीक्षा घेतल्या. येथील विद्यार्थ्यांनी केवळ नऊ महिन्यांच्या कालावधीत या विषयांमध्ये ३० ते ४० टक्के अधिक प्रगती केली असल्याचे शिक्षण अधिकाऱ्यांनीही मान्य केले. शिक्षण विभागाने या वर्षी येथे आधुनिक विज्ञान प्रयोगशाळाही बांधली आहे.

ही गोष्ट आहे औरंगाबादपासून जवळपास दीडशे किलोमीटर अंतरावर असलेल्या सोयगाव तालुक्यातील किन्ही गावातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेची! येथे हे सांगितले पाहिजे की, ५,००० इतकी लोकसंख्या असलेल्या या गावामध्ये आदिवासी समाजाची कुटुंबे मोठ्या संख्येने राहतात. येथील लोक बहुतेक करून छोटे शेतकरी आणि मजूर आहेत. सन १९३० मध्ये स्थापन झालेल्या या शाळेत मुख्याध्यापकांसह एकूण ६ शिक्षक आहेत. या शाळेत एकूण २३० मुले शिकत असून त्यात ११६ मुली आणि ११४ मुले आहेत. जुलै २०१६ पासून या शाळेत 'मूल्यवर्धन' उपक्रम राबविण्यात येत आहेत.

अडीच वर्षांपूर्वीच्या परिस्थितीबद्दल चर्चा करताना विनोदसिंग परदेशी म्हणाले, ''अडीच वर्षांपूर्वी राज्य सरकारतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांना दिली जाणारी शिष्यवृत्ती मिळविण्यासाठी परीक्षेला काही निवडक मुलेच बसायची. अनेक मुले आपण गणित आणि मराठी या विषयात कच्चे आहोत असे स्वत:हूनच समजायची. आपण या परीक्षेत पास होऊन गुणवत्ता यादीत येऊ, असे त्यांना स्वत:लाच वाटायचे नाही. त्यावेळची परिस्थिती तर अशी होती की, यांपैकी अनेक मुले नियमित शाळेतही येत नव्हती. त्यांच्यापैकी अनेकांना शिस्त नव्हती आणि ही मुले शिक्षकांनी सांगूनही सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये भाग घ्यायची नाहीत. आता मात्र ही परिस्थिती पूर्ण बदलली आहे.



शाळेतील बाग-बगिच्याची साफसफाई करताना विद्यार्थी

विशेष म्हणजे मागच्या शैक्षणिक वर्षात झालेले हे बदल गावातील लोकांनाही जाणवत आहेत आणि त्यासाठी ते लोक आता शाळेचे कौतुकही करीत आहेत.''

**शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आली मुले :**

विनोदसिंग परदेशी म्हणतात की, त्यांच्यासामोर सर्वप्रथम मुलांची शाळेतील हजेरी वाढविण्याचे आव्हान होते. यासाठी त्यांनी विशेष योजना आखली. शाळेत नियमित येणाऱ्या मुलांवर त्यांनी लक्ष केंद्रित केले. शिकण्याच्या प्रकियेला अधिक आनंदी आणि रोचक बनविण्यासाठी त्यांनी मूल्यवर्धनमधील सांघिक खेळांची मदत घेतली. यामुळे एखादी गोष्ट पूर्ण करण्यासाठी मुले मिळून मिसळून काम करू लागली आणि एकमेकांची मदत घेऊ लागली. यामुळे मुलांमधील स्पर्धेची भावना कमी होऊ लागली. तसेच मुले समूह गीतांमधून एकत्रितपणे आनंद घ्यायला शिकली आणि ती सवय त्यांच्यामध्ये वाढीस लागली.



**मूल्यवर्धन तासाला शिक्षकांशी चर्चा करताना मुले**

विनोदसिंग परदेशी सांगतात, ''मुलांना समोर ठेवून आम्ही मूल्यवर्धनचे अधिक तास घेतो. शाळा सुरू होण्यापूर्वी एका जादा तासाला मूल्यवर्धनमधील उपक्रम विविध पद्धतीने घेतो. यात मुलांचे गट किंवा जोड्या पाडून त्यांना एखादा विषय एकमेकांकडून शिकण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. या सगळ्यांचा खात्रीशीर परिणाम असा झाला की, शिक्षकांवर पूर्णत: अवलंबून राहण्याची मुलांना लागलेली सवय कमी झाली.''

पाचवीच्या वर्गातील दीक्षा नवघरे म्हणाली, ''आम्ही मूल्यवर्धनच्या तासाला जे काही करू किंवा शिकू ते घरी गेल्यानंतर आमच्या शेजारीपाजारी राहणाऱ्या मुलांना सांगत असू. मूल्यवर्धनच्या तासाला किती मजा येते, हे पण आम्ही या मुलांना सांगत असू. आम्ही सांगितलेल्या गोष्टी ऐकून शाळेत न येणाऱ्या या मुलांनाही शाळेत जावेसे वाटू लागले. मग ती नियमित शाळेत येऊ लागली आणि त्यांना शाळा आवडू लागली.''

यातील पालकांची बाजू स्पष्ट करताना पालक बापू सोनवळे म्हणाले, ''शाळेतील शिक्षक विनोदसिंग परदेशी हे प्रत्येक मुलाच्या/मुलीच्या घरी जाऊन त्याचे किंवा तिचे आई-वडील किंवा आजी-आजोबा यांना शिक्षणाचे, अभ्यासाचे महत्त्व समजावून सांगत.''

या कुटुंबांतील काही लोक आपल्या मुलांना शाळेत सोडू लागले तेव्हा इतर कुटुंबातील लोकही आपल्या मुलांना शाळेत सोडू लागल्याचे विनोदसिंग परदेशी यांच्या लक्षात आले.

मुख्याध्यापक अशोक पाटील यांनी या सगळ्या बदलांबाबत आपला अनुभव सांगितला. ते म्हणाले, ''पारंपरिक पद्धतीने शिकविल्याने मुलांवर त्याचा खूप ताण येत असे परंतु मूल्यवर्धन मधील पद्धतींच्या मदतीने शिकवू लागल्यावर ती मुले त्या शिकविण्याचा आनंद घेऊ लागली. या पद्धतींनी प्रभावित होऊन शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यावर



**मूल्यवर्धनच्या तासाला कृतीत दंग मुले**

भर दिला. या कार्यक्रमासाठी गावातील सगळ्यांना आमंत्रित केले जाते. पालकांनी आणि गावकऱ्यांनी मुलांबरोबर अशा कार्यक्रमांमध्ये भाग घ्यावा आणि शाळेच्या गरजा अधिकाधिक जाणून घ्याव्यात, हा त्यामागे हेतू होता.''

**...म्हणून शाळेत येत नव्हती मुले! :**

गावातील बहुसंख्य मुलांची मातृभाषा मराठी नसल्याने त्यांना वर्गातील अनेक गोष्टी समजत नसत. ही अडचण विनोदसिंग परदेशी यांनी ओळखली. यासाठी त्यांनी मूल्यवर्धनच्या तासाला मदत किंवा सहकार्य या विषयाशी संबंधित कृती किंवा चर्चा यांमध्ये मुलांना सहभागी करून घेतले. उदा. माझ्या वर्गातील मुले. दरम्यानच्या काळात अभ्यासात कमजोर असलेल्या आणि पहिला नंबर मिळविणाऱ्या अशा मुलांना एकत्र करून एकमेकांकडून शिकण्याची आणि एकमेकांना शिकविण्याची संधी देण्यात आली. मुले एकमेकांशी अधिकाधिक बोलू लागली, तेव्हा त्यांच्यामध्ये येणारा भाषेचा अडसर हळूहळू दूर होऊ लागला.

दुसरे म्हणजे पालक आणि अनेक परिवार आर्थिक समस्यांमुळे मुलांसाठी शैक्षणिक साधने खरेदी करू शकत नव्हती. काही शिक्षकांनी आणि इतर लोकांनी वर्गणी गोळा करून त्यातून या मुलांना आवश्यक असलेली साधने उपलब्ध करून दिली. विनोदसिंग परदेशी यांच्या मते, मूल्यवर्धनच्या तासाला ही मुले केवळ आपले विचार व्यक्त करीत नाहीत, तर आपापसात अनेक गोष्टींविषयी बोलतात.

तिसरे कारण हे की, अनेक वेळा वर्गात या मुलांमध्ये उत्साह नसतो कारण त्यांच्याकडे दुर्लक्ष होते किंवा दुर्लक्ष केले जाते असे त्यांना सतत वाटत राहते. यावर उपाय म्हणून शाळेतील मुलांनी प्रार्थनेच्या वेळी शाळेतील प्रत्येक मुलाचा आणि मुलीचा वाढदिवस साजरा करण्यास त्यांनी सुरुवात केली. यामध्ये वाढदिवस असलेल्या 'बर्थ डे बॉय' किंवा 'बर्थ डे गर्ल'ला गुलाबाचे फूल देण्यात येते. त्यामुळे प्रत्येक मुलामध्ये शाळा आपली आहे अशी भावना निर्माण होण्यास मदत झाली आहे.

# १७. डॉ. अब्दुल कलाम यांच्याकडून प्रेरणा

**औरंगाबाद तालुक्याच्या आणि जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणापासून २० किलोमीटर अंतरावर असलेल्या लाठगांव या गावात जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा आहे. मूल्यवर्धनमुळे मुलांच्या वागण्यात दिसून आलेला बदल या शाळेचे वैशिष्ट्य बनले आहे. येथील शिक्षिकेने मूल्यवर्धनच्या तासाला करून घेतलेल्या कृती आणि चर्चेने मुले इतकी प्रभावित झाली आहेत की, मुले त्यांना मदत केलेल्या लोकांचे आभार मानू लागली आहेत. वर्षातील दोन-तीन प्रसंगी तर ही मुले या व्यक्तींसाठी स्वत:च्या हाताने 'थँक यू कार्ड' तयार करतात.**



**'थँक यू कार्ड' तयार करणारी मुले**

जवळपास २,००० लोकसंख्या असलेल्या या गावामध्ये बहुतांश शेतकरी कुटुंब आहेत. येथील शेतकरी प्रामुख्याने कापूस आणि बाजरी ही पिके घेतात. या व्यतिरिक्त येथे औरंगाबादच्या एमआयडीसीत काम करणारे काही मजूरही आपल्या कुटुंबांसह मोठ्या संख्येने राहतात. सन १९६३ मध्ये स्थापन झालेल्या मराठी माध्यमाच्या शाळेत मुख्याध्यापिकेसह पाच शिक्षिका आहेत. येथे पहिली ते पाचवीच्या वर्गात एकूण ९९ मुले शिकत असून त्यात ५७ मुले आणि ४२ मुली आहेत.

**अशी झाली सुरुवात :**

शाळेतील शिक्षिका सांगतात की, या शाळेतील अभ्यासक्रमात मूल्यवर्धनचा समावेश करून तीन वर्षे झाली. यामुळे गेली तीन वर्षे मुले चांगल्या वागणुकीशी संबंधित सवयींचा अभ्यास करीत आहेत. खरे तर या दरम्यान घेण्यात आलेल्या मूल्यवर्धनच्या इतर तासांमुळे या लहान मुलांना आपल्या क्षमतांची ओळख होत आहे.

अलका थाले या शिक्षिका म्हणाल्या, ''जानेवारी २०१८ मध्ये त्यांनी मूल्यवर्धनच्या तासाला एक कृती म्हणून दुसरीच्या वर्गातील प्रत्येकी पाच मुलांचा एक गट असे गट पाडले. त्या प्रत्येक गटाला आळीपाळीने मूल्यवर्धनच्या पुस्तकातील 'धन्यवाद मित्रा' ही गोष्ट वाचायला सांगितली. त्यावेळी पहिलीची मुले ही गोष्ट शांतपणे ऐकत होती.''

माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांच्या आयुष्यातील ही एक सत्यघटना आहे. डॉ. कलाम विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने देशाच्या वेगवेगळ्या भागात जात असत. एकदा ते ईशान्य भारताच्या दौऱ्यावर होते. त्यांना गुवाहाटीहून शिलाँगला जायचे होते. या प्रवासादरम्यान एक सैनिक त्यांच्या सुरक्षेसाठी उघड्या जीपमध्ये बंदूक घेऊन संपूर्ण वेळ उभा होता. शिलाँगला पोहोचताच डॉ. कलाम यांनी त्या सैनिकाचे हात हातात घेऊन त्याला धन्यवाद दिले.

अलका थाले पुढे म्हणाल्या, ''गोष्ट संपल्यानंतर मुलांनी आपापसात चर्चा केली. राष्ट्रपती असून सुद्धा डॉ. कलाम यांनी त्या सैनिकाला धन्यवाद दिले, ही गोष्ट मुलांना आवडली. या गोष्टीवरून मुलांच्या हे लक्षात आले की, जी व्यक्ती त्यांना मदत करते, त्या व्यक्तीला धन्यवाद दिले पाहिजेत. यानंतर मुलांनी आपल्या घरातील, शेजाऱ्यांची तसेच शाळेतील त्यांना मदत करणाऱ्या लोकांची नावे आपापल्या वहीत लिहिली.''




विद्यार्थिनीने 'धन्यवाद कार्डाच्या' माध्यमातून मानले आईचे आभार

### अशी बदलली मुलांची वागणूक :

यानंतर शाळेने हीच कृती सर्व इयत्तांच्या मुलांबरोबर करण्याचे ठरविले. यामध्ये रामेश्वर पवार नावाच्या एका मुलाने सगळ्या मुलांसमोर उभे राहून आपल्या आईला धन्यवाद दिले, तिचे आभार मानले आणि त्याची आई दिवसभर करीत असलेली कामे त्याने हाताच्या बोटावर मोजली.




आईला धन्यवाद देणारे आणखी एक कार्ड

पाचवीच्या वर्गातील पृथ्वीराज इथ्थर सांगतो की, त्यादिवशी शाळा सुटल्यानंतर जेव्हा तो शाळेतून घरी गेला तेव्हा त्याने आपल्या आईला सांगितले की, 'आई तू जास्त काम करू नकोस' त्याच्याच शब्दात सांगायचे तर तो आईला म्हणाला, ''आई तू दररोज इतके काम करतेस. आज थोडा आराम कर. आज मी चहा करतो. मला सांग चहा कसा करतात, मग मी तसा चहा करतो आणि तुला प्यायला देतो.''

### या कारणामुळे मुलांनी बनविली थँक यू कार्ड! :

अलका थाले म्हणाल्या, ''२६ जानेवारी २०१९ च्या काही दिवस आधी मूल्यवर्धनचा एक तास घेतला होता. या तासाला पहिली आणि दुसरीच्या मुलांसोबत इतर इयत्तांची मुलेही हजर होती. यावेळी मी मुलांना सांगितले की, मी या प्रजासत्ताक दिनी माझ्या आईसाठी धन्यवाद कार्ड तयार करणार आहे कारण माझी आई माझ्यासाठी खूप काही गोष्टी करते. तुमच्यापैकी ज्या कुणाला असे कार्ड तयार करायचे असेल, ते माझ्याबरोबर असे कार्ड तयार करू शकतात. नंतर तुम्ही हे कार्ड तुम्हांला मदत करणाऱ्या व्यक्तींना देऊ शकता.''

त्यानंतर मुलांनी शिक्षिकेच्या सोबतीने 'थँक यू कार्ड' तयार केली. शाळेने मुलांना कार्डबोर्ड, कागद आणि रंगीत पेन्सिली दिल्या. अलका थाले यांनी मुलांना एक साधे कार्ड कसे करायचे ते दाखविले. अनेक मुलांनी या 'थँक यू कार्ड'वर चित्रे चिकटविली, पण शिक्षिकेसाठी मुलांनी किती सुंदर कार्ड तयार केली आहेत याला महत्त्व नव्हते, तर या मुलांनी या निमित्ताने आपल्या भावना व्यक्त केल्या ही गोष्ट अधिक महत्त्वाची होती.

### मुलांनी आपापसात वाटून घेतल्या जबाबदाऱ्या :

मुले एवढ्यावरच थांबली नाहीत, तर त्यांनी आपल्या वर्गशिक्षिकेच्या काही जबाबदाऱ्या आपापसात वाटून घेतल्या आणि आपल्या वर्ग शिक्षिकेवरील कामाचे ओझे कमी केले. याबद्दल शिक्षिकाही मुलांचे आभार मानतात आणि त्यांना धन्यवाद देतात.

अलका थाले त्यांना आलेल्या अनुभवाविषयी म्हणाल्या, ''पहिलीत शिकणाऱ्या लहान मुलांची शिक्षिका असणे, हे एक आव्हानच असते. मूल्यवर्धन शिकविण्याच्या सुरुवातीच्या काळात त्यांचा सगळा वेळ या लहान मुलांना सांभाळण्यातच जात असे; पण हळूहळू ही लहान मुले वर्गाची जबाबदारी घेऊ लागली. यामुळे त्यांच्या वेळेचीही बचत झाली आणि त्यांचे कामही सोपे झाले.''

अलका थाले यांच्या निरीक्षणानुसार मुले स्वत:हून वर्ग स्वच्छ ठेवायला मदत करतात आणि कचरा कचरापेटीत टाकतात. याच पद्धतीने ती खाली बसण्यासाठी जमिनीवर चटई घालतात आणि अभ्यासात एकमेकांची मदत करतात. त्या म्हणाल्या, ''मी साधारण वर्षाभरापूर्वी पहिली व दुसरीच्या मुलांसाठी घेतलेल्या एका मूल्यवर्धनच्या तासाला त्यांच्याकडून वर्गातील जबाबदारीबद्दल काही गोष्टी करून घेतल्या होत्या. त्यावेळी मी मुलांशी चर्चा केली. या चर्चेमध्ये मुलांना विचारले की, 'जर तुमच्या घरातील एकाच व्यक्तीने सारी कामे केली आणि इतर कुणीही त्या व्यक्तीला मदत केली नाही तर काय होईल?' मी त्यांना उदाहरण देऊन सांगितले की, तुम्हांला शाळेत पाठविण्याआधी करावी लागणारी कामे आणि तुमची तयारी एकाच व्यक्तीने केली तर त्याला किती वेळ लागेल? पण जर हीच कामे दोन–तीन जणांनी वाटून घेतली आणि मिळून केली तर त्या कामाला किती वेळ लागेल?' यावर मुलांनी जी उत्तरे दिली त्याचाच आधार घेऊन मी त्यांना सांगितले की अशाच प्रकारे तुम्ही मिळून–मिसळून वर्गातील कामे केलीत तर वेळ वाचू शकतो.''




**वर्ग सांभाळण्यासाठी वर्गशिक्षिकेला मदत करणारे विद्यार्थी**

यानंतर मुलांनीच आपापसात चर्चा करून कामे वाटून घेतली. यामुळे त्यांच्यामध्ये परस्पर सहकार्याची भावना वाढीस लागली. आता मुले वर्गातील जबाबदाऱ्या गटागटाने कशा पूर्ण करायच्या, हे शिकत आहेत.

मुख्याध्यापिका विजया नंदनवार यांना मुलांच्या वागणुकीतील या बदलाने आनंद झाला. एखाद्या छोट्याशा वस्तीतील लहान मुले अशा पद्धतीने स्वत:च्या भावना व्यक्त करीत आहेत हे पाहताना त्यांना छान वाटते. यापूर्वी येथील मुले शाळेत येताना वर्गातही लाजत असत आणि अधिक प्रश्न विचारल्यास त्यांना भीती वाटत असे. आता त्यांच्यात खूप बदल झालेले दिसून येत आहेत.

मुलांना आता लागलेल्या या सवयी टिकून रहाव्यात आणि त्यासाठी मूल्यवर्धनचे तास कायम आणि दीर्घकाळ घेतले जावेत, असे विजया नंदनवार यांना वाटते.

# १८. एक दिवस शाळेसाठी

**पालघर जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणापासून जवळपास ११० किलोमीटर अंतरावर वाडा प्रभागातील दुर्गम क्षेत्रात नेवाळपाडा हे गाव आहे. साधारण २५० इतकी लोकसंख्या असलेल्या या गावामध्ये बहुतांश कुटुंबे ही आदिवासी जमातीतील आहेत. यामधील अनेक जण छोटे शेतकरी आणि मजूर आहेत. तसे पाहता नेवाळपाड्याची जुनी पिढी शिक्षणापासून किती तरी काळ वंचित राहिली आहे, परंतु आज चित्र बदलते आहे आज गावातील आबालवृद्धांमध्ये शाळेबद्दल असणारी ओढ वाढताना दिसत आहे.**

सन २०१८ पासून या शाळेत मूल्यवर्धनचे उपक्रम आयोजित केले जात आहेत. परंतु एकाच वर्षात मूल्यवर्धनच्या शिक्षकाने संपूर्ण गावाला मूल्यवर्धनमधील दैनंदिन व्यवहारांवर आधारित कृती आणि चर्चांमध्ये सहभागी करून घेतले आहे. येथे 'एक दिवस शाळेसाठी' या नावाने एक स्वच्छता उपक्रम चालविला जात आहे. मूल्यवर्धन अंतर्गत होणारी एक कृती म्हणून चालविल्या जाणाऱ्या या कार्यक्रमामुळे शाळा गावाशी जोडली गेली आहेच पण त्यामुळे गावातील लोकांमध्येही एकजूट निर्माण झाली आहे.



**नेवाळपाडा येथील प्राथमिक शाळेचा परिसर**

नेवाळपाड्यामध्ये १९७९ पासून मराठी माध्यमाची ही शाळा भरते. जिल्हा परिषदेच्या या प्राथमिक शाळेत यावर्षी ५० मुले आणि दोन शिक्षक आहेत. यातील एक आहेत मुख्याध्यापक जगदीश जाधव. ते एक वर्षापासून मूल्यवर्धनच्या उपक्रमाचे आयोजन करीत आहेत. आपले अनुभव सांगताना जगदीश जाधव म्हणाले, ''मूल्यवर्धनच्या उपक्रमांमुळे केवळ मुलांमध्येच नाही, तर स्वतःमध्येही काही बदल झाले आहेत. मूल्यवर्धनने मला मुलांबरोबर संपूर्ण समाजाशी जोडून घेणे आणि त्यांची मदत घेणे हे दोन्ही शिकविले आहे. या कारणामुळेच स्वच्छतेच्या मुद्द्यावर संपूर्ण गांव शाळेसोबत आहे.''

### महिन्याच्या शेवटच्या मंगळवारी सारे गाव येते एकत्र :

'एक दिवस शाळेसाठी' या उपक्रमाबद्दल बोलताना ते म्हणाले, ''मूल्यवर्धनमधील कृती आणि इतर घटकांपासून प्रेरित होऊन हा उपक्रम एक प्रयत्न म्हणून सर्वांत आधी मुलांसोबत सुरू केला होता, पण एका वर्षात संपूर्ण गावच या मोहिमेत सहभागी झाले. यामध्ये दर महिन्याच्या शेवटच्या मंगळवारी प्रत्येक घरातील एक सदस्य किमान एक तास शाळेसाठी देईल आणि शाळेची इमारत, परिसर आणि शाळेतील शौचालय यांची साफसफाई करेल, असे ठरविण्यात आले.''

या कार्यक्रमाचा प्रभाव गावावर अनेक कारणांनी पडला आहे. शाळेच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य पदमन वंजारी म्हणाले, ''गावामध्ये राजकारणामुळे गट-तट पडलेले असतात, पण शाळेच्या या उपक्रमामुळे सर्वजण महिन्यातील एक दिवस एकत्र येतात. मूल्यवर्धनच्या विविध कृती आणि चर्चांमुळे मुले आपापल्या घरीही कटाक्षाने स्वच्छता बाळगतात. अंघोळ करण्याची आणि धुतलेले स्वच्छ कपडे घालण्याची त्यांना सवय लागली आहे. याशिवाय आम्ही वर्गणी गोळा करून पंधरा-वीस दिवसांनी केशकर्तनालयातील एक कारागीर बोलावितो आणि त्यांच्याकडून मुलांची नखे आणि केस कापून घेतो.''



शाळेच्या परिसरात साफसफाई करण्यासाठी एकत्र आलेले गावकरी

## बदलली मुलांची बोलाचाली :

स्वच्छतेच्या बाबतीत लोकांचा हा उत्साह पाहून ग्रामपंचायतही पुढे आली. स्वच्छतेविषयी जागरूक आणि सतर्क असलेल्या मुलांना पुरस्कार देण्याचा निर्णय लोकांनी पंचायतीत एकत्र येऊन घेतला. यावर्षी हा पुरस्कार प्रजासत्ताकदिनी देण्यात आला. सरपंच पुष्पा चातुर्य म्हणाल्या, ''पुरस्कार म्हणून या मुलांना वही, खोडरबर, चार्टपेपर आणि रंगीत पेन्सिली देण्यात येतात. पंचायतीने लोकांच्या मदतीने शाळेसाठी मोठी भिंत बांधली आहे, पण त्याहून मोठी आणि महत्त्वाची गोष्ट ही की, मूल्यवर्धनमुळे मुलांची भाषा बदलते आहे. ते आता बोलताना असभ्य, अपशब्द वापरत नाहीत. ती ज्येष्ठांचा आदरही करू लागली आहेत.''

शाळेच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य दीपक मुकणे यांनी मूल्यवर्धनच्या काही तासांचे निरीक्षण केले आहे. प्रत्येक मुलाने पुस्तक वाचूनच शिकायची आवश्यकता नाही, असे दीपक यांना वाटते, परंतु मूल्यवर्धन उपक्रम सर्व मुलांना आवडतात. आता येथील मुले नव्या व्यक्तीशी न लाजता, न अडखळता बोलू शकतात. प्रत्येक मुलाचे काहीतरी स्वतंत्र मत आहे, मूल्यवर्धनमुळे हा बदल झाला आहे.



शाळेचा परिसर स्वच्छ झाल्यांनतर तो सजविणाऱ्या महिला

## महिला आणि मुले प्रथमच एकत्र :

२६ जानेवारी २०१९ च्या रात्री गावकऱ्यांनी एका सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यामध्ये महिलांच्या बचत गटाने पंधरा आणि शाळेच्या मुलांनी दहा कार्यक्रम सादर केले. याबाबत भरत माने हे शिक्षक म्हणाले, ''महिला आणि मुले एखाद्या मोठ्या कार्यक्रमासाठी एकत्र येणे हे या गावात प्रथमच घडले. मुलांनी या कार्यक्रमांची तयारी मूल्यवर्धनच्या तासाला केली होती.''

मुलांमध्ये निर्माण झालेला हा आत्मविश्वास आणि त्यातील बदल यांबद्दल आपला अनुभव सांगताना जगदीश जाधव म्हणाले, ''खरे तर हा 'चांगल्या आणि वाईट सवयी' आणि 'योग्य वा अयोग्य' या विषयांवर मूल्यवर्धनच्या तासाला घेण्यात आलेल्या चर्चांचा परिणाम आहे. या चर्चा आम्ही वर्गाबाहेर, मैदानात आणि सामूहिक पद्धतीने घेत असू. यामुळे मुले स्वतःची मते व्यक्त करू लागली. त्यांना स्वच्छता आणि इतर विषयांबद्दल नवनवीन गोष्टी समजायला लागल्या आहेत.''

आपल्या पुढील योजनेबद्दल बोलताना जगदीश जाधव यांनी सांगितले की, त्यांना आता मूल्यवर्धनचा एक उपक्रम म्हणून 'वृक्षारोपण' मोहीम हाती घ्यायची आहे. या मोहिमेत त्यांना विशेषतः महिला आणि मुलांचा अधिकाधिक सहभाग अपेक्षित आहे.



**२६ जानेवारी रोजी झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमातील एक दृश्य**



**पहिलीच्या वर्गात मूल्यवर्धनचा उपक्रम**

**घडते आहे आमचे भविष्य :**

''अगदी कमी कालावधीत आम्ही आमच्या मुलांमध्ये बदल होताना पाहत आहोत. आपण असेही म्हणू शकतो की, आमच्या डोळ्यांसमोर आमचे भविष्य घडते आहे.'' असे या गावातील महिला किरण वंजारी म्हणाल्या.

'ते कसं?' किरण वंजारी यांना प्रश्न विचारताच त्या म्हणाल्या, ''ते तुम्ही मुलांनाच विचारा.'' मुलांशी बोलताना असे लक्षात आले की, चौथीच्या वर्गातील कार्तिक जाधव पूर्वी लांब असलेल्या पक्ष्यांना बेचकीतून दगड मारायचा परंतु मूल्यवर्धनच्या तासाला झालेल्या चर्चेनंतर त्याने बेचकीचा वापर थांबविला आहे. तसेच चौथीच्या वर्गातील अजय जाधव याआधी लहान मुलांना लहानसहान कारणावरून मारत असे परंतु आता तो याच लहान मुलांची काळजी घेत आहे.

# १९. सर्वांग सुंदर माझी शाळा

**संपूर्ण शाळेचे सुंदर चित्र पाहून हा विचार करणे देखील अवघड आहे की, कधी काळी ही शाळा मोकाट प्राण्यांचे घर होती. शाळेतील शिक्षक जेव्हा सकाळी शाळा उघडत, तेव्हा त्यांचे पहिले काम दरवाजा आणि परिसरातील शेण साफ करणे हे असे. परंतु आता परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. आज हीच शाळा स्वच्छतेचे निकष खूप चांगल्या रीतीने पूर्ण करीत आहे. राज्यातील मोठे अधिकारी आणि दूरदूरच्या शिक्षकांचे गट या शाळेचे सौंदर्य आणि येथील कलाकृती पहायला येतात. हा बदल झाला तरी कसा असा प्रश्न सर्वांनाच पडला आहे.**

'श्रमदान आणि सार्वजनिक भागीदारीतून.' येथील मुख्याध्यापक अशोक किणी यांनी या प्रश्नाचे उत्तर एका वाक्यात दिले. त्यांनी सांगितले की, श्रमदानातून शाळा सुंदर बनविण्याचा प्रयत्न बऱ्याच काळापासून चालू आहे, पण मूल्यवर्धनमुळे हे काम जास्त व्यवस्थित आणि व्यापकपणे करता येऊ शकले. विशेषतः स्वच्छतेच्या बाबतीत शाळेबरोबरच गाव देखील अधिक सजग आणि संवेदनशील होत आहे. ही गोष्ट आहे पालघर जिल्ह्यातील; पालघर पासून २० किलोमीटर दूर असणाऱ्या जिल्हा परिषद शाळा शिलटे येथील. साडेसहाशे लोकसंख्या असणाऱ्या शिलटे गावात आदिवासी बहुसंख्य आहेत. येथील लोक मुख्यतः शेती करतात.

या शाळेत इयत्ता पहिली ते चौथीची एकूण ४७ मुले शिकत आहेत. १९५३ मध्ये स्थापन झालेल्या या मराठी माध्यमाच्या शाळेचा कायापालट येथील मुख्याध्यापक आणि शिक्षिका स्वजल म्हात्रे यांनी केला आहे.



**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिलटे**

सहा दशके जुन्या असलेल्या या शाळेचे वैशिष्ट्य म्हणजे शाळेची इमारत, खिडक्या, दरवाजे, खुर्च्या, टेबल, उंच भिंती, पक्के रस्ते, कचराकुंड्या, अनेक झाडे-झुडपे, कुंड्यांपासून ते खेळाचे मैदान आणि लहान मुलांच्या झोपाळ्यांपर्यंत सर्व बाबी श्रमदान आणि लोकसहभागातून निर्माण झालेल्या आहेत; एवढेच नव्हे तर पिण्याच्या पाण्यासाठी मोटरपंप, पक्की पाणपोई, सामान्य मुला-मुलींबरोबरच विकलांग मुलांसाठी वेगळे शौचालय, मोठा मंच, भव्य बगीचा आणि डिजिटल शाळा हे सर्व श्रमदान आणि लोकसहभागातून उभे राहिले आहे.

हे सर्व करण्यासाठी मोठ्या प्रमाणात श्रम आणि साधनांची आवश्यकता तर होतीच, पण त्याचबरोबर लाखो रुपये देखील जमा करावे लागणार होते. स्वजल म्हात्रे यांनी सांगितले की, हे सर्व करणे खूप अवघड काम होते, जे मुख्याध्यापकांच्या पुढाकाराने मुले, पालक, समाजातील नागरिक, ग्रामपंचायत, स्वयंसेवी संस्था आणि खाजगी कंपन्या यांच्या आपसांतील सहकार्याने सोपे झाले.




शाळेचा स्वच्छ, सुंदर बगीचा

## मूल्यवर्धनची झाली मदत :

शाळा सुंदर आणि भौतिक साधनांनी संपन्न बनविण्यापेक्षाही शाळेची निगा राखणे आणि आहे ती परिस्थिती टिकवून ठेवणे अधिक आव्हानात्मक होते. केंद्रप्रमुख ल्यूसी रॉड्रिक्स यांच्या मते येथील शिक्षक यासाठी मूल्यवर्धनची मदत घेतात. त्या म्हणाल्या, ''मूल्यवर्धनमुळे ते शाळेला जास्त वेळ देऊ लागले आहेत. अनेकदा शिक्षक, शिक्षिका शाळा सुरू होण्यापूर्वी किंवा सुटल्यानंतर मूल्यवर्धनच्या तासिकेत मुलांबरोबर मैदान साफ करताना किंवा कचरा वेचताना दिसतात.''

स्वजल म्हात्रे यांनी जुलै, २०१८ मध्ये जवळच माकनी येथे मूल्यवर्धनचे प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षणा दरम्यान त्या 'समता' या मूल्याने प्रभावित झाल्या होत्या. आपले अनुभव सांगताना त्या म्हणाल्या, ''मूल्यवर्धनची पुस्तके चाळत असतानाच मी ठरविले की माझ्या शाळेत सर्व मिळून काम करतील, कोणत्याही प्रकारचा भेदभाव नसेल, मुले–मुली जोडीमध्ये आणि समूहात चर्चा करतील, एकमेकांच्या भावनांना जास्तीत जास्त चांगल्याप्रकारे समजून घेतील.''




शिक्षिका स्वजल म्हात्रे यांच्याबरोबर विद्यार्थ्यांनी तयार केलेले स्वच्छता संदेश

स्वजल म्हात्रे एका आठवड्यात मूल्यवर्धनच्या दोन ते तीन तासिका घेतात. आता प्रश्न असा आहे की, मूल्यवर्धनमुळे मुलांमध्ये बदल घडत आहेत का? याबाबतीत इयत्ता दुसरीतील काही मुलांनी आपले काही अनुभव सांगितले. तनिश भिमाड म्हणाला की, जेव्हा त्याची आई थकून घरी येते तेव्हा तो तिला पाणी देतो. अस्मित सुतार शाळेचे सामान व्यवस्थित ठेवण्यासाठी मदत करतो. पाण्याची टाकी




मूल्यवर्धन उपक्रमातून विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या भावनांची ओळख होते

भरल्यानंतर रितिका शेलार शिक्षिकांना नळ बंद करण्याची आठवण करून देते. रितेश हेमाडे बागेत पडलेली फुले एका ठिकाणी जमा करतो. शुभम तुमडे प्लॅस्टिकच्या वस्तूंचा वापर अगदी कमी प्रमाणात करतो.

दुसरीतील मुलांनी सांगितले की, आता ते दुकानातून विकत घेऊन कोणताही पदार्थ खात नाहीत. त्यांनी शाळेत एक गल्ला ठेवला आहे. या गल्ल्यात मुले ते पैसे जमा करतात. काही दिवसांनी या गल्ल्यातील पैशांनी घरी असा एखादा पदार्थ बनवितात जो आरोग्यासाठी हितकारक असेल.

**चित्र आणि कलाकृतींमधून श्रमाचा संदेश :**

मूल्यवर्धनच्या उपक्रमांमुळे मुलांचे पालक देखील आनंदित आहेत. शीला पटेल यांचा एक मुलगा पहिलीमध्ये तर दुसरा मुलगा चौथीमध्ये शिकतो. त्यांनी सांगितले की, वर्षभरापासून मुले घरात साफ-सफाईवर खूप लक्ष देत आहेत. शाळेमध्ये प्रत्येक बुधवारी मुलांची नखे आणि केसांची तपासणी केली जाते. यामुळे त्यांची मुले काही थोड्या थोड्या दिवसांनी नखे आणि केस कापण्याची आठवण करून देतात.




मूल्यवर्धन उपक्रमातून विद्यार्थ्यांनी दिले स्वच्छतेचे संदेश

या शाळेची लक्षात येण्यासारखी गोष्ट म्हणजे येथील फक्त परिसरच नाही तर शाळेच्या दोन खोल्या देखील सुंदर चित्रांनी आणि टाकाऊ साहित्याने सजविलेल्या आहेत. ही चित्रे आणि या कलाकृती श्रमदानाचा संदेश देतात. उदाहरणादाखल, पूर्वीच्या काळी पाणी ओढून काढले जात असे, याची एक प्रतिकृती तयार केली आहे. जागृती गिराणे नावाची एक मुलगी म्हणाली, ''सजावटीच्या या वस्तू स्वजल म्हात्रे मॅडमनी तयार केल्या आहेत. आम्हांला देखील त्या अशा वस्तू बनवायला शिकवितात.''

**आता सहभागातून बनेल छत :**

या शाळेचे भविष्यातील नियोजन काय आहे आणि यात मूल्यवर्धनची मदत कशा प्रकारे होऊ शकेल, असे विचारल्यानंतर अशोक किणी म्हणाले, ''पावसाळ्याच्या दिवसांत शाळेच्या छतातून पाणी गळते, ते बदलायची आवश्यकता आहे. फरशी देखील खूप खराब झाली आहे ती बदलावी लागेल. ही कामे लोकांच्या मदतीने होतील. मूल्यवर्धन कार्यक्रमातून आपापसातील सहकार्य, इतरांची मदत आणि कष्ट करणाऱ्या लोकांविषयीची सन्मानाची भावना वाढीस लागेल.''

स्वजल म्हात्रे यांना पूर्ण विश्वास आहे की, लोक त्यांना यापुढेही श्रम आणि सहकार्य देतील. यामागील पार्श्वभूमी सांगताना त्या म्हणाल्या, ''श्रम आणि वर्गणी देण्याच्या बाबतीत प्रत्येक वेळी आम्हां शिक्षकांचे कुटुंब पुढे येते. आमच्या अशा कृतीमुळे इतरांना देखील वाटते की, त्यांनीही काही तरी करायला हवे आणि मग ते आम्हांला मदत करतात.''

शिलटे येथील शाळेला सुंदर बनविण्यात आणि स्वच्छ ठेवण्यात मुलांबरोबरच मोठ्यांना देखील स्वच्छतेचे महत्त्व समजले आहे.

# २०. आणि वाचले झाडांचे प्राण

**दुष्काळग्रस्त मराठवाड्यातील एका शाळेतील मुलांनी गेल्या दोन वर्षांतील दुष्काळात आपल्या शाळेच्या परिसरातील अनेक झाडा-झुडपांना सलाईनच्या नळीमधून पाणी देऊन जीवदान दिले आहे. शिक्षकांनी सांगितल्याप्रमाणे या मुलांनी शाळेच्या आवारात अनेक फळझाडे लावली. दुष्काळात पाण्याची समस्या असतानाही झाडांची तहान भागविण्याचा संकल्प या मुलांनी केला. याचा परिणाम असा झाला की, आता शाळेच्या परिसरात फुललेली ही हिरवळ दूरवरूनच प्रत्येकाचे लक्ष वेधून घेत आहे. मूल्यवर्धनचा अभ्यासक्रमात समावेश केल्याने ही हिरवळ फुलली आहे, असे येथील शिक्षकांचे म्हणणे आहे.**

ही गोष्ट आहे औरंगाबादपासून १५ किलोमीटर अंतरावर असलेल्या शेंद्रा कमेंगर गावातल्या शिवाजीनगर वस्तीत असलेल्या प्राथमिक शाळेची! येथे हे सांगितले पाहिजे की, एकूण ६,००० लोकसंख्या असलेल्या या शेंद्रा कमेंगर गावातील ३,००० च्या आसपास लोकसंख्या शिवाजीनगर वस्तीत राहते. या वस्तीमध्ये मुख्यत: मजूर आपल्या कुटुंबासह राहतात. वस्तीतील मराठी माध्यमाची शाळा सन २००२ मध्ये स्थापन झाली. या शाळेत दोन शिक्षक आणि ५८ मुले आहेत. यामध्ये ३१ मुले आणि २७ मुली आहेत.




**शाळेच्या परिसरातील एक दृश्य**

### हिरवळ जणू नष्ट झाली होती :

या शाळेच्या परिसरात कडुनिंब, वड, बदाम, चिंच इत्यादी झाडे लावलेली आहेत; पण येथील मुख्याध्यापिका गीतांजली बंदरे आणि जनार्दन शेजूल या झाडांच्या हिरव्यागार दिसण्यामागची गोष्ट आपल्याला सांगतात की, सलग दुष्काळ पडल्याने २०१७ साली ही पूर्ण बाग वाळून जाण्याच्या मार्गावर होती. शाळेच्या परिसरातील हिरवळ जणू नष्ट झाली होती आणि आजूबाजूच्या परिसरातही साधारण तशीच परिस्थिती होती परंतु ही हिरवळ पुन्हा फुलावी यासाठी कोणतेही गंभीर आणि ठोस प्रयत्न होत नव्हते.

त्यानंतर २०१७ सालच्या डिसेंबर महिन्यात लाठगाव येथे या शिक्षकांना मूल्यवर्धनचे प्रशिक्षण मिळाले आणि गीतांजली बंदरे यांना असे वाटले की झाडे वाचविणे हे सुद्धा एक महत्त्वपूर्ण मूल्यच आहे. या मूल्याचा अवलंब केल्याने ही मुले जबाबदार नागरिक बनू शकतात. पाण्याचा प्रश्न हा केवळ शाळेपुरता मर्यादित नसून संपूर्ण परिसरातीलच ती एक मोठी समस्या आहे, हेही त्यांच्या लक्षात आले. यातील महत्त्वाची गोष्ट म्हणजे मूल्यवर्धनमध्ये पाण्याची समस्या लक्षात घेतली आहे, त्यामुळे याचा त्यांना फायदाच झाला.




**दुपारच्या जेवणावेळी शाळेतील दृश्य**

त्या म्हणाल्या, ''एक दिवस आम्ही तिसरीच्या वर्गातील मुलांसोबत मूल्यवर्धनच्या तासाला चर्चा घेतली. चर्चेचा विषय होता 'आपण झाडे कशी वाचवू शकतो?' या चर्चेत मुलांनी सांगितले की, त्यांना झाडे वाचवायची आहेत पण आपण

पाण्याशिवाय झाडे वाचवू शकत नाही. गावात पाण्याची टंचाई आहे. त्यामुळे झाडांना लागणारे पाणी कोठून आणणार? आम्ही त्यांना वेगवेगळ्या प्रकारचे उपाय विचारत राहिलो; पण त्यादिवशी आम्हांला कोणताही व्यावहारिक उपाय गवसला नाही.''

२०१८ साली उन्हाळ्याच्या दिवसात येथील शिक्षकांनी शाळेतील सर्व इयत्तांमधील मुलांचा एकत्रित असा मूल्यवर्धनचा तास आयोजित केला. या तासाला झाडे वाचविण्याबाबत त्यांनी मुलांशी पुन्हा चर्चा केली. या तासाला मुलांनी आपली मते मांडली.

'आपण झाडे कशी वाचवू शकतो?', 'झाडांचे उपयोग', 'आपल्या परिसरातील झाडे-झुडपे', 'पाण्याचा प्रश्न?' आणि 'आपण पाण्याची बचत कशी करू शकतो' अशा मूल्यवर्धनमध्ये समावेश असलेल्या उपक्रमांची मुलांना पर्यावरणाच्या दृष्टीने सजग आणि सतर्क करण्यासाठी मदत झाली, असा उल्लेख जनार्दन शेजूल यांनी केला.



**सलाईनच्या नळीद्वारे झाडांना पाणी देण्याची तयारी करताना मुले**

### अशी सुचली ही युक्ती :

गीतांजली बंदरे आपला अनुभव सांगताना म्हणाल्या, ''या चर्चेदरम्यान प्रश्न उपस्थित झाला की, जेव्हा माणूस आजारी पडतो तेव्हा डॉक्टर त्याचे प्राण वाचविण्यासाठी काय काय करतात? तेव्हा चौथीच्या वर्गातील मुलांनी सांगितले की, अशा आजारी माणसाला सलाईन लावले जाते. तेव्हा आम्ही मुलांना विचारले की, अगदी तसेच आपण झाडांना सलाईन लावले तर चालेल का? तेव्हा मुलांनी 'हो' असे उत्तर दिले. 'ते कसे' असे विचारल्यावर त्यांनी झाडाला सलाईन लावण्याची एक युक्तीही सांगितली. सगळ्यांना त्यांची युक्ती आवडली.''

झाडांच्या सिंचनासाठी यावर्षी या शाळेने पावसाचे खूप सारे पाणी साठवून ठेवले आहे. यामुळे पाण्याचा प्रश्न काही अंशी सुटला आहे.

### शाळेच्या छतावर साठविले पावसाचे पाणी :

जनार्दन शेजूल म्हणाले, ''यानंतर झाडांच्या सिंचनाचा प्रश्न लक्षात घेऊन पावसाचे पाणी साठविण्याचा निर्णय शाळेने घेतला. हे पाणी शाळेच्या छतावर जमा करण्याचे ठरले, जेणेकरून हे पाणी पाईपाच्या मदतीने शोषखड्ड्यापर्यंत पोहोचविता येईल.''

जेव्हा त्यांनी असे केले तेव्हा या शोषखड्ड्यातील आणि आजूबाजूच्या परिसरातील पाण्याची पातळी वाढली. यामुळे शाळेतील ज्या कूपनलिकेला मार्च-एप्रिल पर्यंतच पाणी येत असे, ती आता १५ मे पर्यंत पाण्याचा पुरवठा करीत आहे. यामुळे पाण्याची टंचाई पूर्वीपेक्षा थोडी कमी झाली आहे.

जो उपाय सांगताना सोपा वाटत होता, तो प्रत्यक्षात आणणे मात्र अवघड होते. चौथीच्या वर्गातील कशिश शेख हिने झाडे वाचविण्याची आणि त्यांना पाणी देण्याची ही मोहीम सुरू करण्याच्या पूर्वीच्या दिवसांबद्दल सांगितले की, गावामध्ये पाण्याची कमतरता असल्याने शाळेतील झाडांना पाणी द्यायचे म्हटले की लोक एक तर अनेक कारणे सांगत किंवा शाळेतील झाडांना पाणी देण्यास स्पष्ट नकार देत असत.

### अशी सुटली समस्या :

कशिश म्हणाली, ''आम्हांला ५० पेक्षा अधिक बाटल्या पाणी हवे होते. सगळी मुले म्हणाली, की प्रत्येक जण घरून एक बाटली पाणी आणेल, पण शाळेजवळ जो हातपंप होता त्यातून उन्हाळ्यात पाणी येणे बंद झाले होते. मग असे ठरले की, प्रत्येक जण दर दिवशी फक्त एक बाटली पाणी घरून शाळेत आणेल.''

अशाप्रकारे झाडांसाठी दररोज ५० बाटल्यांमधून ५० लीटर पाणी उपलब्ध होऊ लागले. असे करून मुलांनी ९० ते १०० दिवसांत थेंबथेंब अशा पद्धतीने ५० लीटरपेक्षा अधिक पाणी झाडांच्या मुळांपर्यंत पोहोचविले. यामुळे विशेष करून छोटी झुडपं, जी प्रचंड ऊन आणि पाण्याची कमतरता यांमुळे सुकून/वाळून जाण्याच्या मार्गावर होती, ती पुन्हा हिरवी, टवटवीत झाली आणि शाळेच्या परिसरात पुन्हा एकदा हिरवळ फुलली.



झाडांना दररोज पाणी घालण्यासाठी प्रत्येकाकडे एक बाटली आहे.

**मुलांच्या वागणुकीतील बदलाने पल्लवित झाल्या आशा :**

या मोहिमेमुळे घडलेली सगळ्यात चांगली गोष्ट म्हणजे मुलांनी झाडे वाचवलीच परंतु आता मुलांना झाडांचे महत्त्व पुरेपूर समजले आहे. तिसरीच्या वर्गातील आरती कुटे म्हणाली, ''आम्ही पाणी देऊन झाडांना वाचविले कारण झाडे मोठी झाल्यावर आपल्याला सावली देतात. फळे, फुले देतात. झाडांपासून आपल्याला शुद्ध हवा मिळते. झाडांपासून सरपणाचे लाकूडही मिळते.'' तिसरीच्या वर्गातील कोमल सागळे सांगतो की, पूर्वी तो जसा विचार करीत असे तसा विचार तो आता करीत नाही. यापूर्वी तो मित्रांबरोबर झाडांच्या छोट्या फांद्यांना लोंबकळत असे. त्यामुळे अनेक वेळा त्या फांद्या तुटत असत, पण तो आता कोणत्याही प्रकारे झाडांचे नुकसान करीत नाही.



बाटलीतून थेंब थेंब पाणी झाडाच्या मुळापर्यंत पोहोचविणारी एक मुलगी

एक मुख्याध्यापिका म्हणून गीतांजली बंदरे आपल्या पुढच्या योजनेबद्दल माहिती देतात. शाळेच्या परिसरात चार मेगावॅट क्षमतेचा एक सौरऊर्जा प्रकल्प उभारला जावा, अशी त्यांची इच्छा आहे. त्यासाठी जवळपास ८० हजार रुपये खर्च येणार आहे. यासाठी शाळेच्या पुढाकाराने शाळेची व्यवस्थापन समिती आणि सरपंच यांच्यामध्ये बैठक झाली आहे.

'लोकांनी ठरविले तर पुढच्या वर्षीपर्यंत आम्हांला अजून एका उपक्रमात यश मिळेल असे वाटते कारण मूल्यवर्धनने आम्हांला सगळ्यांच्या साथीने काम करण्याचा आणि निर्णय घेण्याचा मार्ग सांगितला आहे', असे गीतांजली बंदरे शेवटी अगदी विश्वासाने सांगतात.

# २१. शाळेला शिस्त

**युनेस्कोच्या जगप्रसिद्ध वारसास्थळांपैकी वेरूळ अथवा एलोराच्या गुहा औरंगाबाद जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणापासून ३० किलोमीटरवरील कन्नड तालुक्यात आहेत. या ठिकाणापासून काही पावलंच दूर असलेली एक सरकारी शाळा या शाळेतील मुलांमधील एकता आणि शिस्तीमुळे स्वत:ची एक वेगळी ओळख निर्माण करीत आहे.**

या शाळेतील मुलांची आपापसात असलेली मैत्री, त्यांच्यातील परस्पर सहकार्य आणि विविध उपक्रमांतील त्यांचा सक्रिय सहभाग या कारणांनी ही शाळा चर्चेत आहे. परंतु दोन वर्षापूर्वी येथील परिस्थिती अशी नव्हती. येथील शिक्षिका सांगतात की, मुलांच्या वागणुकीतील या बदलामध्ये मूल्यवर्धनची भूमिका महत्त्वाची आहे.

वेरूळ येथे असलेल्या जिल्हा परिषदेच्या या प्राथमिक मराठी शाळेत २६१ विद्यार्थी आहेत. सन १९४९ मध्ये स्थापन झालेली ही शाळा दीड एकर जागेत पसरली आहे. या शाळेत मुख्याध्यापकांसह ९ शिक्षक-शिक्षिका आहेत. सुमारे १०,००० इतकी लोकसंख्या असलेल्या या गावातील अनेक परिवार पर्यटन व्यवसायात आहेत. काहीजण त्याला जोड म्हणून शेती आणि मजुरी करतात. जानेवारी २०१७ पासून या शाळेत मूल्यवर्धन या विषयाच्या अध्यापनाला सुरुवात झाली.

शाळेतील बहुतांश विद्यार्थ्यांच्या वागणुकीमध्ये बदल झाला असून त्याबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता पांडे समाधानी दिसतात. वर्गाबाहेर मुलांनी एका रांगेत काढलेल्या आणि व्यवस्थित ठेवलेल्या चपलांकडे त्या हातानेच निर्देश करतात.

त्या म्हणतात की, या प्रकारची वागणूक साधारण सगळ्याच शाळांमध्ये असते. त्यामुळे या शाळेत झालेला हा बदल पहिल्या नजरेत कुणाच्याही लक्षात येत नाही. परंतु दोन वर्षांपूर्वी या मुलांच्या वागणुकीचे चित्र वेगळचे होते. मुलांमध्ये शिस्त नव्हती. ती शाळेत वेळेवर येत नव्हती. वर्गात हजर असलेली खूप कमी मुले एकमेकांना मदत करीत ही मुले आपल्या वस्तू एकमेकांना देत नव्हती.




मुलांचे एकत्रित मिसळणे

## मुलांवर झाला सकारात्मक परिणाम :

हळूहळू मूल्यवर्धनच्या तासाला शिक्षकांच्या पुढाकाराने दैनंदिन व्यवहारावर आधारित चर्चा आणि कृती यांमध्ये मुले सहभाग घेऊ लागली. या चर्चा आणि कृती यांतून बऱ्याच मुलांनी अनेक मूल्ये आत्मसात केली. उदाहरणार्थ चौथीच्या वर्गात शिकणारी बुशरा शेख सांगते की, उपक्रमातील एक कृती आणि चर्चेमधून ती दैनंदिन वेळापत्रक कसे बनवायचे हे शिकली आणि तिने तिचे रोजचे वेळापत्रक बनविले. आता ती त्या वेळापत्रकाचे व्यवस्थित पालन करते. यामुळे तिला अभ्यासाला वेळ मिळतो.

तिच्याच वर्गातील अजिंक्य कांबळे हा मुलगा पूर्वी आपली कोणतीही वस्तू दुसऱ्या कोणाला देत नसे, त्यामुळे दुसरी मुलेही त्याला आपली कोणतीही वस्तू देत नसत परंतु आता अनेक मुले आपापल्या वस्तूंची देवाणघेवाण करू लागली आहेत.

श्रीमती मगर या शिक्षिका सांगतात की, मूल्यवर्धनाच्या तासाला प्रामाणिकपणाशी संबंधित कृती आणि चर्चा घेण्यात आल्या. यात मुलांनी भाग घेतला. त्या चर्चा आणि कृती यांचा मुलांवर सकारात्मक प्रभाव पडतो आहे. याचे एक उदाहरण

म्हणजे आता शाळेच्या आवारात एखाद्या मुलाला किंवा मुलीला जर एखादी वस्तू किंवा गोष्ट पडलेली सापडली तर ती वस्तू किंवा पैसे तो मुलगा किंवा मुलगी मुख्याध्यापकांकडे नेऊन देतात. याशिवाय प्रत्येक वर्गातील मुलांनी आपापल्या वर्गासाठी नियम तयार केले असून त्यांचे पालन हळूहळू ही मुले करीत आहेत.

अंजली वामनसा या शिक्षिकेच्या मते मुले आता आपल्या वर्गात आलेल्या पाहुण्यांचे स्वागत करतात, तर अनेक वेळा अशा विशेष पाहुण्यांची मुलाखतही मुले स्वत:हून घेतात. मुख्याध्यापिकांना यासाठी कोणतेही विशेष वेगळे प्रयत्न करावे लागत नाहीत.

संगीता पांडे यांच्या मते मुलांच्या वागणुकीत बदल घडवून आणण्यासाठी त्यांना कोणतेही विशेष प्रयत्न करावे लागले नाहीत. त्या म्हणाल्या, ''आम्ही मूल्यवर्धन कार्यक्रम केवळ नियमित, व्यवस्थित आणि क्रमश: पद्धतीने राबविला. यामुळे मुलांना मूल्यवर्धनमधील मूल्ये आत्मसात करताना कोणतीही अडचण आली नाही. मूल्यवर्धनचा हेतू अथवा विचार सकारात्मक आणि सामाजिक रचनेला अनुकूल आहे. असे असल्यामुळेच ते मुलांना लवकर समजते असे आम्हांला वाटते.''



प्रकाश संश्लेषण प्रक्रिया स्पष्ट करणारी भिंतीवरील एक आकृती

यावर आणखी चर्चा केली असता शिक्षिकांनी सांगितले की, आठवड्यातून दोनदा मूल्यवर्धनचा तास असतो. या तासाला मुलांच्या चांगल्या विचारांचे आणि कामाचे कौतुक केले जाते. त्याचप्रमाणे चांगल्या सवयींना प्रोत्साहन आणि वाईट सवयींबाबत त्यांना त्या अयोग्य का आहेत हे समजावून दिले जाते.

या व्यतिरिक्त सांघिक खेळातून या मुलांमध्ये एकतेची भावना विकसित होते आहे. मूल्यवर्धनच्या अनेक कृती आणि चर्चा या आपसातील भांडणे सोडविण्यावर भर देतात, त्यामुळे मुलांमधील भांडणेही कमी झालेली आढळून येत आहेत.

मूल्यवर्धन साहित्यातील विविध उपक्रम, विद्यार्थी कृती, पूरक वाचन आणि चर्चेसाठी समाविष्ट गोष्टी यांमुळे विविध विषय पूर्वीपेक्षा वेगळ्या रीतीने मुलांना शिकविण्याच्या दृष्टीनेही येथील शिक्षिकांना एक नवी दिशा मिळाली आहे. आर. के. मगर या शिक्षिका म्हणाल्या, ''आमची शाळा मुख्य रस्त्याला लागून आहे. या रस्त्यावर सतत वाहतूक असते. यामुळे अनेक मुलांना शाळेत येताना, जाताना अडचण होते. अशा वेळी मूल्यवर्धनच्या काही कृती आणि चर्चांमधून या मुलांना वाहतुकीचे काही व्यावहारिक नियम शिकविले जातात.''

त्या पुढे म्हणाल्या, ''मूल्यवर्धनचे अध्यापन सुरू झाल्यानंतर अनेक शिक्षिका आपल्या स्वत:च्याही अनेक सवयींबद्दल अधिक जागरूक आणि सतर्क झाल्या आहेत, म्हणजे आम्ही जर जेवणाच्या किंवा काही खाण्याच्या आधी हात धुतले तर इतर मुलेही आमचे पाहून अशा चांगल्या सवयींचे पालन आणि अनुकरण करतात, असे आमच्या लक्षात आले आहे.''

## ही आहे भावी योजना :

मूल्यवर्धनच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या भविष्यातील योजनेबद्दल बोलताना संगीता पांडे म्हणाल्या, ''आमच्या प्रदेशात पाण्याची टंचाई आहे. त्यामुळे पुढच्या काळात आम्ही मुलांना पाण्याची बचत करणे आणि पाण्याच्या बचतीची सवय लावून घेणे हे शिकविण्यावर भर देणार आहोत.''

१५ जून २०१८ मध्ये त्यांनी वृक्षारोपण अभियान राबविले होते. यामध्ये वरच्या इयत्तांतील ५० पेक्षा अधिक मुलांनी गावामध्ये कडुनिंब, चिंच, आंबा, वड आणि पिंपळ ही झाडे लावली होती, असेही त्यांनी सांगितले.

# २२. शाळेतच बाजार आणि बँकही

**भाषा विषयांप्रमाणे गणितात गोष्टी, कविता नसल्याने अनेकदा लहान मुलांना हा विषय अवघड वाटतो. यामुळे मुलांमध्ये गणिताविषयी आवड निर्माण करणे आणि विषय सोपा करून शिकविणे गणिताच्या शिक्षकांसाठी एक आव्हान ठरते.**

औरंगाबादपासून साधारण ६५ किलोमीटर दूर कन्नड तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विटा येथे हीच परिस्थिती होती.




**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विटा परिसर**

या शाळेतील शिक्षकांनी सांगितले की, एक वर्षापूर्वी गणिताच्या वर्गात मुलांची उपस्थिती अगदी कमी असायची. बहुतेक मुले अंकांचे क्लिष्ट प्रश्न सोडविता येत नसल्याने आणि वेळेवर गृहपाठ पूर्ण न करता आल्याने शिक्षकांना घाबरत असत. त्यामुळे ती गणिताच्या तासाला यायला घाबरत. येथील बऱ्याच मुलांचे गणित फारसे चांगले नव्हते. त्याचे कारण हे होते.

मूल्यवर्धनमधील शिक्षणाच्या नव्या पद्धतीमुळे फक्त एका वर्षात ही परिस्थिती बदलली आहे. येथील शिक्षकांच्या मते या शाळेची मुले आता गणितात चांगली प्रगती करीत आहेत. मागील वर्षापर्यंत इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंतची फक्त ३०% मुले गणितात चांगली किंवा समाधानकारक प्रगती करू शकत होती. मूल्यवर्धनच्या अध्ययन पद्धतींवर आधारित उपक्रम आयोजित केल्याने इतर मुलेही चांगली प्रगती करू लागली.



**मोकळ्या मैदानात भरतात गणिताचे वर्ग**

या दरम्यान गणित विषयात मागे असणाऱ्या मुलांकडे विशेष लक्ष देण्यात आले. गणिताच्या शिक्षकांनी मुलांच्या जोड्या आणि गट बनविले व त्यांना एकमेकांकडून हसतखेळत शिकण्याची संधी निर्माण करून दिली. त्यामुळे आता येथील सर्व मुले गणितात अपेक्षेपेक्षा चांगली कामगिरी करीत आहेत.

गणिताचे शिक्षक आर. बी. देशमुख यांच्या मतानुसार मूल्यवर्धन उपक्रमातील अध्ययन पद्धतींना अनुसरून गणिताचे प्रश्न सोडविता आल्याने आता कोणीही कोणाला चिडवित नाहीत. चुकीचे उत्तर असले तरी शिक्षकांना दाखवायला आता मुले घाबरत नाहीत.

महत्त्वाची गोष्ट अशी की, येथील मुलांमध्ये गणिताची आवड एवढी वाढली आहे की हा विषय त्यांच्या दैनंदिन आयुष्यातही उपयोगी ठरत आहे. उदाहरणार्थ, ते शाळेच्या परिसरात बाजार भरवितात. या बाजाराच्या माध्यमातून त्यांनी पैशांचे व्यवहार आणि अनेक वस्तूंचे मोजमाप या विषयीचे व्यवहारज्ञान आत्मसात केले आहे. याच प्रकारे, या मुलांनी शाळेत आपली एक बँकदेखील सुरू केली आहे.

जवळपास तीन हजार लोकसंख्या असणाऱ्या विटा गावातील लोकांचे उपजीविकेचे प्रमुख साधन शेती हे आहे. मराठी माध्यमाची ही शाळा १९४६ साली स्थापन झालेली असून येथे इयत्ता पहिली ते पाचवीची एकूण १३२ मुले शिकतात. यात

७२ मुले व ६० मुलींचा समावेश आहे. शाळेत मुख्याध्यापकांसमवेत एकूण ६ शिक्षक शिकवितात. या शाळेत नोव्हेंबर २०१८ पासून मूल्यवर्धन उपक्रमांच्या आयोजनास सुरुवात झाली आहे.

### मुले बनली शिक्षक :



शिक्षक गणिताच्या अध्यापनासाठी मूल्यवर्धन शिक्षण पद्धतीचा उपयोग करतात

आर. बी. देशमुख सरांनी शाळेच्या एका वर्षापूर्वीच्या परिस्थितीबद्दल सांगितले की, मुलांमध्ये गणिताबद्दल आवड निर्माण करण्यासाठी त्यांनी काही प्रयत्न पूर्वीही केले होते, पण तरीही मुलांमध्ये अपेक्षित प्रगती दिसून येत नव्हती. ते म्हणाले, ''तेव्हा माझ्या वर्गात मुले गप्प राहत. विशेषतः गणितात कच्चे असणारे विद्यार्थी भीतीमुळे एक तर काहीच विचारत नसत किंवा लपून पाठीमागे बसून असत. मग मी मूल्यवर्धनच्या पद्धती वापरून शिकविण्यास सुरुवात केली. या दरम्यान हुशार आणि कमजोर मुलांच्या जोड्या आणि गट बनविले. जेव्हा हुशार मुले कमजोर मुलांना गणित सोडविण्यास मदत करू लागली, तेव्हा त्यांना जबाबदारीची जाणीव झाली. ती मुले कमजोर मुलांना अधिकाधिक मदत करू लागली. एकप्रकारे मी असे म्हणेन, ती मुले माझेच काम करू लागली किंवा मला मदत करू लागली.''

मुख्याध्यापक बाबासाहेब भागीनाथ यांनी सांगितले की, त्यांच्या मनात प्रथम अशी शंका होती की शिकविण्याची ही नवीन पद्धती मुलांना आवडेल की नाही, पण २-३ महिन्यांमध्ये जेव्हा जोडी आणि गटांमध्ये मुले एकमेकांना मदत करू लागली, शिकू लागली आणि चांगली प्रगती करू लागली, तेव्हा त्यांनी याला आणखी प्रोत्साहन दिले.

इयत्ता पाचवीमधील प्रतिक गाले याने सांगितले की, वर्गात शिक्षक वेगवेगळे खेळ देखील घेतात. अनेकदा वर्गात नाच आणि गाणीही घेतात. यामुळे त्याला वाटते की देशमुख सर शिक्षक नसून वर्गातील एक विद्यार्थीच आहेत.

इयत्ता दुसरीच्या वर्गातील कृष्णा शिंदेला 'माझ्या क्षमता' हा उपक्रम खूप आवडतो. तो म्हणतो, ''यामध्ये आम्ही कोणते काम किती चांगले करू शकतो हे कळते. यात आम्हीच स्वतःला मार्क देतो. जसे की, जर आम्ही आईच्या मदतीशिवाय अंघोळ करू शकत नसू तर स्वतःला ० मार्क देतो, पण जर आईच्या मदतीने स्वतः साबण लावू शकत असू तर स्वतःला १ किंवा २ मार्क देतो आणि इतर कोणाच्या मदतीशिवाय अंघोळ करू शकत असू तर स्वतःला ३ मार्क देतो.''



गाणित विषय मुलांच्या रोजच्या व्यवहारात आणण्यासाठी प्रयत्न

याबद्दल शिक्षक आर. के. गडाख म्हणतात की, मूल्यवर्धनच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांची आकडेमोडीची क्षमता विकसित होते. त्याचबरोबर ते प्रामाणिकपणे स्वतःचे काम करू लागतात आणि आपल्यातल्या कौशल्यांची त्यांना जाणीव होऊ शकते.

दुसरीकडे, गणितावर आधारित काही सहयोगी खेळांमुळे देखील या विषयाची मुलांची आवड वाढत आहे. यामुळे परीक्षेत चांगली कामगिरी करीत आहेत. याशिवाय गणिताच्या तासाला





विद्यार्थी खेळातून शिकतात गणित

चित्रे, व्हिडिओ आणि इतर खेळण्यांचा किंवा उपकरणांचा देखील वापर करण्यात येत आहे. यामुळे मुले कठीण प्रश्नही आरामात सोडवू लागले आहेत.

इयत्ता तिसरीच्या हरिओम निकम याने सांगितले की, पहिलीच्या मुलांना बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार सर्व क्रिया यायला लागल्या आहेत. तो म्हणाला, ''सर्व मुले गटात लिहितात, वाचतात, खेळतात आणि शिकतात यामुळे हे सर्व होत आहे.''

मूल्यवर्धन उपक्रमांच्या आयोजनाला सुरुवात झाल्यानंतर दोनच महिन्यात, जानेवारी २०१९ मध्ये विद्यार्थ्यांनी शाळेच्या परिसरात बाजार भरविला. यामध्ये शाळेच्या सर्व कर्मचाऱ्यांबरोबरच विद्यार्थ्यांचे कुटुंबीय, ग्रामस्थ आणि शिक्षण विभागाचे अधिकारी देखील उपस्थित होते. आर. बी. देशमुख यांच्या मते चांगली गोष्ट अशी की, जे विद्यार्थी सर्वांसमोर यायला घाबरत असत, ते त्या दिवशी उत्तमरित्या देवाण-घेवाण करीत होते. मुले चांगल्या प्रकारे आपल्या वस्तू विकत होते व पैशांचा हिशोब ठेवीत होते.

इयत्ता पाचवीची प्रणाली खैरनार म्हणाली, ''त्या दिवशी मी शेतातून एक मोठी पिशवी भरून कांदे आणले होते. सर्व कांदे विकले. तीनशे रुपये कमावले.''

### म्हणून तयार केली बँक :

यानंतर विद्यार्थांनी एक बँक चालू केली. बँकेला त्यांनी 'आदर्श विद्यार्थी बँक' असे नाव दिले. विद्यार्थ्यांनी चर्चेदरम्यान सांगितले की, ते घरून मिळणारे खाऊचे पैसे बँकेत जमा करतात. ही बँक प्रत्येक वर्गात चालविली जाते. मुले आपले पैसे आपल्या बँकेत वर्गशिक्षकांकडे जमा करतात. वर्गशिक्षकांकडे एक पासबुक असते. या पासबुकामध्ये विद्यार्थ्याचे नाव, पत्ता, इयत्ता आणि इतर माहितीबरोबरच एक पासपोर्ट आकाराचा फोटो देखील असतो. याच पासबुकमध्ये मुलांच्या देवाणघेवाणीचा संपूर्ण हिशोब ठेवला जातो. बँकेत जेव्हा एखादा मुलगा पैसे जमा करतो किंवा काढतो तेव्हा त्याला त्याच्याशी संबंधित एक पावती दिली जाते.

शिक्षक जी. ए. दुबे यांनी सांगितले की, मुलांना बँकेचे कामकाज समजणे हा यामागील उद्देश आहे. या आधी मुलाला आठवी किंवा दहावीमध्ये गेल्यानंतर बँकेचा अर्थ समजत असे परंतु आता चौथी, पाचवीची मुले बँकेची कार्यपद्धती फक्त समजूनच घेत नाहीत, तर स्वतः बँक चालवीत आहेत. त्यामुळे त्यांच्यामध्ये बचतीची सवय विकसित होत आहे.

पाचवीतील देवेंद्र भोजनेला आता बँकेचे महत्त्व समजले आहे. तो म्हणाला, ''अनेकदा आमच्या घरचे शेतात काम करण्यासाठी जातात. जर आम्हांला पेन किंवा वही विकत घ्यायची असेल तर आमच्याकडे पैसे नसायचे. आम्ही कोणाकडे मागू देखील शकत नव्हतो, पण आता आमच्या बचतीचे पैसे आहेत. आम्हांला पैसे हवे असल्यास एक पावती भरावी लागते. त्यानंतर आम्ही आमच्या गरजेची गोष्ट त्या पैशांतून विकत घेऊ शकतो.''

# २३. मुलींनी शाळेला दिली नवी ओळख

**काही सरकारी शाळांत मुलींची संख्या मुलांपेक्षा जास्त आहे. दिवील येथे पण तशीच परिस्थिती आहे, पण या वैशिष्ट्यापेक्षा दिवील येथील शाळेतील मुली आता मुलांच्या बरोबरीने काम करीत आहेत, हे अधिक महत्त्वाचे आहे. या बाबतीत रायगड जिल्हा प्राथमिक मराठी शाळा दिवील येथील उदाहरण अगदी बोलके आहे. ही शाळा अलिबागच्या जिल्हा मुख्यालयापासून जवळपास १३० किलोमीटर दूर, पोलादपूर तालुक्यात आहे. सातत्याने चालू असलेल्या मूल्यवर्धनच्या सत्रांमुळे मुलींच्या वागण्यात बदल दिसू लागले आहेत. मूल्यवर्धनमुळे हे येथील शिक्षकांना शक्य झाले.**

आता मुली येथे शाळेच्या वेळेआधी पोहोचतातच, शिवाय शाळेत नियमित उपस्थित असतात. एवढेच नाही तर, येथे बऱ्याच मुली शाळेच्या व्यवस्थापनातील काही कामांमध्ये हिरिरीने भाग घेत आहेत. मग ती गोष्ट खेळाची असू दे, नाही तर अभ्यासाची; स्वच्छतेची असू देत, नाही तर अभिव्यक्तीच्या कौशल्याची छोट्या मुलांकरिता असणारी आपली जबाबदारी निभाविण्याची असू देत, नाहीतर नेतृत्वक्षमतेची. येथील बऱ्याच मुलींची त्यांच्या वागण्यातून या भागात स्वतःची अशी एक वेगळी ओळख निर्माण होत आहे.



**मूल्यवर्धनमुळे अधिकाधिक मुलींचा सहभाग वाढत आहे.**

जवळपास १००० लोकसंख्या असणाऱ्या दिवील गावामध्ये उच्च आणि मध्यम परिस्थिती असलेली शेतकरी कुटुंबे आहेत. ते धान्य, डाळी आणि तेलबियांचे उत्पादन घेतात. सन १९३२ मध्ये स्थापन झालेल्या या शाळेत एकूण ६२ मुलांमध्ये ३२ मुली आणि ३० मुले आहेत. येथे जून २०१८ पासून मूल्यवर्धनचे उपक्रम आयोजित केले जात आहेत.



**रायगड जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा दिवीलचा परिसर**

## अशी झाली मुलींची प्रगती

शिक्षक द्वारकानाथ गुरव म्हणतात की, मूल्यवर्धन कार्यक्रमापूर्वी मुलींना मुलांच्या तुलनेत शाळेचे फारसे आकर्षण नव्हते. घरच्या कामांमुळे त्या नेहमी शाळेत वेळेवर पोहोचू शकत नसत म्हणून अभ्यासात मागे असण्यामुळे त्या शाळेच्या इतर कामांमध्येही भाग घ्यायला बिचकत असत. याच कारणामुळे त्या काही महत्त्वाच्या कार्यक्रमात आणि प्रदर्शनात पूर्ण आत्मविश्वासाने सहभागी होऊ शकत नव्हत्या.

येथे मुलींची संख्या जास्त आहे. त्यामुळे साहजिकच त्यांच्या मागे राहण्यामुळे शाळेच्या एकूण शैक्षणिक कामांवर खूप परिणाम होत होता.

मूल्यवर्धनच्या शिक्षणपद्धतींमुळे आणि उपक्रमांमुळे मुलींचा संकोची स्वभाव बदलण्यात हळूहळू शाळेला यश मिळू लागले. काही कार्यक्रमांची पूर्ण जबाबदारी मुलींवर टाकली जाऊ लागली. त्याबरोबरच शाळेने कुटुंबातील लोकांच्या वरचेवर



**शाळेच्या मैदानात खेळात दंग झालेल्या मुली**

भेटी घेऊन मुलींना शाळेत वेळेवर पाठविण्याची विनंती केली आणि पालकांनी ती मान्य केली. संधी मिळाल्यावर कठोर परिश्रम आणि सराव करून येथील मुलींनी गेल्या वर्षी तालुका स्तरावरील कबड्डी आणि पळण्याच्या शर्यतीत पहिला नंबर मिळविला. अशा प्रकारे त्यांनी गेल्या वर्षी तालुका स्तरावर आयोजित केलेल्या विज्ञान प्रदर्शनात प्रश्नोत्तरे आणि भाषण यामध्ये दुसरा नंबर मिळविला. याशिवाय गेल्या वर्षी आयोजित केलेल्या शिक्षण केंद्रस्तरावरील पारंपरिक नृत्यातही दुसरा नंबर मिळविला.

### मूल्यवर्धनने दिली संधी :

येथील शिक्षिका सीमा काळे म्हणतात, ''मूल्यवर्धन हा जीवन व्यवहारावर आधारित कार्यक्रम आहे. त्यामुळे मूल्यवर्धनच्या सत्रातून सातत्याने सहभाग घेताना मुलींना आपोआप आपले व्यक्तिमत्त्व फुलविण्याची संधी मिळाली. विशेषतः सामूहिक खेळ आणि समूहाने काम करण्याच्या प्रवृत्तींना प्रोत्साहन दिल्यामुळे त्यांच्यात मोकळेपणा आला. त्या नि:संकोचपणे बोलू लागल्या आणि प्रश्न विचारू लागल्या.''

दुसऱ्या बाजूला खास करून 'महिलांना आदर देणे' आणि 'लैंगिक भेदभाव' अशा मूल्यवर्धनच्या उपक्रमांचा सगळ्या मुलांवर सकारात्मक परिणाम झाला. या दरम्यान घर आणि शेतीमध्ये स्त्रिया किती महत्त्वाची कामे करतात आणि त्यांच्या कामाकडे कशाप्रकारे दुर्लक्ष केले जाते हे अनेक मुली सांगू लागल्या. याशिवाय 'घरातील जबाबदाऱ्या', 'देखभाल करणारी मुलगी' आणि 'इमानदारीचे फळ' अशा उपक्रमांच्या मदतीने शाळेने कोणती कामे मुलांची आणि कोणती मुलींची याबाबतच्या काही पारंपरिक धारणा बदलण्याचाही प्रयत्न केला.

यानंतर शाळेने मुलींच्या मार्गदर्शनाखाली बालसभांचे आयोजन केले. दिनांक ३० जानेवारी २०२० रोजी याच साखळीतील मुलींच्या मार्गदर्शनाखाली सर्व मुलांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा जन्मदिवस साजरा केला. यात मुलींनी शाळेच्या वाचनालयातून क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्याविषयी खूप माहिती गोळा केली. जोडी चर्चेच्या माध्यमातून शाळेतील सर्व मुलांना सांगितली.

### मुली सांभाळत आहेत शाळा :

शिक्षिका अपेक्षा भोसलेंच्या म्हणण्यानुसार मूल्यवर्धन कार्यक्रम अंमलबजावणीमुळे गेल्या दीड वर्षात मुलींच्या अभ्यासाचा स्तर सुधारला आहे. आधीच्या शैक्षणिक सत्रांच्या तुलनेत यावेळी मुलींच्या परीक्षेचा निकाल २०% अधिक चांगला लागला आहे. आता खास करून तिसरी आणि चौथीच्या मुली पहिल्यापेक्षा अधिक विनम्र, शिस्तबद्ध आणि जबाबदार झाल्याचा अनुभव येत आहे. दुसरीकडे शाळेच्या रोजच्या कार्यक्रमात मुलींचे जबाबदारी घेण्याचे प्रमाण वाढत चालले आहे. चौथीची समीक्षा भिलारे सांगते, ''आम्ही काही मैत्रिणींनी मिळून एक गट बनविला आहे. आम्ही सगळ्याजणी मिळून शाळेच्या बागेतील झाडांना पाणी देतो, स्वच्छतेकडे लक्ष देतो.'' चौथीच्या इयत्तेतील प्राची चाढवीकर सांगते,''शाळेत किंवा घरी जाऊन छोट्या मुलांना शिकविणारा आमचा अजून एक गट कार्य करीत आहे.''

# २४. टाकाऊपासून उपयुक्त वस्तूंनी सजली शाळा

**मुख्याध्यापक संतोष नागे यांनी मूल्यवर्धनमधून प्रेरणा घेऊन केलेल्या प्रयत्नांमुळे मुले हस्तकलेत लक्ष घालू लागली आहेत.**

सरकारी शाळेचे एक मुख्याध्यापक मुलांना कचऱ्यातून काही वस्तू पुन्हा बनविण्याच्या आणि त्यांचा पुनर्वापर करण्याच्या पद्धती शिकवीत आहेत.



**मुख्याध्यापक संतोष नागे यांच्याकडून प्रेरणा घेऊन मूल्यवर्धन सत्रात हस्तकलेच्या वस्तू तयार करताना विद्यार्थी**

मूल्यवर्धनकडून मिळालेल्या प्रेरणेमुळे शिक्षकांनी केलेल्या प्रयत्नांचा परिणाम असा झाला आहे की, मुले हस्तकलेत पारंगत तर होतच आहेत, पण त्यांची सौंदर्यदृष्टीही वाढत आहे आणि ती पर्यावरणाविषयी संवेदनशील बनत आहेत.

मुलांना असे शिक्षण देणारे मुख्याध्यापक संतोष नागे रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक मराठी शाळा तळेगाव तर्फे येथे काम पाहतात. जिल्हा मुख्यालय अलिबागपासून जवळपास ११५ किलोमीटर दूर असलेल्या माणगाव तालुक्यातल्या या शाळेत जून २०१८ पासून मूल्यवर्धनची सत्र घेतली जातात.

संतोष नागे सरांच्या म्हणण्यानुसार हे सगळे शक्य झाले ते मूल्यवर्धनच्या 'पर्यावरण', 'वाया गेलेले प्लॅस्टिक', 'स्वच्छता', 'कचरा व्यवस्थापन' आणि 'रद्दी कागदांचा पुन्हा उपयोग' अशा उपक्रमांमुळे.

यामुळे त्यांना मुलांसाठी एक वेगळा प्रयत्न करायला निश्चित वेळ तर मिळालाच पण त्याची एक व्यवस्थित रूपरेषा बनविण्याची संधीही मिळाली. त्यामुळे जास्तीत जास्त मुले त्यांच्या उपक्रमात सहभागी झाली.

१९४८ साली स्थापन झालेल्या या शाळेत मुख्यध्यापकांसहित २ शिक्षक आणि एकूण ४७ मुलांमध्ये २७ मुले आणि २० मुली आहेत. जवळपास १००० वस्तीच्या तळेगाव तरफे या गावात आदिवासी जास्त आहेत. यात जास्त करून धान्य पिकविणारे छोटे शेतकरी आणि मजूर यांची कुटुंबे आहेत.

### शाळा बदललेली दिसते :

मूल्यवर्धनच्या सत्रांसहित इतर प्रसंगी या मुलांनी आपापले वर्ग सजविण्यासाठी कितीतरी वस्तू बनविल्या आहेत. त्यांनी रद्दी कागद आणि कचऱ्यातील इतर वाया गेलेल्या वस्तूंपासून क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा फोटो ठेवण्यासाठी सुंदर मंदिर बनविले आहे. त्यांनी कचऱ्यातील प्लॅस्टिकच्या बाटल्यांपासून फुले आणि फुलदाण्या बनविल्या आहेत. याशिवाय मुलांनी खोक्यांच्या मोठ्या कागदांपासून पोस्ट ऑफिसचे मॉडेल बनविले आहे. याबरोबरच कागदाच्या टोपल्या आणि कलश तसेच प्लॅस्टिकचे माठ आणि पर्स अशा वस्तूही बनविल्या आहेत.

'पण हा विचार आला कसा?' असा प्रश्न विचारला असता संतोष नागे सर म्हणतात की, याची सुरुवात झाली ती पहिलीच्या मूल्यवर्धन विद्यार्थी उपक्रम पुस्तिकेमध्ये असणाऱ्या 'उंदराची टोपी' या उपक्रमातून. या उपक्रमात मुलांना टोपी बनवून ती रंगविणे असा अभ्यास करायचा होता. संतोष सरांनी मुलांना जुन्या वर्तमानपत्रापासून टोपी बनवायला शिकविली. असेच त्यांनी जेव्हा मुलांना कागदाची नाव आणि फुले बनवायला शिकविले तेव्हा मुलांना अशा उपक्रमांची गोडी लागली.

यानंतर 'कचरा व्यवस्थापन' याच्याशी जोडलेल्या उपक्रमांच्या वेळी मुलांनी कचऱ्याचे वर्गीकरण यावर चर्चा करताना कचऱ्यातील कोणत्या कोणत्या वस्तूंचा दुसऱ्यांदा वापर होऊ शकतो यावर चर्चा केली. अशाप्रकारे 'वाया गेलेले प्लॅस्टिक' या उपक्रमाच्या वेळी मुलांनी प्लॅस्टिकची समस्या कमी करण्यासाठी काय काय प्रयत्न करता येऊ शकतात आणि वाया गेलेले प्लॅस्टिक कमी करणे कसे शक्य आहे याविषयी चर्चा केली.

यातूनच मुख्याध्यापकांनी इंटरनेटवरील यू-ट्यूबवरून मूल्यवर्धनच्या पुस्तिकांपेक्षा वेगळ्या अशा कचऱ्यातील वस्तूंपासून अनेक नव्या आणि उपयोगी वस्तू बनविण्याच्या पद्धती मुलांना शिकविल्या.



**मूल्यवर्धन उपक्रमात विद्यार्थ्यांनी स्वत: तयार केलेल्या वस्तू**

## अशी बनली हस्तकलेची प्रयोगशाळा :

संतोष नागे सांगतात की, सुरुवातीला जेव्हा त्यांनी मूल्यवर्धनच्या सत्रात काही वस्तू बनवून मुलांना त्याविषयी सांगितले, तेव्हा मुलांनी त्यात काही रस दाखविला नव्हता. पण चर्चा करताना काही मुले असे मात्र म्हणत होती की, वाया गेलेल्या वस्तू जर परत बनविल्या तर सुंदर दिसतील.

मुख्याध्यापक नेहमी मुलांना शाळेच्या परिसरात किंवा त्याच्या आसपास पडलेल्या प्लॅस्टिकच्या बाटल्या आणायला सांगत असत.

मग ते मुलांसमोरच बाटल्यांपासून फुले वगैरे बनवायचे. त्यातून मुलांमध्ये कोणती वस्तू कशी तयार झाली, याविषयी कुतूहल निर्माण झाले. तेव्हा मुख्याध्यापक त्यांना सांगायचे की, अशा वस्तू बनविणे अगदी सोपे आहे. मग ज्यांना त्यात रस होता ती मुले मुख्याध्यापकांबरोबर अशा वस्तू बनवायला शिकू लागली. हळूहळू अशा प्रकारच्या उपक्रमात सामील होणाऱ्या मुलांची संख्या वाढत गेली.

या दरम्यान मुख्याध्यापक सगळ्या मुलांना एका गोष्टीकडे नेहमी लक्ष द्यायला सांगायचे की पेपर कटर आणि कात्री अशा धोकादायक वस्तूंचा उपयोग करताना मोठ्या व्यक्तीची मदत घ्या.

## असे फुलले मुलांचे व्यक्तिमत्त्व :

दुसरीतील चेतन शिंदे सांगतो की, आता तो पाण्याची बाटली, जुनी वही किंवा पुस्तक, खोक्याचे मोठे कागद आणि रद्दीचे कागद जपून ठेवतो आणि त्यातून काय तयार करता येईल याचा विचार करतो. याशिवाय खूप मुलांमध्ये कलेविषयी आकर्षण निर्माण होत आहे आणि ते पुनर्निर्मितीच्या या प्रक्रियेत स्वतः हिरिरीने भाग घेत आहेत.

दुसऱ्या इयत्तेतील साक्षी वाघमारे सांगते की, कचऱ्यातून वस्तू बनविण्यामुळे शाळेचा परिसर आपोआप स्वच्छ होतो. याबरोबरच काही मुले आपल्या वर्गातील वस्तू सांभाळून ठेवण्यास शिकत आहेत.

संतोष नागे सांगतात की, काही मुलांनी रद्दी कागद आणि उरलेले प्लॅस्टिक यांपासून बनविलेल्या काही वस्तू इतक्या छान झाल्या आहेत की, लोकांचा विश्वासच बसत नाही की त्या वस्तू छोट्या मुलांनी बनविल्या आहेत.

# २५. मुलांमध्ये आला वैज्ञानिक दृष्टिकोन

**'आरोग्याच्या चांगल्या सवयी' आणि 'चांगली आणि वाईट वागणूक' अशा मूल्यवर्धनमधील काही उपक्रमांमुळे शाळेतील मुलांचा अंधश्रद्धेविरुद्धचा वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होत आहे.**

ही कथा रायगड जिल्हा मुख्यालयाच्या अलिबागपासून साधारणत: १०० कि.मी. अंतरावरील माणगांव तालुक्यातील उणेगांव जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेची आहे. येथील शिक्षक मुकेश भोस्तेकर मुलांनी शालेय शैक्षणिक दिनक्रमातून विज्ञान अंगीकारावे आणि अंधश्रद्धेपासून मुक्त व्हावे यासाठी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या मूल्यवर्धनच्या अनेक उपक्रमांच्या साहाय्याने विशेष प्रयत्न करीत आहेत.

यामुळे बहुतेक मुले आरोग्याविषयी जागरूक आहेत, जेव्हा कुटुंबातील एखादा सदस्य आजारी असतो, तेव्हा मांत्रिकाऐवजी कुशल डॉक्टरांकडून रुग्णावर उपचार करून घ्यावे असे सुचवितात. काही मुले शालेय परिपाठात विज्ञानाशी संबंधित अनेक मनोरंजक गोष्टी सांगतात. अनेक मुलांच्या मनातील भूतांविषयीची भीती संपुष्टात येत आहे. शकून–अपशकून या विषयीचे त्यांचे मत देखील बदलत आहे.



अंधश्रद्धा निर्मूलनासंदर्भात उनेगांव शाळेतील मुलांनी काढलेली जनजागृती फेरी

महत्त्वाची बाब म्हणजे आरोग्य आणि अंधश्रद्धा निर्मूलन या विषयांवर ग्रामस्थांमध्ये जनजागृती करण्यासाठी या शाळेच्या आवारात वेळोवेळी शिबिरे आयोजित केली जातात. शालेय मुले या विषयांवर पथनाट्याचे आयोजन करतात.

उणेगांव हे सुमारे दीड हजार लोकसंख्या असलेले गाव आहे. येथील कुटुंबे छोटे शेतकरी व कामगार आहेत. सन १९५८ साली स्थापन झालेल्या या शाळेत एकूण ४१ विद्यार्थ्यांमध्ये २३ मुले व १८ मुली आहेत. मुख्याध्यापकांसह एकूण ५ शिक्षक असून येथे जुलै २०१८ पासून मूल्यवर्धन उपक्रम आयोजित करण्यात येतात.

**म्हणून मूल्यवर्धनला बनविले माध्यम :**

शिक्षक मुकेश भोस्तेकर म्हणतात की, सुमारे दीड वर्षांपूर्वी गावातील मुले आजारी पडली की, पालक त्यांना सहसा मांत्रिकाकडे उपचारासाठी घेऊन जात असत. उपचाराच्या नावाखाली मांत्रिक मुलांना अंगारे लावून भजन गात असत. यामुळे अनेकदा त्यांची तब्येत आणखी बिघडे आणि ते अनेक दिवस शाळेत येऊ शकत नसत.

ऑगस्ट २०१८ मध्ये अनेक मुलांना कावीळ झाल्याने ती शाळेत उपस्थित राहू शकली नाहीत. इतर मुलांकडे त्यांच्याविषयी विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, आजारी मुलांवर मांत्रिक बराच काळ उपचार करीत आहे. मात्र अजूनही बरे वाटत नसल्याने ते बरेच दिवस शाळेत येऊ शकणार नाहीत.

त्यानंतर शाळेच्या शिक्षकांनी मूल्यवर्धनच्या अनेक उपक्रमांची यादी तयार केली. असे ठरविले की, मूल्यवर्धनद्वारे विज्ञानावर आधारित वैद्यकीय उपचाराचे महत्त्व मुलांना समजावून सांगून अंधश्रद्धेकडे पाहण्याचे त्यांचे विचार बदलण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.

यासाठी शाळेने सर्व मुलांसाठी मूल्यवर्धनमधील काही उपक्रमांचे आयोजन संयुक्तपणे केले. उदाहरणार्थ, 'आरोग्याच्या चांगल्या सवयी', 'चांगले आणि वाईट वागणे', 'आरोग्याला हानिकारक बटणे', 'योग्य पर्याय निवडा', 'आव्हानात्मक परिस्थितीत निर्णय घेणे' यांसारख्या उपक्रमांद्वारे स्थानिक पातळीवर असणाऱ्या अंधश्रद्धा आणि त्यांचे परिणाम यांवर मुलांबरोबर चर्चा

केली. ज्या सवयींमुळे लोक आजारी पडतात, अशा घातक सवयी व त्यांचे दुष्परिणाम याविषयी मुलांनी जोडीत, गटात चर्चा केली. चर्चेद्वारे मुलांना एकमेकांकडून अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या. आजारी पडल्यास काय करावे, हे मुलांना समजले.

मूल्यवर्धन व्यतिरिक्त शाळेच्या इतर उपक्रमांमधून मुलांचा एकमेकांशी संवाद आणि शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन यामुळे अशा परिस्थितीत, आजारी व्यक्तीला योग्य वैद्यकीय उपचार व सल्ल्याची आवश्यकता असते हे मुलांना समजू लागले.

### असे बदलते मुलांचे वर्तन :

मुकेश भोस्तेकर स्पष्ट करतात की, मूल्यवर्धनच्या बहुतांश उपक्रमांचा थेट विज्ञानाशी संबंध नाही, परंतु बऱ्याच सत्रांमध्ये असे घडले की, मुले चर्चेच्या वेळी अंधश्रद्धेशी संबंधित गोष्टींवर आपले मत मांडू लागली. उदाहरणार्थ, मांजर जेव्हा आडवे जाते तेव्हा आपण पुढे जाणे चांगले किंवा वाईट यावर मुलांनी चर्चा केली.

अशा चर्चेदरम्यान, जेव्हा कोणत्याही अपशकुनाचा उल्लेख होतो, तेव्हा शिक्षकांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते. बऱ्याचशा घटना केवळ योगायोगाने घडतात, त्यांचा मानवी जीवनावर कोणताही परिणाम होत नाही, यावर अधिकाधिक मुले सहमत होऊ शकतील अशा निष्कर्षापर्यंत चर्चा नेण्याचा प्रयत्न करावा.



मूल्यवर्धनमधील काही उपक्रमांचे गावापासून दूर निर्जन ठिकाणी आयोजन

शाळेने गावातून थोड्या अंतरावर असलेल्या निर्जन जागेवर मूल्यवर्धनचे उपक्रम आयोजित केले. या जागेबद्दल असे म्हटले जात होते की, ते भूतांचे ठिकाण आहे. गावातील बहुतेक लोक मुलांना अशा ठिकाणी जाण्यापासून रोखतात. तथापि, शिक्षकांनी हे ठिकाण क्षेत्र निरीक्षणासाठी निवडले. निरीक्षणादरम्यान त्यांनी मुलांना सांगितले की, ते एक नैसर्गिक ठिकाण आहे. येथे आणि जगात कोठेही भूत नाही.

### अंधश्रद्धा निर्मूलनासाठी योजना :

या विषयावर, मुलांच्या कुटुंबातील लोकांनी विचार बदलले नाहीत, तर मुलांचे विचार बदलणे कठीण आहे म्हणूनच अंधश्रद्धा निर्मूलनासाठी लवकरच शाळेच्या आवारात अंधश्रद्धा निर्मूलन शिबिराचे आयोजन करण्याचा निर्णय शाळेने घेतला आहे. प्राचार्य श्रीकांत गावडे यांच्या म्हणण्यानुसार अंधश्रद्धा निर्मूलनशी संबंधित सामाजिक कार्यकर्ते, तज्ज्ञ, आणि वैज्ञानिकांना या शिबिरामध्ये बोलावले जाईल. यावेळी गावकऱ्यांना अंधश्रद्धेशी संबंधित प्रश्न विचारण्याची संधी दिली जाईल.

श्रीकांत गावडे नमूद करतात की, शाळेने ऑगस्ट २०१८ मध्ये आरोग्य शिबिर आयोजित केले होते. त्यामध्ये फिजिशियन आणि वैद्यकीय तज्ज्ञांना बोलावले होते. या वेळी मुलांच्या तसेच त्यांच्या कुटुंबीयांच्या आरोग्याची तपासणी करण्यात आली. त्यानंतर डॉक्टर व तज्ज्ञांनी गावकऱ्यांशी रोगराई पसरण्याची कारणे आणि त्यासंबंधित उपचार यांविषयी प्रदीर्घ चर्चा केली. त्यावेळी त्यांनी गावकऱ्यांना बाबांकडून आजारावर उपचार करून न घेण्याची विनंतीही केली.

मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होण्याची अनेक उदाहरणे आहेत. इयत्ता पाचवीमधील नंदन सत्वे म्हणतो, ''बऱ्याचदा हस्तरेषा पाहून भविष्य सांगणारे लोक गावात येतात. ते मुलांचे भविष्य सांगण्याच्या नावाखाली पैसे मागतात, पण मी आपले भविष्य जाणून घेण्यासाठी अशा माणसाला आपला हात दाखवीत नाही. आपले भविष्य आपल्या हातात आहे. जे काही आपल्याला मिळेल ते आपल्या श्रमानेच मिळेल.''

# २६. मुलांनी बनविले स्वतःचे वाचनालय

**मूल्यवर्धनमधील विद्यार्थी उपक्रम पुस्तिकांमधून प्रेरणा घेऊन एका शाळेतील मुलांनी आपले वाचनालय तयार केले.**

एका शाळेत मूल्यवर्धन उपक्रमांमुळे मुले पुस्तकांकडे अशाप्रकारे आकर्षित होत आहेत की, त्यांनी स्वतः आपले वाचनालय तयार केले आणि ती एकमेकांच्या सहकार्याने ते वाचनालय चालवीत आहेत.

वर्धा जिल्ह्यापासून ६५ कि.मी. अंतरावर हिंगणघाट तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा शेकापूर येथे हे अनुभवायला मिळाले. तेथे ऑगस्ट २०१८ पासून मूल्यवर्धन सत्रे आयोजित केली जातात. मुख्याध्यापकांसह या शाळेत एकूण ४ शिक्षक आणि ११२ मुले आहेत. जवळपास ४ हजार लोकसंख्या असलेल्या शेकापूर गावात कामगार आणि लहान शेतकरी यांची कुटुंबे राहतात.

## अशी निर्माण झाली पुस्तकांविषयी आवड :

मूल्यवर्धन शिक्षक श्री. व्ही. बी. नखले म्हणाले की, शाळेत दीड वर्षांपासून मूल्यवर्धन उपक्रम सतत राबविले जातात. त्यांचा असा परिणाम होत आहे की बहुतेक मुलांना पुस्तके आवडू लागली आहेत.

या आकर्षणामागील त्यांचा अनुभव असा आहे की, मूल्यवर्धन पुस्तकांमुळे मुलांमध्ये इतर पुस्तकांविषयी आवड निर्माण झाली. मूल्यवर्धन पुस्तकातील कोणतीही कविता किंवा गाणे उपक्रमाच्या माध्यमातून वाचतात. यामुळे मूल्यवर्धन पुस्तकांविषयी त्यांचे आकर्षण वाढते. त्यानंतर ते इतर पुस्तकांमध्ये तशीच कविता किंवा कथा शोधण्याचा प्रयत्न करतात.

व्ही. बी. नखले स्पष्ट करतात उदाहरणार्थ, मूल्यवर्धन पुस्तकात समानता किंवा मैत्रीविषयी एखादी कथा मुलांना आवडली, तर मुले या विषयांशी संबंधित कथा असलेली इतर पुस्तके वाचायला आवडीने घेतात. चांगली गोष्ट म्हणजे अशी पुस्तके मुले एकट्याने वाचण्याऐवजी समूहामध्ये वाचतात. या सवयी त्यांच्यात मूल्यवर्धन उपक्रमांतून आल्या आहेत. मुलांच्या सामूहिक वाचनामुळे मनात ही कल्पना आली की, सर्व मुलांनी एकत्र येऊन एक वाचनालय तयार करावे. या शाळेतील मुलांनी गेल्या एका वर्षात त्यांच्या वाचनालयात ४०० पेक्षा अधिक पुस्तके संग्रहित केली आहेत. यातील बहुतेक पुस्तके मराठी भाषेतील आहेत. कविता, कथा, चित्र आणि उत्तम व्यक्तिमत्त्व या व्यतिरिक्त विज्ञान आणि इतिहासाशी संबंधित काही पुस्तके आहेत. वाचनालयातील पुस्तकांची संख्या वाढल्यामुळे त्यांच्याकडे वाचण्यासाठी पूर्वीपेक्षा अधिक पुस्तके उपलब्ध आहेत आणि म्हणूनच ते पूर्वीपेक्षा अधिक आवडीने त्यांचा लाभ घेत आहेत.

## मुले पुस्तके कशी गोळा करतात :

याबद्दल व्ही. बी. नखले सांगतात की, एखाद्या मुलाचा वाढदिवस शाळेत साजरा केला गेला, तर शाळेतली इतर मुले भेटवस्तू म्हणून पुस्तक देतात. त्याचप्रमाणे अनेक पुस्तके शिक्षकांनी उपलब्ध करून दिली. त्याचबरोबर, काही पुस्तके मुलांच्या कुटुंबांकडून तर काही गावातील व्यक्तींकडून देखील प्राप्त झाली आहेत.

पुस्तक गहाळ होऊ नये म्हणून मुलांनी प्रत्येक पुस्तकाच्या मुख्य मुखपृष्ठावर त्याचा नंबर लिहिला आहे आणि वाचनालयासाठी तयार केलेल्या फाईलमधील क्रमांकासह त्याचे वर्णन दिले आहे. ही जबाबदारी इयत्ता चौथीची मुले सांभाळतात.

## वाचनासाठी निश्चित वेळ :

वाचनालयासाठी मुलांनी हा नियम बनविला आहे की कोणीही विद्यार्थी पुस्तक वाचण्यासाठी घरी घेऊन जाणार नाही. याचे कारण असे आहे की, वाचनालयात बहुतेक पुस्तकांची एकच प्रत असते. अशा परिस्थितीत जर इतर मुलांना किंवा शिक्षकांना पुस्तक वाचायचे असेल तर ते त्यांच्यासाठी सहज उपलब्ध असावे.



**मूल्यवर्धनमधून प्रेरणा घेऊन मुले वाचनालयात पुस्तकांच्या वाचनाबरोबर अभ्यास आणि खेळ देखील गटाने करतात.**

तसेच जर एखाद्या मुलाला वाचनालयात एखादे पुस्तक वाचायचे असेल, तर त्यासाठी वेळ निश्चित केलेला आहे. प्रत्येक वर्गासाठी वेगवेगळा वेळ निश्चित केला आहे. उदाहरणार्थ, दुसरी इयत्तेतील मुले दुपारी २ ते ३ च्या दरम्यान वाचनालयाचा लाभ घेऊ शकतात. तथापि, एखाद्या मुलास विशेष परिस्थितीत एखादे पुस्तक वाचायचे असेल तर त्याला आपल्या वर्गशिक्षकांची परवानगी घ्यावी लागते.

## निम्म्याहून अधिक मुले याचा फायदा घेत आहेत :

व्ही. बी. नखले यांच्या निरीक्षणानुसार, दरमहा सरासरी ६० ते ७० मुले वाचनालयाचा लाभ घेत आहेत. वाचन कौशल्यात त्यांची प्रगती होत आहे. ती पूर्वीपेक्षा जास्त वेगाने वाचू शकतात आणि त्यांचे उच्चारही अधिक शुद्ध झाले आहेत.

नखले गुरुजींनी शालेय मुलांसाठी वाचनालय केंद्रस्थानी ठेवून इतर अनेक उपक्रम तयार केले आहेत. उदाहरणार्थ, ते परिपाठामध्ये दररोज २० मिनिटांचे सत्र आयोजित करतात, ज्यामध्ये मुले मूल्यवर्धन किंवा वाचनालयातून वाचलेल्या एखाद्या कथेबद्दल त्यांचे अनुभव सांगतात. यामुळे वाचनालयातील पुस्तकांविषयीची आवड इतर मुलांमध्येही वाढत आहे.

अनेक वेळा मुले विविध विषयांवर आपले अनुभव जोडीने किंवा गटाने सादर करतात. विद्यार्थी याविषयी मूल्यवर्धनमध्ये आयोजित केलेल्या उपक्रमांत शिकले आहेत. सामान्यत: ते स्वच्छता, प्रामाणिकपणा, वृक्षारोपण, शिस्त यांसारख्या विषयांवर आपले अनुभव सांगतात.

नखले गुरुजी म्हणतात की, मूल्यवर्धनमुळे मुलांनी जे काही मिळविले आहे, त्यामुळे मुले पहिल्यापेक्षा अधिक शिस्तबद्ध झाली आहेत.

# २७. मुलांनी बनविली वृत्तपत्रांच्या कात्रणातून संदर्भ पुस्तके

**वृत्तपत्रांची कात्रणे जमा करून एका शाळेतील मुलांनी संदर्भ पुस्तके बनविली. त्यांच्या मनात हा विचार मूल्यवर्धन तासिकांमुळे आला.**

मूल्यवर्धन उपक्रमाचा आधार घेऊन एका शाळेतील मुलांनी दररोजच्या वर्तमानपत्रांतील कात्रणे कापून वेगवेगळ्या विषयांवर सुमारे शंभर पानांची पाच संदर्भ पुस्तके तयार केली आहेत.

शाळेतील शिक्षिका विद्या वालोकर सांगतात, ''मूल्यवर्धनमधील काही उपक्रम हे मुलांना पर्यावरणाबद्दल संवेदनशील बनविण्याशी संबंधित आहेत. काही उपक्रम टाकाऊ गोष्टींचा पुनर्वापर करण्याशी संबंधित आहेत. काही उपक्रम वस्तूंची बचत आणि त्यांच्या योग्य वापरास प्रोत्साहन देतात. त्याचप्रमाणे मूल्यवर्धन पुस्तिकेत रद्दी कागदाच्या वापरावर आधारित एक उपक्रम आहे. उपक्रमात सांगितल्याप्रमाणे, आमच्या शाळेतील मुलांनी दररोजची वर्तमानपत्रे वापरून पुस्तके तयार केली आहेत. एक वर्षात त्यांनी हे मोठे काम पूर्ण केले आहे. यासाठी त्यांनी पाच वेगवेगळ्या गटांमध्ये काम केले आणि अशाप्रकारे त्यांनी वर्तमानपत्र रद्दी म्हणून टाकून न देता कात्रणांचा योग्य वापर करून संदर्भ पुस्तके बनविली आणि शालेय ग्रंथालय समृद्ध केले.''

ही शाळा आहे वर्धा जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा वेळा. वर्धा जिल्ह्यापासून ३५ कि.मी. अंतरावर असलेल्या हिंगणघाट तालुक्यातील. या शाळेत मूल्यवर्धनची सत्रे ऑगस्ट २०१७ पासून घेण्यात येत आहेत. इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंत मुख्याध्यापकांसह एकूण ४ शिक्षक आणि ३५ मुले आहेत. गावात प्रामुख्याने लहान व मध्यम शेतकरी कुटुंबे राहतात.

## हे एक यश का आहे?

मूल्यवर्धन शिक्षिका विद्या वालोकर या शाळेतील मुलांचे एक मोठे यश मानतात. त्यांचे म्हणणे आहे की, मुलांनी मूल्यवर्धन सत्रातून प्रेरणा घेऊन भूगोल, विज्ञान, मराठी, इंग्रजी आणि सामान्यज्ञान या विषयांवर पुस्तके तयार केली आहेत. या शिवाय काही कात्रणांवरून महात्मा गांधींचे जीवन चरित्रही तयार केले आहे. याचा एक फायदा असा झाला की, मूल्यवर्धन किंवा इतर कोणत्याही विषयाच्या सत्रामध्ये मुलांना अभ्यासाच्या वेळी संदर्भ पुस्तकांची गरज लागली तर त्यांना त्यांची माहिती वर्गातच मिळते.

याशिवाय अशा कामामुळे मुलांमध्ये संकलनाची वृत्ती वाढत आहे. मुलांमध्ये विविध विषयांतील ज्ञान मिळविण्याविषयी कुतूहल निर्माण झाले आहे. निरीक्षण आणि स्वयंअध्ययन या मुद्द्यांविषयी मुले जागरूक होत आहेत. तसेच या संदर्भ सामग्रीचा वापर गावातील लोकही करीत आहेत.



**वृत्तपत्राच्या माध्यमातून मूल्यवर्धन तासिकेचे आयोजन करताना शिक्षिका विद्या वालोकर.**

## याबद्दल विचार का केला?

विद्या वालोकर सांगतात की, शाळेतील मुले पुष्कळदा कागदाचा योग्य वापर न करता नेहमीप्रमाणे फाडून फेकत असत आणि त्यांचेही तिकडे दुर्लक्ष असे. तथापि, मूल्यवर्धन सत्रात

जेव्हा त्यांनी रद्दी कागदाच्या योग्य वापराविषयी संबंधित उपक्रम आयोजित केला तेव्हा त्यांना वाटले की, या संदर्भात मुलांसमवेत प्रकल्प करता येईल.

त्या म्हणाल्या, ''सप्टेंबर २०१८ मध्ये, मूल्यवर्धन सत्रादरम्यान, मी मुलांना कागद कसा तयार होतो ते सांगितले. यासाठी, मी माझ्या मोबाईलवर यु-ट्यूबवरील काही व्हिडिओ देखील मुलांना दाखविले. त्यानंतर १५-२० दिवस मुले कागदांचा वापर कसा करतात हे मी पाहिले. माझ्या लक्षात आले की अनावश्यक कागद फाडू नये हे मुलांना कळले आहे.''

यानंतर विद्या वालोकर मुलांशी बोलल्या आणि कागदाचा चुकीचा वापर कसा थांबविता येईल हे जाणून घेतले. मुले म्हणाली की, रद्दी कागदापासून काही चांगल्या गोष्टी बनविता येतात. सुरुवातीला एका मुलाने जुन्या वर्तमानपत्रांचा मुखवटा तयार केला. त्याचप्रमाणे एका मुलाने कागदाची टोपी बनविली. दरम्यान, काही मुलांनी सांगितले की ते वृत्तपत्रांतून प्रकाशित होणाऱ्या माहितीविषयक लेखांची कात्रणे कापून चिकटवही तयार करू शकतात.



अतिरिक्त वेळेत वृत्तपत्राच्या कात्रणांतून मुले अशी संदर्भ पुस्तके तयार करतात.

## असा साकार झाला प्रकल्प :

विद्या वालोकर म्हणतात, ''मला ही कल्पना आवडली कारण इतर मूल्यवर्धन उपक्रमांशी ती जोडली जाऊ शकते आणि इतर अनेक सत्रांत माहितीचे आदानप्रदान करण्यासाठी या कात्रणातील लेखांचा उपयोग केला जाऊ शकतो.''

अशाप्रकारे, मूल्यवर्धन शिक्षकाने आणि मुलांनी एकत्रितपणे संदर्भ पुस्तकांची योजना विकसित केली. यानंतर मुले नियमितपणे आणि काळजीपूर्वक शाळेत येणारी वर्तमानपत्रे वाचू लागली. याचा परिणाम असा झाला की, मुलांकडून रोज निरनिराळ्या बातम्या सहजगत्या वाचल्या जाऊ लागल्यामुळे त्यांचे सामान्यज्ञान वाढले.

## सुरुवात कठीण होती :

सुरुवातीला वृत्तपत्रात कोणती माहिती कोणत्या विषयाखाली येईल हे मुलांना समजू शकले नाही. मग ते शिक्षकाचे मार्गदर्शन घेत असत. विद्या वालोकर सांगतात, ''एखाद्या प्रकारची शंका असल्यास आम्ही एकत्रित चर्चा करायचो. यामुळे मुलांच्या विचारात स्पष्टता येऊ लागली. आज मुले आणि शिक्षक प्रकल्पात तयार झालेली संदर्भ पुस्तके वापरतात आणि विशेष म्हणजे गावातील शेतकरीही आमच्या शाळेतील ग्रंथालयात शेतीशी संबंधित काही माहिती मिळवितात.''

●●●

# २८. मूल्यवर्धनने मुले बनतात शिस्तबद्ध

**जी मुले आपापसात भांडणे करून, एकमेकांच्या तक्रारी करून शिक्षकांना त्रास देत होती, त्यांनीच शाळेत शिस्तीचे उदाहरण घालून दिले आहे.**

''मूल्यवर्धनमुळे आमच्या शाळेतील बहुतेक मुले स्वयंशिस्त पाळताना दिसत आहेत. आता दैनिक परिपाठादरम्यान, मुले स्वतःच रांगेत उभी असतात. जर वर्गात किंवा वर्गाच्या बाहेर कचरा दिसला, तर तो कचरापेटीत टाकतात. मुलांच्या तक्रारीही कमी येत आहेत.'' असे म्हणणे आहे ठाणे जिल्हा परिषद मराठी प्राथमिक माळीपाडा शाळेचे शिक्षक यशवंत रामचंद्र माळी यांचे.

जिल्हा मुख्यालय ठाण्यापासून सुमारे ६५ कि.मी. अंतरावर असलेल्या मुरबाड तालुक्यातील माळीपाडा गावातील शाळेत शाळेच्या मुख्याध्यापकांसह पाच शिक्षक व ११५ मुले आहेत. सुमारे एक हजार लोकसंख्या असलेल्या माळीपाडा गावात बहुतेक धान उत्पादक शेतकरी कुटुंबे आहेत. या शाळेत जून २०१६ पासून नियमितपणे मूल्यवर्धन सत्रांचे आयोजन केले जाते.

### मूल्यवर्धनमुळे मुले झाली प्रभावित :

यशवंत रामचंद्र माळी यांच्या मते, गेल्या साडे तीन वर्षांत 'राजूचे वेळापत्रक' सारख्या मूल्यवर्धन उपक्रमांचा मुलांच्या मनावर इतका प्रभाव पडला आहे की स्वयंशिस्तीच्या माध्यमातून ते इतरांप्रति व्यवस्थापन कौशल्ये आणि स्वच्छता संदर्भात संवेदनशील बनत आहेत.

यशवंत रामचंद्र माळी यांनी मूल्यवर्धनच्या उपक्रमांनी प्रेरित होऊन एक खास उपक्रमही सुरू केला आहे. त्या अंतर्गत ते महात्मा गांधी यांच्यासारख्या थोर व्यक्तींच्या कथा सांगतात. वेळेच्या महत्त्वावर विशेष भर देतात. बेजबाबदारपणे वागल्यास कोणाही माणसाला काय त्रास सहन करावा लागतो हे मुलांना समजते.

### हळूहळू झाले परिवर्तन :

यशवंत रामचंद्र माळी म्हणतात, ''मूल्यवर्धन उपक्रम राबविण्यापूर्वी फारच थोड्या मुलांना स्वयंशिस्त होती. तथापि, वर्गात शिकविणे कठीण होईल इतकीही ती बेजबाबदार नव्हती. परंतु बऱ्यादा अनेक मुले नियमित दिवस शाळेत येत नसत म्हणून उपस्थितीचे प्रमाण सरासरीपेक्षा कमी दिसत असे.''

त्यांच्या मते, मूल्यवर्धन तासिका घेतल्या गेल्यामुळे मुलांमध्ये शाळेची आवड निर्माण झाली कारण यामध्ये कोणत्याही प्रकारच्या प्रश्नाचे निराकरण करण्यासाठी त्यांच्यावर दबाव आणला जात नाही. त्यांच्या एक गोष्ट लक्षात आली आहे की, अभ्यासक्रमातील विविध विषयांचा भाग शिकताना मुले घाबरतात आणि मूल्यवर्धन उपक्रमाच्या सत्रात मात्र मुक्तपणे आणि दडपण न बाळगता मनापासून भाग घेतात.

यशवंत रामचंद्र माळी स्पष्टीकरण देतात, ''या अनुभवातूनच मला मुलांना शिस्त लावण्याची प्रेरणा मिळाली. मुलांनी वर्गात शांत राहणे ही शिस्त नाही तर एक प्रकारची भीती आहे. मुलांना असे वाटते की, वर्गात शिक्षकांनी प्रश्न विचारले आणि त्यांना जर उत्तर आले नाही तर शिक्षक त्यांना रागावतील किंवा मुले हसतील. मूल्यवर्धनच्या अनेक उपक्रमांमुळे मुलांच्या मनातील न्यूनगंड दूर होण्यास मदत झाली.''

मूल्यवर्धनच्या अनेक उपक्रमांमध्ये वेळेशी संबंधित उपक्रमांनी मुलांना स्वयंशिस्त लावण्याची महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यापैकी 'राजूचे वेळापत्रक' उपक्रमाने मुलांचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्यास आणि त्यांच्या सवयी बदलण्यास मदत केली.

माळी गुरुजींनी आपला अनुभव सांगितला. ते म्हणाले, ''या उपक्रमात मला असे आढळले की बहुतेक मुले शिक्षणापेक्षा खेळाला जास्त महत्त्व देत आहेत. तथापि, मुलांनी खेळणे ही वाईट गोष्ट नाही. परंतु अभ्यासासाठी वेळ न दिल्यामुळे आणि वर्गातील बरीच मुले शाळेने दिलेला गृहपाठ पूर्ण करीत नसल्यामुळे वर्गातील अनेक मुलांमध्ये आत्मविश्वासाचा अभाव जाणवत होता. कधी कधी भीतीपोटी ती शिक्षकांजवळ येण्यास ती घाबरत असत.''

यानंतर 'राजूचे वेळापत्रक' या मूल्यवर्धन उपक्रमाच्या आधारे मुलांनी स्वतःचे वेळापत्रक तयार केले. शिक्षकांकडून सतत मूल्यांकन आणि निरीक्षण केल्यामुळे बहुतेक मुलांना जेव्हा त्याचे पालन करण्यास सुरुवात केली तेव्हा त्यांनी अभ्यासासाठी



**वर्गात मुले शिक्षण घेताना शिस्तीचे पालन करतात.**

देखील वेळ काढायला सुरुवात केली. अशा प्रकारे, शिक्षकांनी निरनिराळ्या विषयातील विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देता आल्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला. या आत्मविश्वासाने त्यांना शिस्तीच्या मार्गावर नेले.

तथापि माळी गुरुजी यांना असे वाटते की, अजूनही काही मुलांमध्ये शिस्तीबाबत पुरेसे गांभीर्य नाही आणि ते स्वतःचे वेळापत्रक नीट पाळत नाहीत. त्यामुळे सर्व मुलांना शिस्तबद्ध करण्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू आहेत.

दुसरीकडे, ''मूल्यवर्धन शिक्षक म्हणून, आपल्या मुलांना अभ्यासाव्यतिरिक्त इतर उपक्रमांत आपल्या शाळेतील मुलांची शिस्त पाहून आनंद होत आहे,'' असेही ते म्हणतात. ''काही कार्यक्रमांमध्ये जेव्हा मुलांकडून मुलींना पुढाकार घेण्याची संधी दिली जाते आणि जेव्हा मी मुलींच्या मार्गदर्शनाखाली मुलांना काम करताना पाहतो तेव्हा मला खूप आनंद होतो.''

शेवटी ते आणखी एक अनुभव सांगतात की, जेव्हा जेव्हा शिक्षक काही कारणास्तव वर्गात उपस्थित राहू शकत नाहीत, त्यावेळी वर्गातील एक मुलगा किंवा मुलगी यांच्या देखरेखीखाली सर्व मुले शिस्तीत आपापला अभ्यास करतात.

## २९. परिपाठ झाले सामान्यज्ञानाचे भांडार

**मूल्यवर्धनमध्ये प्रश्न विचारण्याच्या उपक्रमातून मुलांना अशाप्रकारे प्रेरित केले आहे की, ते शाळेतील परिपाठामध्ये प्रश्नोत्तरे सादर करण्याचा उपक्रम आयोजित करतात.**

वर्धा जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा बोरखेडी (कला) या शाळेत मूल्यवर्धन अंतर्गत स्व-जाणीव या संदर्भात आयोजित केल्या जाणाऱ्या मूल्यवर्धन उपक्रमांमधून प्रेरित होऊन मुलांनी परिपाठात प्रश्नोत्तरे सादर करण्याचा एक नवीन उपक्रम तयार केला आहे.

या शाळेचे मूल्यवर्धन शिक्षक प्रफुल्ल भोगे स्पष्ट करतात की, या १५ मिनिटांच्या सत्रात मुले गाव, तालुका, जिल्हा, राज्य, देश ते आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत एकमेकांना प्रश्न विचारतात. दरम्यान, प्रश्न विचारणारी मुले स्टेजवर उभे राहून प्रश्न विचारतात. इतर सर्व मुले उत्तर देण्यासाठी हात वर करतात. त्यानंतर शिक्षक ज्या विद्यार्थ्याला उत्तर विचारतात तो उत्तर देतो. उत्तर चुकीचे असेल तर इतर मुलांना संधी देण्यात येते जर कोणत्याही मुलाला बरोबर उत्तर देता आले नाही तर प्रश्न विचारणारा विद्यार्थी उत्तर देतो.

यामुळे मुलांचे सामान्यज्ञान वाढत आहे. त्यांना स्थानिक माहितीही मिळत आहे. उदाहरणार्थ, त्यांना गावचे सरपंच कोण आहेत किंवा ग्रामसेवकाचे नाव काय आहे? त्याचप्रमाणे त्यांच्या तालुक्याचे तहसीलदार आणि जिल्ह्याचे जिल्हाधिकारी कोण आहेत, ते कोणकोणती कामे करतात या विषयीही त्यांना माहिती मिळू लागली आहे.

वर्धा शहरापासून ३० कि.मी. अंतरावर सेलू तालुक्यामध्ये असणाऱ्या या शाळेत दोन शिक्षक आणि २१ मुले आहेत. जुलै २०१८ पासून येथे मूल्यवर्धन सत्रे घेतली जात आहेत. त्याचबरोबर बोरखेडी (कला) या साधारणतः साडेपाचशे लोकसंख्या असलेल्या गावात मजूर आणि लहान शेतकरी कुटुंबे आहेत.

**यासाठी सुरू केली प्रश्नोत्तरे :**

प्रफुल्ल भोगे म्हणतात की जुलै २०१९ मध्ये मूल्यवर्धनच्या एका उपक्रमादरम्यान मुलांना त्यांच्या शेजाऱ्यांविषयी माहिती द्यायची होती. यावेळी त्यांनी मुलांना आपल्या घराचा पूर्ण पत्ता देण्यास सांगितले. तथापि, केवळ दोन मुलांनी त्यांच्या प्रश्नाचे उत्तर दिले. इयत्ता चौथीची मुलेही आपल्या घराचा पूर्ण पत्ता देऊ शकत नाहीत हे पाहून त्यांना वाईट वाटले.

यानंतर, प्रफुल्ल भोगे यांनी आठवड्यातून दोन पेक्षा अधिक वेळा मूल्यवर्धन सत्रे घ्यायची असे ठरविले. ते स्पष्ट करतात, ''मूल्यवर्धन सत्राच्या वेळी मी स्वत:ची ओळख आणि स्वत:च्या क्षमता यांच्याशी संबंधित उपक्रमांवर भर दिला. मला असेही दिसून आले की, अशा उपक्रमांमुळे मुलांचे सामान्यज्ञान वाढत आहे. परंतु मला असे वाटले की, ठराविक वर्गातीलच नाही तर शाळेतील सर्वच मुलांचे सामान्यज्ञान वाढविण्यासाठी दररोज असा एक उपक्रम आवश्यक आहे. म्हणून मी माझे सहकारी शिक्षक आणि मुलांसमवेत एकत्रितपणे प्रश्नोत्तर उपक्रमासाठी एक नियोजन केले.''

यातील प्रश्नोत्तरे तयार करण्यासाठी मुले शिक्षकांची मदत घेतात. शिक्षकांच्या मार्गदर्शनाने कोणते प्रश्न विचारणे योग्य आहे ते ठरवितात कारण एखादा प्रश्न जर प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या मुलांसाठी वरच्या पातळीवरचा असेल तर शिक्षक असे प्रश्न टाळायला सांगतात. विचारले जाणारे प्रश्न एक दिवस आधी तयार केले जातात.

**मुलांसाठी नेमका काय फायदा होतो? :**

प्रफुल्ल भोग म्हणतात की, दररोज प्रश्नोत्तरे आयोजित केल्यामुळे अधिकाधिक मुले एकमेकांशी चांगल्या प्रकारे संवाद साधत आहेत. त्यांची उत्सुकता वाढत आहे. आता त्यांना पूर्वीपेक्षा अधिक व्यावहारिक ज्ञान मिळत आहे.



**मूल्यवर्धन सत्रामध्ये मोबाईलच्या माध्यमातून मुलांच्या एका गटाबरोबर माहितीचे सादरीकरण करताना शिक्षक**

त्याच वेळी, ज्या मुलांना आपल्या घरचा पत्ता योग्य रीतीने सांगता येत नव्हता, ते आता पूर्ण पत्ता सांगतात. यात पहिली आणि दुसरीतील लहान मुलांचाही समावेश आहे.

प्रफुल्ल भोग म्हणतात, ''प्रश्नोत्तरे सत्रात प्रश्न विचारण्यासाठी मुलांना प्रश्नोत्तरे शुद्ध आणि स्पष्ट लिहावी लागतात. यामुळे त्यांचे लिखाण सुधारत आहे. तसेच प्रश्न विचारण्याचे आणि उत्तरे देण्याचे कौशल्य मुलांमध्ये विकसित होत आहे.''

**मूल्यवर्धनमधून हे शिकलो :**

येथे महत्त्वाची गोष्ट अशी आहे की प्रश्न तयार करताना आणि लिहिताना मुले मूल्यवर्धनमधील शैक्षणिक पद्धतींचा अवलंब करीत आहेत. ते जोडी किंवा गट करून आणि एकमेकांशी विचारविनिमय करून आपले काम पूर्ण करीत आहेत.

प्रफुल्ल भोग म्हणतात, ''कधी कधी काही मुले प्रश्नोत्तराच्या वेळी व्यत्यय आणतात. त्यावेळी त्यांना गटात जबाबदारी दिली जाते. कधी कधी त्यांना प्रश्न सुचवायला सांगितले जाते.''

दुसरीकडे, प्रफुल्ल भोग मुलांचे सामान्यज्ञान वाढविण्यासाठी आणखी एक पाऊल उचलण्याचा विचार करीत आहेत. ते म्हणतात, ''लवकरच आम्ही शाळेच्या आवारात सामान्यज्ञानाशी संबंधित मासिक कार्यक्रमाचे आयोजन करण्याचा विचार करीत आहोत. गावातील लोकही अशा कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊ शकतील.''

## ३०. मूल्यवर्धनने दिली व्यायामाला प्रेरणा

**मूल्यवर्धनमधील सहयोगी खेळांतून शिक्षक आणि मुलांमधील संबंध दृढ होत आहेत. मुलांच्या शारीरिक आणि मानसिक विकासाला उत्तेजन मिळत आहे.**

अशी एक शाळा आहे, जिथे एका शाळेचे मुख्याध्यापक मूल्यवर्धनांतर्गत आयोजित सहयोगी खेळांच्या माध्यमातून मुलांना नियमित शारीरिक व्यायामाची संधी देत आहेत. याचा परिणाम म्हणून बहुतेक मुलांचा शारीरिक विकास होत आहे. तसेच एकतेचे महत्त्व सहयोगी खेळांच्या माध्यमातून समजले आहे.

ही आहे चंद्रपूर जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा वायगाव. या शाळेचे मुख्याध्यापक राजू कुशमवार हे आहेत. ते म्हणतात, ''मूल्यवर्धन सहयोगी खेळांमुळे प्रेरित होऊन आम्ही यु–ट्यूबवरील बरेच नवीन सहयोगी खेळ शोधले. आम्ही ते खेळ पी.टी.च्या तासांना आयोजित करतो. कधी कधी वर्गातील इतर विषयांच्या तासामध्ये आयोजित करतो. त्यामुळे कंटाळलेली मुले पुन्हा ताजीतवानी होतात. अशा प्रकारे अध्यापनादरम्यान अधूनमधून सहयोगी खेळासाठी ब्रेक दिले जातात, जे साधारणतः ५ ते ७ मिनिटांचे असतात.''

चंद्रपूरपासून ८५ कि.मी. अंतरावर असलेल्या वायगाव येथील या शाळेमध्ये मुख्याध्यापकांसह ५ शिक्षक आणि १०७ मुले प्राथमिक वर्गात आहेत. जुलै २०१९ पासून येथे नियमित मूल्यवर्धन सत्रे घेतली जात आहेत. बहुतेक गावकरी धान्य आणि हरभरा उत्पादक शेतकरी व मजूर आहेत. वायगावची लोकसंख्या सुमारे एक हजार आहे.

### हा अभ्यास ऑक्टोबर २०१९ पासून सुरू आहे :

राजू कुशमवार माहिती देतात, ''ऑक्टोबर २०१९ पासून आम्ही मूल्यवर्धन सहयोगी खेळांच्या माध्यमांतून मुलांच्या शारीरिक शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. आमचा प्रयत्न असा आहे की, मुलांना दररोज एकदा तरी सहयोगी खेळात सहभागी करून घ्यावे. शिक्षक देखील यात सामील होतात आणि त्यांनाही संपूर्ण प्रक्रिया आनंदाने अनुभवण्याची संधी मिळते. विद्यार्थी–शिक्षक नाते आणखीनच घट्ट होते.''

सहयोगी खेळांच्या माध्यमातून मुलांची एकाग्रता वाढत आहे, असा राजू कुशमवार यांचा अनुभव आहे. ते एकमेकांना सक्रिय पाठिंबा देत आहेत, तसेच त्यांच्यात सांघिक रीतीने काम करण्याची भावना वाढत आहे.

### श्रमाच्या महत्त्वातून ही कल्पना पुढे आली :

राजू कुशमवार यांचे म्हणणे आहे की, अनेक मूल्यवर्धन उपक्रमांमध्ये श्रमाचे महत्त्व यावर भर देण्यात आला आहे. या उपक्रमांचे आयोजन करीत असताना, मुले जर शारीरिकदृष्ट्या मजबूत असतील तरच श्रमाची कामे करू शकतील हे लक्षात आले. श्रमाचे महत्त्व केवळ वाचून सोडून द्यायची गोष्ट नसून ती आपल्या जीवनात प्रत्यक्षात आणण्याची गरज आहे. मूल्यवर्धनमधील सहयोगी खेळांच्या वेळी त्यांना असे वाटले की, अशा खेळांना श्रमाविषयी महत्वाची जोड दिली तर श्रमप्रतिष्ठा रुजविण्याचा आपला हेतू पूर्ण होऊ शकतो.

सहयोगी खेळांच्या नियमित आयोजनाचे इतरही काही फायदे आहेत. ते मूल्यवर्धनच्या मुख्य उद्दिष्टांशी संबंधित आहेत. राजू कुशमवार अधिक विस्ताराने माहिती देतात. सहयोगी खेळात मुले कटुता निर्माण करणारी नकारात्मक स्पर्धा टाळतात. एकमेकांना मदत करण्याची भावना त्यांच्यात निर्माण/बळकट होते. त्यातून मैत्रीसारखी मूल्ये विकसित होतात.

### दररोज एक सहयोगी खेळ :

दररोज येथे एका तरी सहयोगी खेळाचे आयोजन केले जाते. मूल्यवर्धन सत्रांव्यतिरिक्त परिपाठ किंवा शारीरिक शिक्षणाच्या तासिकांच्या वेळी हे खेळ आयोजित केले जातात. राजू कुशमवार स्पष्टीकरण देतात, ''बऱ्याच वेळा सहयोगी

खेळ एखाद्या विषयाच्या अभ्यासाच्या तासिका वापरूनही खेळले जातात. सहयोगी खेळाला जास्तीत जास्त दहा मिनिटे लागतात म्हणून ते सहजतेने आणि जास्त वेळ न घालविता खेळता येतात. बहुतेक सहयोगी खेळ मुलांना माहीत असतात आणि ते फक्त आनंदाने या खेळांचा सराव करतात. प्रत्येक वर्गात मुलांची संख्या जास्त असल्याने सहयोगी खेळ साधारणपणे मैदानावर आयोजित केले जातात.''



**सहयोगी खेळाच्या माध्यमातून एकमेकांना मदत करताना मुले**

## इतर बरेच फायदे आहेत :

राजू कुशमवार हे सहयोगी खेळाच्या इतर अनेक फायद्यांचा देखील विचार करतात. उदाहरणार्थ, मुलांचा शारीरिक विकास जसा जसा होत जाईल, तसे तसे ते शाळा आणि घरातील सहयोगी कार्यात ते मदत करतील.

राजू कुशमवार त्यांचे अनुभव सांगताना म्हणतात की, गेल्या एका वर्षात मुलांच्या आरोग्यात सुधारणा झाली आहे. खेळाबरोबरच त्यांची वाचनाची आवडही वाढत आहे. केवळ अभ्यासात हरवलेली मुले खेळात सक्रिय होत आहेत. घरात किंवा वर्गात शांत होती. ती मुले आता मैदानावर दिसू लागली आहेत. बरीच मुले वर्गात आधी झोपत असत परंतु आता अभ्यासाबरोबर सहयोगी खेळातून त्यांचा उत्साह कायम आहे.

## इतर शिक्षकही पुढे आले :

मुख्याध्यापक राजू कुशमवार यांच्याकडून प्रेरणा घेऊन शाळेतील अन्य शिक्षकही मुलांसह अशा उपक्रमांमध्ये भाग घेऊ लागले आहेत.

नरेंद्र वाकडे, हरिश्चंद्र ननावरे आणि विठ्ठल चंदनखेडे हे शिक्षक आता नेहमी सहभागी होत आहेत. त्याचा फायदा असा झाला आहे की, जर एखादा शिक्षक कोणत्याही कारणास्तव वर्गात अनुपस्थित असेल तर या शिक्षकांपैकी एखादे शिक्षक मुलांसाठी सहयोगी खेळ आयोजित करतात.

शेवटी राजू कुशमवार यांना 'कोणते खेळ घेता?' असे विचारल्यावर त्यांनी काही सहयोगी खेळांची नावे सांगितली. 'जोड्यांमध्ये उडी मारणे, गटांमध्ये कथा सांगणे, वरील हवेत, जीवांमध्ये? आवाज, एकत्र उभे राहणे, संतुलित करण्याची कला, बाल्कनीच्या अंतर्गत लपवा आणि शोधा यांसारखे खेळ, विशेषत: लहान मुलांसाठी शारीरिक आणि मानसिक व्यायाम पूर्ण करण्याच्या दृष्टीने ते महत्त्वाचे आहेत.

# ३१. लाजाळू मुलगी नृत्यात मात्र पहिली

**मूल्यवर्धन तासिकांमध्ये अवलंबिल्या जाणाऱ्या शिक्षण पद्धतीने शाळेमध्ये सर्वांत लाजाळू म्हटल्या जाणाऱ्या मुलीचा स्वभाव व वागणे बदलले आहे.**

चंद्रपूर जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा घोडपेठमध्ये मूल्यवर्धन उपक्रमांच्या आयोजनामुळे बहुतेक मुलांच्या व्यक्तिमत्त्वात सकारात्मक बदल होत आहेत. रूपाली घोटकर या तिसरीच्या मुलीच्या व्यक्तिमत्त्वामध्ये झालेले बदल पाहून वर्गशिक्षिका देखील आश्चर्यचकित झाल्या आहेत.

शिक्षिका वैशाली वडेट्टीवार त्यांच्या आश्चर्यामागील कारण स्पष्ट करताना म्हणतात, ''खरं तर रूपाली वर्गातील सर्वांत अबोल मुलगी होती. ती माझ्याशी तर सोडाच, पण वर्गमित्रांशी बोलण्यासही संकोच करीत होती, पण आज रूपालीने नृत्य स्पर्धेत सहभाग घेऊन तालुका स्तरावर प्रथम क्रमांक मिळविला आहे. आता जिल्हा स्तरावर आपले आणि आपल्या शाळेचे नाव उज्ज्वल करण्यासाठी कठोर परिश्रम करीत आहे.''

चंद्रपूरपासून सुमारे २५ कि.मी. अंतरावर भद्रावती तालुक्यातील या शाळेत मुख्याध्यापकांसह ४ शिक्षक आणि ९१ मुले आहेत. जवळपास १,५०० लोकसंख्या असलेल्या घोडपेठ गावात छोटे शेतकरी आणि मजूर यांची कुटुंबे आहेत. डिसेंबर २०१९ पासून येथे मूल्यवर्धन उपक्रम आयोजित केले जात आहेत.

## मूल्यवर्धन अध्यापनाच्या पद्धतीमुळे शक्य :

वैशाली वडेट्टीवार म्हणतात, ''सुरुवातीला रूपालीला ना अभ्यासाची आवड होती, ना वर्ग किंवा शाळेच्या इतर कामांमध्ये रस होता. या मागील मुख्य कारण तिचा लाजाळू स्वभाव होता. शाळेतील इतर मुलांपेक्षा तिचा आत्मविश्वास कमी होता.''

वैशाली वडेट्टीवार म्हणाल्या, ''मूल्यवर्धन कार्यक्रमातील शिकण्याच्या पद्धतीमुळे आमच्या शाळेतील बऱ्याच मुलांचे व्यक्तिमत्त्व विकसित झाले आहे. रूपालीप्रमाणेच शाळेतील काही मुले वर्गात बोलण्यास घाबरत होती. या भीतीमुळे काही मुले आपले मित्र आणि शिक्षकांना आपल्या मनातील विचार सांगणे टाळत असत परंतु आता बहुतेक सर्वजण मित्र आणि शिक्षकांशी मोकळेपणाने बोलत आहेत. शाळेच्या बऱ्याच उपक्रमांमध्ये ते भाग घेत आहेत. यातील सर्वांत जास्त बदल रूपालीच्या व्यक्तिमत्त्वात पाहण्यास मिळत आहे. हे सर्व पाहून मी आश्चर्यचकित झाले, कारण फक्त तीन–चार महिन्यांतच ती नृत्याबरोबर वक्तृत्व कलेतही पुढे येत आहे.''

अशाप्रकारे रूपालीच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास सुरू झाला आणि हळूहळू ती उपक्रमादरम्यान बोलू लागली. मग लवकरच तिने तिच्या गटाचे प्रतिनिधित्व करण्यास सुरुवात केली आणि वर्गासमोर उभे राहून सादरीकरण करू लागली.

वैशाली वडेट्टीवार यांनी डिसेंबर २०१९ पासून मूल्यवर्धनच्या काही उपक्रमांचे गटांच्या माध्यमातून आयोजन करण्याचा प्रयत्न केला. मूल्यवर्धन उपक्रमांमध्ये जोडी, गट आणि सामुदायिक वर्तुळामध्ये चर्चा आयोजित करण्याचा सर्वांत मोठा फायदा म्हणजे यावेळी प्रत्येक मुलास बोलण्याची संधी मिळते.

वैशाली वडेट्टीवार म्हणतात, ''रूपालीलाही संधी पुन्हा पुन्हा मिळाली. मूल्यवर्धन उपक्रमांतून स्वत:ला व्यक्त करण्याचे प्रोत्साहन तिला देण्यात आले. त्याचे एक कारण असे आहे की, वर्गातील इतर मुले देखील तिचे बोलणे काळजीपूर्वक ऐकू लागली. त्यांनी अनेक गोष्टींवर स्वत:चे मत व्यक्त करण्यास सुरुवात केली.''

## मूल्यवर्धनमधून सादरीकरणाची भीड चेपली :

मूल्यवर्धन तासिकांचा परिणाम असा झाला की, रूपाली इतर शालेय कामांमध्येही भाग घेऊ लागली. उदाहरणार्थ, बऱ्याचदा ती परिपाठामध्ये शाळेतील सर्व मुलांसमोर येऊन महान नेत्यांचे विचार सर्वांसमोर मांडू लागली.

वैशाली वडेट्टीवार म्हणतात, ''अशाप्रकारच्या उपक्रमांमुळे ती मंचावर सादरीकरण करू लागली. तिचा संकोच कमी झाला. नृत्य सादरीकरण करण्यापूर्वी ती मूल्यवर्धन सत्रांमध्ये विशेषत: प्रश्नोत्तरे, कविता–पाठ आणि कथा–पाठ यांत सक्रिय सहभाग घेऊ लागली. त्यानंतर तिने सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये भाषण देण्यास सुरुवात केली.''

**अशाप्रकारे नृत्य पुढे आले :**

रूपाली नृत्यकलेत सर्वाधिक रस घेईल आणि शाळेचे नाव उज्ज्वल करेल असा विचार शाळेत कोणत्याही शिक्षकांनी किंवा मुलांनी केला नव्हता.

वैशाली वडेट्टीवार याबद्दल सांगतात की, रूपालीची नृत्याची आवड काही दिवसांनंतर जागृत झाली. मूल्यवर्धनच्या उपक्रमात तिने सहज म्हणून सहभाग घेतला. त्यानंतर शाळेच्या सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये नृत्य करण्याची तयारीही सुरू केली. यामुळे तिच्यातील नृत्यकौशल्य उजेडात आले. जेव्हा गावातील अनेक लोकांनी चांगल्या नृत्यामुळे रूपालीची स्तुती करण्यास सुरुवात केली तेव्हा तिला खूप छान वाटायला लागले. चांगले नृत्य करण्यासाठी शाळेतील शिक्षकांचा आणि मित्रांचा ती सल्ला घेऊ लागली.



इयत्ता तिसरीत शिकणारी एकल नृत्य स्पर्धेतील पुरस्कार विजेती रूपाली

तिच्या नृत्यकलेला दिशा देण्यास, त्यात मोलाची भर घालण्यास मूल्यवर्धनची कशी मदत झाली, याबद्दल वैशाली वडेट्टीवार म्हणतात, ''मूल्यवर्धन उपक्रमांनी रूपालीचा संकोच दूर केला. तिच्यातील आत्मविश्वास वाढविला. विशेषत: मूल्यवर्धनमधील 'मी आणि माझ्या क्षमता' या संबंधित उपक्रमांचा तिच्या व्यक्तिमत्त्व विकासावर कधी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे सकारात्मक प्रभाव पडला. अशा उपक्रमांमुळे तिची ओळख होण्यास मदत झाली. त्याचबरोबर विद्यार्थी उपक्रम पुस्तिकेत समाविष्ट असलेल्या सचिन तेंडुलकर सारख्या ख्यातनाम व्यक्तीचाही प्रभाव होता. सचिनने जशी खेळामध्ये महत्त्वाकांक्षा व्यक्त केली तशी रूपालीने नृत्यातून अभिव्यक्त होण्याचा प्रयत्न केला. सचिनकडून संघर्षाची प्रेरणा मिळाली हे रूपालीने मला अनेक वेळा सांगितले.''

याबाबत रूपाली आपले अनुभव सांगते, ''मूल्यवर्धनच्या पुस्तकात सचिन तेंडुलकरने खूप चांगल्या गोष्टी सांगितल्या आहेत. मला कळले की, आपल्याला जर काही चांगले काम करायचे असेल तर आपण इतरांची मदत घेऊ शकतो. सचिनला बऱ्याच लोकांनी मदत केली. त्यामुळे तो एक चांगला खेळाडू बनला. बरेच लोक मलाही मदत करीत आहेत म्हणून मी उत्तम नृत्य करू शकले.''

दुसरीकडे नियमित मूल्यवर्धन सत्रामुळे वैशाली वडेट्टीवार यांची अध्यापनाची दृष्टी बदलली आहे. त्या आता सर्व मुलांना जास्तीत जास्त स्वातंत्र्य देण्याचा प्रयत्न करीत आहेत.

शेवटी त्या म्हणतात, ''मूल्यवर्धनमध्ये सहयोगी खेळ मुलांना अभिव्यक्त होण्याचे चांगले माध्यम आहे. यातून मुले शारीरिक आणि मानसिकरित्या सुदृढ होतात. यासाठी मी आठवड्यातून एक किंवा दोन वेळा मुलांसाठी सहयोगी खेळ आयोजित करण्याचा प्रयत्न करते.''

# ३२. आमच्या शाळेत छोटे शिक्षक

**एका शाळेत असलेले एकमेव शिक्षक मूल्यवर्धन उपक्रमांच्या आधारे चार वेगवेगळ्या वर्गांतील सर्व मुलांना शिकविण्यात कुशल होत आहेत.**

जर एखाद्या प्राथमिक शाळेत इयत्ता पहिलीपासून चौथीपर्यंतच्या सर्व मुलांसाठी एकच शिक्षक असतील तर मुलांना चांगल्या प्रकारे शिकविणे त्या शिक्षकासाठी खूपच अडचणीचे असू शकते. मात्र अशा परिस्थितीत एका शिक्षकांनी या अडचणीचे रूपांतर संधीत आणि आपल्या शक्तीत केले आहे आणि हे शक्य झाले मूल्यवर्धन उपक्रमात अनुसरलेल्या शिक्षण पद्धतीमुळे.


सांगलीपासून जवळपास १०० किलोमीटर दूर असलेल्या आटपाडी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तुलाराम बुआचा येथील शाळेत जुलै २०१६ पासून मूल्यवर्धन तासिका आयोजित केल्या जातात. शाळेतील शिक्षक सुनील गायकवाड इयत्ता पहिली ते चौथी पर्यंतच्या २० मुलांना चांगल्या प्रकारे शिक्षण देण्यासाठी मूल्यवर्धनमध्ये अनुसरलेल्या शिक्षण पद्धतींचा अवलंब करीत आहेत.

सुनील गायकवाड म्हणतात, ''काही वर्षांपूर्वी माझ्यासाठी ही एक समस्या होती की मी एकट्याने शाळेच्या संपूर्ण वेळेत चार वेगवेगळ्या इयत्तेतील मुलांना परिणामकारक रीतीने कसे शिकवावे; मात्र मूल्यवर्धनने माझी समस्या बऱ्याच प्रमाणात कमी केली आहे.''

'हे कसे?' असे विचारल्यावर सुनील गायकवाड म्हणतात की, मूल्यवर्धनच्या नियमित तासिका आयोजित करण्यातून त्यांच्या मनात काही विचार आले. त्यानुसार त्यांनी चार वर्गातील मुलांची दोन खोल्यांमध्ये विभागणी केली. इयत्ता पहिली व दुसरीतील मुलांसाठी एक खोली आणि तिसरी व चौथीच्या मुलांसाठी दुसरी खोली. जेव्हा ते कोणत्याही एका वर्गखोलीतील मुलांना शिकवितात तेव्हा दुसऱ्या वर्गखोलीतील मुले शिक्षकांशिवाय शिस्तीत अभ्यास करतात.

सुनील गायकवाड म्हणतात, ''मूल्यवर्धन शिक्षण पद्धतीमुळे मुलांमध्ये ही शिस्त हळूहळू विकसित झाली कारण मूल्यवर्धनच्या जवळपास सर्व उपक्रमांत मुलांना एकत्रित शिकण्यासाठी प्रेरित केले जाते. त्यामुळे जेव्हा कोणत्याही विषयावर मुलांना कोणतेही काम पूर्ण करायला सांगितले जाते, तेव्हा ती एकमेकांच्या सहकार्याने पूर्ण करतात. त्यावेळी मला असे जाणवले की, मुलांमध्ये विकसित होत असलेली जबाबदारीची भावना त्यांच्यात शिस्तबद्धता निर्माण करत आहे.''

जेव्हा मुले वेगवेगळ्या गटात शिकतात तेव्हा माझे काम खूपच सोपे होऊन जाते. यासाठी मी मूल्यवर्धन शिक्षण पद्धतीचा अवलंब



**मूल्यवर्धन शिक्षण पद्धतीतून मुलांना एकमेकांच्या साथीने लिहायला, वाचायला प्रोत्साहित करताना शिक्षक**

अन्य विषयांच्या अध्यापनासाठी करण्यास सुरुवात केली. यावेळी मला असे जाणवले की, मुले बहुतांश प्रश्नांची सोडवणूक समूहात एकत्रितपणे करू लागली आहेत. मुले शिक्षकांना उत्तरे सांगण्याची विनंती करतात अशी वेळ आता क्वचितच येते.

काही वेळा असेही होते की, जेव्हा वर्गातील एका गटाला प्रश्नाची सोडवणूक करता येत नसेल तेव्हा ते वर्गातील इतर गटातील मुलांची मदत घेतात. अशा प्रकारे मुले शिकण्यासाठी स्वत: प्रयत्न करू लागली. अशा वेळी काही मुले शिक्षकांची जबाबदारी निभावू लागली आणि त्यांना परस्परांच्या सहकार्यातून शिकण्याचा आणि शिकविण्याचा आनंद मिळू लागला. मी अशा मुलांना प्रोत्साहन देऊ लागले.

सुनील गायकवाड पुढे म्हणतात, ''पूर्ण वर्गाला केवळ मुलांच्या भरवशावर सोडता येत नाही. यासाठी मी एका खोलीत दोन वर्गातील मुलांना सोबत बसण्यास सांगितले. आमच्या शाळेत मुलांची संख्या कमी आहे म्हणून एका खोलीत दोन वर्गातील मुलांना बसविणे, त्यांच्याकडे लक्ष देणे थोडे सोपे जाते. यामुळे याचा फायदा असा झाला की, आता वर्गखोल्या लक्षात घेऊन मुलांना द्यावयाचे अध्ययन अनुभव मी पहिल्यापेक्षा चांगल्या प्रकारे तयार करू शकतो. आता मी दोन्ही वर्गातील मुलांसाठी जवळपास निम्मा वेळ देऊ लागलो आहे. या दरम्यान मी आपल्या जबाबदारीची दोन भागात विभागणी केली. पहिल्या भागात कोणत्याही विषयाचा नवीन पाठ मुलांना शिकवितो. त्यानंतर अशा मुलांची निवड करतो की, ज्या मुलांना पाठ चांगला समजला असेल. त्यानंतर त्या वर्गातील मुलांना गटात शिकण्याची संधी देऊन दुसऱ्या वर्गात वेगवेगळ्या इयत्तेतील मुलांना शिकविण्यासाठी जातो.''

सुनील गायकवाड स्पष्ट करतात, ''माझा अनुभव आहे की, एकत्रित इयत्तेचे काही फायदे होतात. उदाहरणार्थ, पहिलीतील मुले दुसरीतील मुलांच्या बरोबर शिकतात तेव्हा त्यांच्या अध्ययन अनुभवात फारसे अंतर असत नाही. यामुळे असा फायदा होतो की, काही वेळा पहिलीतील मुले दुसरीतील पाठ शिकण्याचा प्रयत्न करतात. हे करताना दोन्ही इयत्तांतील मुले एक–दुसऱ्याच्या शिक्षणात बाधा आणत नाहीत. त्यांना एकमेकांचे विषय शिकण्याची आणि समजून घेण्याची संधी मिळते.''

विशेष कौशल्य असलेल्या शिक्षकाशिवाय हे फायदे संभवत नाहीत. मात्र हे सुनील गायकवाड यांच्या मेहनतीचे फळ म्हणावे लागेल की, शिक्षणाच्या बाबतीत या शाळेची गणना जिल्ह्यातील एक आदर्श शाळा म्हणून केली जाते. मागील काही वर्षांच्या परीक्षेतील यशावरून असे स्पष्ट होते की, पहिली ते चौथीपर्यंतच्या मुलांची शैक्षणिक गुणवत्ता सतत वाढत आहे.

या संपूर्ण प्रक्रियेत सुनील गायकवाड यांना सर्वांत जास्त आनंद या गोष्टीचा होतो की, मुले शिक्षकाची भूमिका पार पाडतात, ते स्पष्ट करतात. ''काही वेळा मी इयत्ता तिसरी आणि चौथीतील मुलांची एक जोडी बनवून त्यांना वाचायला सांगतो. त्यामुळे एका मुलाचे शिक्षण होते तर दुसऱ्याची उजळणी होते. यातून शिकणारी मुले स्वत:ला शिक्षक समजतात.''

शेवटी सुनील गायकवाड मूल्यवर्धन उपक्रमांचा उल्लेख करताना म्हणतात, ''जास्तीत जास्त मुले आपण जणू शिक्षक आहोत असेच अनुभवतात. या पाठीमागे मूल्यवर्धन उपक्रमांतून मुलांमध्ये जबाबदारीची भावना वाढीस लागत आहे. यासाठी मूल्यवर्धनमध्ये एक विभाग आहे 'माझ्या जबाबदाऱ्या'. या विभागातील उपक्रमांतून मला माझा उद्देश सफल करण्यास विशेष मदत मिळत आहे.''

# ३३. मूल्यवर्धनमुळे मुलांचा अहंकार होत आहे कमी

**मूल्यवर्धन तासिकांमध्ये आयोजित उपक्रम आणि त्यातील काही घटनांचा मुलांच्या मनावर असा काही प्रभाव पडला आहे की ते विनम्र आणि संवेदनशील बनत आहेत.**

बुलढाणा जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा चिंचोली येथील शिक्षक गेल्या दोन वर्षांपासून राबवित असलेल्या मूल्यवर्धन उपक्रमांचा परिणाम म्हणजे बहुतेक मुलांच्या वागण्यात सकारात्मक बदल होत आहेत.

शिक्षिका पल्लवी बाळसराफ सांगतात की, मूल्यवर्धनमुळे मुलांचा अहंकार कमी होत आहे. त्यांच्यात हळूहळू नम्रता येत आहे, ते पूर्वीपेक्षा अधिक विनयशील होत आहेत.

मुले फक्त शिक्षकच नव्हे, तर शाळेमध्ये शिकणारी इतर मुले, कर्मचारी, कुटुंबातील सदस्य आणि गावातील लोकांनाही मान देत आहेत हे पल्लवी बाळसराफ यांना सर्वांत जास्त आवडते.

बुलढाण्यापासून सुमारे ६० कि.मी. अंतरावर सेगाव तालुक्यातील चिंचोली गावातील शाळेत एकूण सहा शिक्षक–शिक्षिका आहेत. डिसेंबर २०१७ पासून येथे मूल्यवर्धन उपक्रम आयोजित केले जात आहेत. सुमारे पाच हजार लोकसंख्या असलेल्या चिंचोली गावात बहुतेक मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबे असून सोयाबीन आणि कापूस उत्पादक आहेत.

## मुलांच्या वागण्यात मोठे बदल :

पल्लवी बाळसराफ यांच्या मते, डिसेंबर २०१७ पासून मूल्यवर्धनमुळे मुलांच्या व्यक्तिमत्त्वात बरेच बदल झालेले दिसतात. उदाहरणार्थ, त्यांच्या शाळेतील मुले मूल्यवर्धन उपक्रमांमध्ये सामील असलेल्या महान व्यक्तिमत्त्वांची वैशिष्ट्ये आणि गुणांचा विचार करीत आहेत. त्याचप्रमाणे मुले प्राणी आणि पक्षी यांच्याबद्दल करुणा दर्शवीत आहेत. याशिवाय चित्रकला किंवा रांगोळीशी संबंधित उपक्रम मुलांमध्ये कला व सौंदर्याची आवड निर्माण करीत आहेत.

## सर्वांत मोठा अडथळा कसा दूर झाला :

मूल्यवर्धनमुळे मुलांमध्ये सकारात्मक बदल होण्यातील असा कोणता अडथळा दूर झाला, याबद्दल पल्लवी बाळसराफ सांगतात की पूर्वी मुलांमध्ये खूप अहंकार होता. त्यामुळे वडिलांच्या बऱ्याच गोष्टी ती ऐकत नसत. मुलांच्या वागण्यात, बोलण्यात आसपासच्या लोकांच्या भाषेचा प्रभाव जाणवत होता. कधी कधी काही मुले भांडणाच्या वेळी अपशब्द वापरीत असत. मुलांचे असे वागणे चिंताजनक होते.

त्यांनी पुढे त्यांनी असाही अनुभव सांगितला की, काही मुले पक्ष्यांना दगड मारीत असत. ती कुत्र्यांनाही त्रास द्यायची, पण आज ही मुले पक्ष्यांना खायला देतात. कुत्र्या, मांजरांची काळजी घेतात. विशेषत: त्यांच्या लहान व अपंग पिलांची काळजी घेतात.



**मूल्यवर्धन शिक्षिका पल्लवी बाळसराफ यांच्या प्रयत्नांतून मुले रांगोळीसारख्या कलात्मक कार्यात पहिल्यापेक्षा अधिक आवडीने सहभागी होतात.**

## मूल्यवर्धन कसे उपयुक्त आहे :

मुलांच्या वागण्यात कसे बदल होत आहेत हे स्पष्ट करणाऱ्या मूल्यवर्धनशी संबंधित काही घटना आहेत. जून २०१९ शी संबंधित एका घटनेबद्दल पल्लवी बाळ सराफ सांगतात की,

मूल्यवर्धनमध्ये अनेक उपक्रम असूनही, काही मुलांचा अहंकार कमी होत नव्हता आणि ते त्यांच्या वागणुकीमुळे अडचणी निर्माण करत असत.

चौथीच्या वर्गात शिकणारा राम ढगे (बदललेले नाव) नावाचा एक मुलगा होता. तो आपल्या खोडकर मित्रांसमवेत झाडावर पक्ष्यांनी बनविलेली घरटी तोडायचा. तो नेहमी असे करायचा. त्यात त्याला फुशारकी आणि आनंद वाटत असे. पल्लवी बाळसराफ सांगतात की, एके दिवशी त्याने शाळेच्या आवारातील चिमणीनी बांधलेले घरटे जमिनीवर पाडले त्यामुळे चिमणीची पिल्ले जखमी झाली. मग इतर मुलांनी पिलांची काळजी घेतली आणि त्यांना पाणी दिले.

पल्लवी बाळसराफ म्हणतात, ''त्या दिवशी मी त्या चिमणीच्या पिलांना घरट्यात ठेवून घरी आणले. दुसऱ्या दिवशी इतर मुलांच्या मदतीने ते घरटे परत झाडाच्या फांदीला नीट बांधून ठेवले. त्या झाडावर कावळ्याचेही घरटे होते. दुपारच्या सुट्टीत मुलांनी पाहिले की कावळा चिमणीच्या पिलांना दाणा भरवीत होता. मुलांनी मला येऊन सांगितले.''

त्यानंतर पल्लवी बाळसराफ यांनी मूल्यवर्धनचे संयुक्त सत्र आयोजित केले. त्यात त्यांनी आपला अनुभव शाळेतील सर्व मुलांबरोबर शेअर केला. त्यानंतर मुलांनी या घटनेवर आपले मत व्यक्त केले. मुलांना असे वाटले की, जर कावळा इतर पिलांबद्दल इतका संवेदनशील होत असेल तर मग आपण का नाही? या आणि अशा घटनांबद्दल एकमेकांशी सतत संवाद साधल्यामुळे त्यांच्यामध्ये दयाळूपणा आणि प्रेम जागृत होऊ लागले. परिणामी त्यांचा अहंकार हळूहळू कमी होऊ लागला.

**मूल्यवर्धनशी संबंधित इतर अनुभव :**

मुलांच्या विचारावर आणि त्यांच्या दैनंदिन व्यवहारात होणाऱ्या वर्तनावर मूल्यवर्धनच्या अनेक उपक्रमांचा प्रभाव आहे. उदाहरण म्हणून पल्लवी बाळसराफ एका उपक्रमाशी संबंधित स्वतःचा अनुभव सांगतात.

त्या म्हणतात, ''मूल्यवर्धनमध्ये अब्राहम लिंकनच्या जीवनावर आधारित एक प्रेरक कथा आहे. या कथेबद्दल बोलताना मुलांनी आपली मते मांडली तेव्हा त्यांच्या समजूतदारपणाची पातळी पाहून मला आश्चर्य वाटले. मुलांनी म्हटल्याप्रमाणे पहिल्या प्रयत्नात अपयशी ठरल्यावर अपयशाशी संबंधित कोणत्या गोष्टी ओळखल्या गेल्या पाहिजेत हे महत्त्वाचे आहे. या कथेशी संबंधित संवादात मुले प्राणी, पक्ष्यांविषयी प्रेम, संयम, कठोर परिश्रम आणि करुणा यांबद्दल बोलत होती.''

पल्लवी बाळसराफ यांना मूल्यवर्धनमधील आणखी एक गोष्ट आवडते. येथे मुलांना चित्र काढण्याच्या आणि रंगविण्याच्या अधिकाधिक संधी आहेत. त्यांना असे वाटते की, यामुळे मुले सर्जनशील होत आहेत.

या मूल्यवर्धन शिक्षिका म्हणतात, ''जर आपण या उपक्रमांवर सविस्तर नजर टाकली तर लक्षात येते की यांमुळे मुलांमध्ये व्यक्तिमत्त्व विकसित होण्याच्या प्रक्रियेत यांचा निश्चित उपयोग होत आहे.''

शेवटी मुख्याध्यापक अमृतराव बनारे म्हणतात, ''मुलांमध्ये होणाऱ्या बदलांमागे मूल्यवर्धन हा एक महत्त्वाचा घटक म्हणून प्रत्ययाला येत आहे. प्रत्येक वर्गातील मुलांसाठी मूल्यवर्धन उपक्रमासाठी आठवड्यातून किमान दोन ते तीन सत्रे घेण्याचा आमचा प्रयत्न आहे.''

# ३४. मुलांनी एकमेकांना त्यांच्या टोपण नावांनी हाक मारणे थांबविले

**एका शाळेतील मुलांनी असा नियम केला की, ते प्रत्येक मुलाला त्याच्या खऱ्या नावानेच हाक मारतील. ही प्रेरणा त्यांना मूल्यवर्धन उपक्रमांतून मिळाली.**

शाळांमध्ये बऱ्याचदा काही मुले खऱ्या नावाने हाक मारण्याऐवजी एकमेकांना अपमानकारक अशा टोपण नावाने हाक मारतात. काही वेळा काही मुले अपमानकारक नावांनी इतर मुलांना चिडवितात. हळूहळू ही अपमानकारक टोपण नावेच काही मुलांची ओळख बनतात. मग बऱ्याचदा लोक त्यांना त्यांच्या त्याच नावाने ओळखू लागतात.

ही परिस्थिती बदलण्यासाठी, एक शिक्षिका मूल्यवर्धनचा वापर एक साधन म्हणून करीत आहेत. चांगली गोष्ट अशी आहे की, गेल्या दीड वर्षांच्या कालावधीत त्या आपल्या उद्देशात सफल होत आहेत.

बुलढाणा जिल्हा परिषदपासून सुमारे १५० कि.मी. अंतरावर संग्रामपूर तालुक्यातील जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा बलोदा या शाळेत सोनाली तरोळे या शिक्षिका आहेत.

सुमारे अडीच हजार लोकसंख्या असलेल्या बलोदा गावात मुख्यत: लहान शेतकरी व मजूर कुटुंबे आहेत. शाळेत एकूण ५ शिक्षकांसह १४५ मुले आहेत. सप्टेंबर २०१८ पासून येथे नियमित मूल्यवर्धन सत्रांचे आयोजन केले जात आहे.

## मूल्यवर्धनातून काय मिळवायचे?

सोनाली तरोळे सांगतात की, मूल्यवर्धन सत्रापूर्वी या शाळेतील काही मुले एकमेकांना अपमानकारक नावाने हाक मारत असत. उदाहरणार्थ, ओमला ओम्या आणि प्रकाशला पक्या असे म्हणत असे. मूल्यवर्धनच्या काही उपक्रमांमध्ये एकमेकांची छेडछाड केल्याने कोणते वाईट परिणाम होतात याबद्दल सांगितले गेले आहे. मूल्यवर्धनच्या अशा काही उपक्रमांमुळे मुले आता एकमेकांचा आदर करीत आहेत. याशिवाय ते त्यांच्यापेक्षा लहान मुलांनाही मान देत आहेत.



**मूल्यवर्धन तासिकेत शाळा परिसरात मुलांसाठी सहयोगी खेळ आयोजित करताना शिक्षिका सोनाली तरोळे**

### मुलांनी बनविला हा नियम :

मुलांना परस्पर सहभागाने स्वतःच्या वर्गासाठी आणि शाळेसाठी नियम तयार करण्यास मूल्यवर्धनमुळे प्रोत्साहन मिळते.

सोनाली तरोळे सांगतात की, जुलै २०१८ मध्ये मूल्यवर्धन सत्रादरम्यान मुलांनी प्रथम त्यांच्या वर्गासाठी नियम केला की, प्रत्येक मुलाला खऱ्या नावानेच संबोधिले जाईल. या नियमाचा परिणाम म्हणून हळूहळू मुले एकमेकांबद्दल आदर दाखवू लागली. त्यानंतर, ऑगस्ट २०१८ मध्ये झालेल्या मूल्यवर्धनच्या संयुक्त सत्रात सर्व वर्गातील मुलांनी एकत्रितपणे शाळेसाठी समान नियम बनविला.

### नियमांचे पालन करण्याचे आव्हान :

सोनाली तरोळे म्हणतात, ''फक्त नियम बनविणे पुरेसे नव्हते. खरे आव्हान असे होते की, तयार केलेल्या नियमांचे सर्व मुलांनी चांगल्या प्रकारे पालन केले पाहिजे.''

त्या म्हणतात, ''काही मुले या म्हणण्याशी सहमत नव्हती. कदाचित त्यांच्या स्वत:च्या सामाजिक वातावरणाचा परिणाम त्यांचे वर्तन बदलण्यात सर्वांत मोठा अडथळा ठरत होता. तेव्हा मूल्यवर्धनच्या सर्व सत्रांमध्ये सर्व मुलांनी एकमेकांना त्यांच्या खऱ्या नावाने हाक मारावी यासाठी प्रोत्साहित केले.''

### मुले एकमेकांना चांगल्या प्रकारे ओळखू लागली :

शिक्षिका सोनाली तरोळे यांनी आणखी एक प्रयोग केला. मूल्यवर्धन सत्रात सहयोगी खेळांच्या दरम्यान पाच मिनिटांचे काही खेळ घेतले. यात प्रत्येक मुलाच्या नावाचा अर्थ स्पष्ट करण्यासारख्या खेळाचा समावेश होता.

मुले सांगतात, ''मूल्यवर्धनमध्ये असे शिकायला मिळाले की, जर एखाद्याला अपमानकारक नावाने संबोधित केले तर त्याला वाईट वाटेल.'' चौथीची वेदिका थिरोडकर म्हणते, ''आता आम्हांला समजले की कोणालाही लठ्ठ किंवा लंबू असे चिडवू नये.''


मूल्यवर्धन
त्यांना काय



cup
दिवाळी
होळी
रिक्षा
जहाज
ट्रक
कार
wet snow
Ball
Umbrella
Tree
Sun
Fish
Leaf
Star
Butterfly
Duck
कला व वाणिज्य महाविद्यालय